# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ जून २००६
◆ वर्ष सहावे
◆ अंक सहावा

## — अनुक्रमणिका —


| | |
|---|---|
| **संपादकीय** - | ४ |
| **साहित्यवार्ता** | ८ |
| **मुलाखत - डॉ. आनंद यादव** | ३६ |
| **पुस्तक परिचय** | |
| **जेआरडी - एक चतुरस्त्र माणूस** : माधुरी शानभाग | ४४ |
| **मयादा - इराकची कन्या** : अनु. भारती पांडे | ५३ |
| **वसंतगंधा** : माधवी कोल्हटकर | ६१ |
| **चला जाणून घेऊ या! हस्तसामुद्रिक** : अनु. वृषाली पटवर्धन | ६९ |
| **योगसाधनेमधील यम-नियमांचे महत्त्व** : डॉ. सुभाष दांडेकर | ७४ |
| **साधंसुधं** : प्रमोदिनी वडके-कवळे | ७९ |
| **पुरस्कार** | ९० |
| **वाचकांचा प्रतिसाद** | ९५ |
| **श्रद्धांजली** | १०० |
| **बालनगरी** | १०३ |



- संपादक : सुनील मेहता
- कार्यकारी संपादक : शंकर सारडा
- संपादन सहाय्य : अनिरुद्ध पाटील
- अंकाची किंमत १५ रु.
- वार्षिक वर्गणी मनीऑर्डरने पाठवावी.
- प्रसिद्धी दरमहा १५ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी : *मेहता पब्लिशिंग हाऊस*



संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-३०.
फोन : २४४७६९२४ फॅक्स :०२०-४४७५४६२
Email - mehpubl@vsnl.com
Website - mehtapublishinghouse.com


**वार्षिक वर्गणी १०० रु. तीन वर्षाची २००रु. पाच वर्षांची ३००रु.**
**३ व ५ वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**


*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

## संपादकीय

### काव्या विश्वनाथनच्या कादंबरीची कथा

काव्या विश्वनाथन- हार्वर्ड विद्यापीठात प्रथम वर्षाला असणारी सतरा वर्षांची तरुण विद्यार्थिनी- प्रथम प्रसिद्धीच्या झोतात आली ती तिच्या पहिल्या कादंबरीला अमेरिकेतल्या एका मातब्बर प्रकाशनसंस्थेकडून मिळालेल्या भरघोस अॅडव्हान्समुळे! त्या संस्थेने तिच्या पहिल्या दोन कादंबऱ्यांबद्दल करार करून तिला पाच लाख डॉलर्स देण्याचे जाहीर केल्यामुळे!

त्यानुसार तिची पहिली कादंबरी 'हाऊ ओपल मेहता गॉट किस्ड्, गॉट वाइल्ड अँड गॉट अ लाइफ' एप्रिल महिन्यात बाजारात आली. तिच्यावर न्यूयॉर्क टाइम्स वगैरे पत्रात चांगले अभिप्रायही आले. अमेरिकेत राहणाऱ्या एका भारतीय मुलीने लिहिलेल्या पहिल्याच कादंबरीचे असे जोरदार स्वागत झाल्यामुळे भारतातील वृत्तपत्रांनीही तिच्यावर भरभरून लिहिले. 'टाइम्स ऑफ इंडिया'ने लेखनक्षेत्रात कोणाचा प्रभाव आहे, तिची पार्श्वभूमी, तिचे शिक्षण, तिची आवडती पुस्तके वगैरे माहिती देणारा तिचा अडीचशे शब्दांचा लेख १५ एप्रिलच्या अंकात प्रसिद्ध केला. त्यात तिने आपल्या आवडत्या लेखकांमध्ये एव्हेलिन वॉग, पी जी वुडहाऊस, हेन्री जेम्स, जेन ऑस्टिन, ब्रांटे भगिनी, काझुओ इशिगुरो, मार्गारेट अॅटवुड, डोरोथी डुनेट आणि इयान मॅकएव्हन यांचा उल्लेख केला होता. बुकर प्राइझ विजेत्या कादंबऱ्यांचाही आपण अभ्यास करतो असे तिने लिहिले होते. लेखनाकडे ती गंभीरपणे पाहते, तिची वाङ्मयीन अभिरुची उच्च प्रकारची आहे; उथळ रंजनवादी नाही, हे त्यावरून जाणवावे. परंतु त्याचबरोबर एनिड ब्लायटनची फेमस फाइव्ह, नॉडी बुक्स वगैरे पुस्तकेही लहानपणी आपण मनापासून वाचल्याचे तिने स्पष्ट केले होते. एनिड ब्लायटनने सुमारे सातशे पुस्तके लिहिली; आणि आजही ती जगभर उपलब्ध आहेत आणि बालकुमार वाचकांच्या पसंतीत त्या पुस्तकांना अग्रस्थान आहे; तेव्हा बालवयात एनिड ब्लायटनची पुस्तके वाचणे हा इंग्लिश माध्यम असणाऱ्या सर्वांचाच एक अटळ कार्यक्रम असतो- हे आपल्याला ठाऊक आहे...

काव्या विश्वनाथन ही शाळेत हुशार विद्यार्थिनी म्हणून ओळखली जात होती. लेखनातही तिला चांगली गती होती. शैलीदार इंग्रजीतले तिचे लेखन वाचून तिच्या शिक्षिका तिचे कौतुक करीत. साहजिकच हार्वर्ड विद्यापीठात प्रवेश मिळवायचा



असा तिचा निर्धार होता. हार्वर्ड हे अमेरिकेतले सर्वात प्रतिष्ठित विद्यापीठ. त्यात प्रवेश मिळवणे हे अत्यंत अवघड. त्यासाठी भरपूर पूर्वतयारी आणि प्रावीण्य लागते... हार्वर्डला प्रवेश घेण्यासाठी बरेच तंत्रमंत्र सांगण्यात येतात. त्यांचा पाठपुरावा महत्त्वाकांक्षी पालकही करतात. काव्या विश्वनाथनने त्या दृष्टीने व्यूहरचना करून हार्वर्डमध्ये प्रवेश मिळवला. तिच्या डॉक्टर वडिलांनी तिला हार्वर्डमध्ये प्रवेश मिळावा म्हणून इव्ही वाइझ या मार्गदर्शक संस्थेचा सल्ला घेतला होता. त्यासाठी ३० हजार डॉलर्सची फी दिली होती.

हा प्रवेश कसा मिळवला याचीच हकीकत मिस्किलपणे तिने लिहून काढली; ती अमेरिकेतील नव्या तरुण लेखकांना मार्गदर्शन करणाऱ्या एका एजन्सीकडे पाठवली. या एजन्सीने प्लॉट लाइनची रूपरेखा अधिक सर्वसमावेशक करून काही नवे प्रसंग व तपशील वाढवण्याचा सल्ला दिला. पुढे या एजन्सीने चांगला लिटररी एजंट गाठून दिला. त्या एजंटतर्फे काही प्रकाशकांकडे हे पुस्तक विचारासाठी गेले आणि सर्वात जास्त बोली लिटल ब्राऊन या प्रकाशनसंस्थेने लावली; एवढेच नव्हे या पुस्तकाबरोबर आणखी एक पुस्तक लिहिण्यास सांगून त्याचाही समावेश एका करारात करून, तिला पाच लाख डॉलर्सचा घसघशीत अॅडव्हन्स देण्याचे मान्य केले... नव्या लेखकालाही योग्य त्या चॅनेलमधून जाण्याचा अवसर मिळाला तर त्याला एकदम कसे प्रकाशझोतात जाता येते- याचे एक उदाहरण म्हणून काव्या विश्वनाथनची प्रातिनिधिक यशोगाथा छापण्यात प्रसारमाध्यमांनाही धन्यता वाटली... लिटल ब्राऊन या प्रकाशकांनी तर काव्या विश्वनाथनला जे.डी. सॉलिंजर, नॉर्मन मेलर, क्रोनिन, वुडहाऊस या आपल्या लेखकांच्या पंक्तीत बसणारे नवे नाव म्हणून तिची आरती ओवाळली.

एका रात्रीत जगप्रसिद्धी- हा अनुभव सिनेनटांबरोबरच तरुण लेखकालाही येऊ शकतो- हे काव्याने दाखवून दिले.

तिचे पुस्तक प्रसिद्ध झाले. आजचे एक अग्रगण्य कादंबरीकार अमिताब घोष हार्वर्डमध्ये एका कोर्सचे अध्यापन करतात. तो कोर्स काव्या विश्वनाथनने घेतलेला असल्याने त्यांचा चांगला परिचय झाला. अमिताब घोष यांनी बोस्टन हेरॉल्डला दिलेल्या मुलाखतीत म्हटले, "तिच्या लेखनात कादंबरीकाराला आवश्यक ती वरच्या टापेची भाषाशैली आढळते. तिच्या वयाकडे पाहता तिची ही भाषाशैलीवरील पकड म्हणजे खरोखरच असामान्य सिद्धी वाटते." (अर्थात सर्वांनाच ही कादंबरी इतकी ग्रेट वा लक्षवेधक वाटली असे नाही. तिला उगाच एवढे डोक्यावर घेतले गेलेय असेही काहींनी म्हटले.)

काही असो, या यशाच्या शिखरावर मिरवत असतानाच एक वावटळ आली; आणि काव्या विश्वनाथनच्या यशाचा पतंग उंच भरारी घेण्याआधीच काटला गेला.

हार्वर्ड युनिव्हर्सिटीतील विद्यार्थ्यांची दोन वृत्तपत्रे निघतात. त्यातील हार्वर्ड इनडिपेंडंट या साप्ताहिकाने काव्या विश्वनाथनच्या कादंबरीत बरीच उचलेगिरी आहे असा आरोप करणारी एक बातमी प्रसिद्ध केली. मेगान मॅकॅकॅफेर्टी या लेखिकेच्या स्लॉपी फर्स्टस् आणि सेकंड हेल्पिंग्ज या कादंबऱ्यांतील सात छोटे उतारे देऊन त्यातील बरीच शब्द-वाक्यरचना 'काव्या'च्या कादंबरीतील काही परिच्छेदात आढळते असे दाखवून दिले.

उदाहरणार्थ, सॅब्रिना वॉज दि ब्रेनी एंजल. यट अनदर एक्झाम्पल ऑफ हाऊ एव्हरी गर्ल हॅड टु बी वन ऑर दि अदर, प्रेटी ऑर स्मार्ट. (स्लॉपी फर्स्टस्)

मनी पेनी वॉज दि ब्रेनी फिमेल कॅरॅक्टर. यट अनदर एक्झाम्पल ऑफ हाऊ एव्हरी गर्ल हॅड टु बी वन ऑर दि अदर : स्मार्ट ऑर प्रेटी (हाऊ ओपल... पृ. ३९)

फायनली, फोर मेजर डिपार्टमेंटल स्टोअर्स अँड १७० स्पेशॅलिटी शॉप्स लेटर, वुई वेअर इन (स्लॉपी, पृ. २३७)

फाइव्ह डिपार्टमेंटल स्टोअर्स अँड १७० स्पेशॅलिटी लेटर, आय वॉज सिक ऑफ लिसनिंग टू हर हम... (पृ. ५१)

ही बातमी वाचून हार्वर्ड क्रिमसनने तिची प्रतिक्रिया विचारली; तेव्हा काव्याने उडवाउडवीचा प्रयत्न केला. मी ती पुस्तके वाचलेली आहेत; त्यातील काही वाक्ये वा शब्द, घटना वा परिच्छेद माझ्या स्मरणात पक्के बसलेले असतील, ते अनवधानाने माझ्या कादंबरीत आले असतील अशी सारवासारव करण्याचा तिचा प्रयत्न होता... परंतु हे प्रकरण जास्तच तापणार असे लक्षात आल्यावर तिने म्हटले, पुढच्या आवृत्तीत अशी साम्यस्थळे वगळण्यात येतील. तेवढ्यात (मेगान मॅकर्कॅफेर्टीची दोन्ही पुस्तके प्रकाशित करणाऱ्या) रँडम हाऊस या प्रकाशनसंस्थेने जाहीर केले की काव्याने किमान ४५ परिच्छेदांची उचलेगिरी केली आहे... आणि त्यासाठी न्यायालयात जाण्याचा आमचा विचार आहे. इंटरनेटवर ब्लॉगद्वारे या प्रकाराचा पाठपुरावा करणाऱ्यांनाही मग नवा जोर चढला. न्यूयॉर्क टाइम्सच्या वार्ताहराने मॅडेलिन विकहॅमच्या 'कॅन यू कीप सिक्रेट' या पुस्तकातील तीन परिच्छेद काव्याच्या कादंबरीत आढळल्याची बातमी दिली.

दिनांक २६ एप्रिलला एनबीसीच्या टुडे या कार्यक्रमात काव्या विश्वनाथनची मुलाखत झाली. तिने त्यात आपली कैफियत मांडली. ''मी मॅकर्कॅफेर्टीची पुस्तके हायस्कूलमध्ये वाचली होती; काही परिच्छेद पाठही केले होते. त्याचा माझ्या लेखनात नकळत समावेश झाला असावा. पुढच्या आवृत्तीच्या वेळी ते दूर करीन; मॅकर्कॅफेर्टीचा श्रेयनामावलीत निर्देश करीन.''

मुलाखत घेणाऱ्या कॅटी कोरिकने ''केवळ दिलगिरीने हे प्रकरण निकाली निघेल का?'' असा प्रश्न केला...



लिटल ब्राऊन प्रकाशनसंस्थेने या पुस्तकाची पहिली आवृत्ती एक लाखाची काढली होती. बहुसंख्य प्रती बुकशॉप्सकडे गेल्या होत्या. या प्रती परत मागवण्याचा निर्णय घेण्यात आला...

काव्या विश्वनाथन- एक नव्या दमाची कादंबरीकार... प्रतिभाशाली लेखिका... भरपूर मानधनाची रक्कम आगाऊ मिळवून एकदम प्रसिद्धीच्या झोतात आलेली भाग्यवान टीनएजर... पण तीसचाळीस परिच्छेद वा वाक्यांची उचलगिरी केल्याने तिच्या प्रतिमेला तडा गेला आणि तिचे भविष्यच काळवंडून गेले. तिच्या कादंबरीचा प्लॉट खरे तर चांगला आहे; स्वतंत्र आहे. एकूण इंग्लिश भाषेवरील प्रभुत्वही निर्विवाद आहे... परंतु त्याची दखल घेण्याऐवजी तिच्या उचलेगिरीवरच साऱ्यांचे लक्ष आता केंद्रित झाले आहे आणि तिला बदनामीला सामोरे जावे लागत आहे.

या प्रकरणात आणखी एक बाब गंभीरपणे पुढे आली आहे.

काव्याने आपली कादंबरी ही सेव्हन्टीन्थ स्ट्रीट प्रॉडक्शन या बुकपॅकेजर कंपनीला संपादनासाठी दिली. पुढे या कंपनीचे हस्तांतरण ॲलॉय इंक या संस्थेकडे झाले आणि काव्या विश्वनाथनबरोबर कॉपीराइटवर ॲलॉय इंकचेही नाव टाकण्यास लिटल ब्राऊनने मान्यता दिली. या पुस्तकाचे संपादन करणारी क्लॉडिया गेबल ही मॅकर्कॅफेर्टीची एडिटर आहे, हे आणखी एक वास्तव आता उघड झाले आहे. नवीन लेखकांना मार्गदर्शन करणे, त्यांना प्रकाशक गाठून देणे, त्याबद्दल मानधनात वाटा मिळवणे हा अमेरिकन ग्रंथव्यवसायाचा एक सर्वसंमत भाग आहे. त्यामुळे अशा उचलेगिरीचाही मोह संबंधितांना होत असावा.

एकूणच काव्या विश्वनाथनच्या या कादंबरीच्या संदर्भातील हे गुंतागुंतीचे मुद्दे भारतीय लेखक-वाचकांनाही गोंधळात पाडणारे आहेत. आपल्याकडे अनेकदा अशा उचलेगिरीच्या प्रकारांकडे दुर्लक्ष केले जाते. मूळ पुस्तक वा लेखक यांचे संदर्भ टाळले जातात. काव्यानेही मॅकर्कॅफेर्टीचा उल्लेख टाळला आहे... परंतु अमेरिकेतील वाचक-समीक्षक अधिक जागरूक असतात. कॉपीराइट कायद्याचा तेथे सर्वांनाच दबदबा वाटतो. ५० शब्दांपेक्षा मोठे अवतरण घेतानाही परवानगी लागते...

काव्या विश्वनाथनच्या लेखनक्षेत्रातील वाटचालीला यामुळे खीळ बसावी असे नाही. तिच्या लेखणीत ताकद आहे; पण इतरांच्या लेखनाच्या शाळकरी प्रभावातून तिने बाहेर पडायला हवे... अमेरिकेतील लिटररी एजंट, लिटररी एडिटर यांच्या व्यावसायिक दृष्टिकोणातही स्पर्धेपेक्षा अधिक तारतम्य दृष्टी हवी असा याचा अर्थ आहे.

# साहित्यवार्ता

## * मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे 'द दा विंची कोड'चा मराठी अनुवाद प्रकाशित

तब्बल पाच कोटी प्रतींच्या विक्रीचा उच्चांक गाठलेली आणि जगभरातील चव्वेचाळीस भाषांमधून अनुवाद झालेली 'द दा विंची कोड' ही खळबळजनक कादंबरी २५ मे रोजी मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित झाली आहे.

भारतामध्ये मराठीसोबतच मल्याळम् या भाषेलाही या कादंबरीच्या अनुवादाचे हक्क २००४ साली मिळाले आणि डिसेंबर २००५ मध्ये मराठी अनुवादाचे काम पूर्ण झाले. मराठी कादंबरीचा अनुवाद अजित ठाकूर यांनी केला आहे.

डॅन ब्राऊन यांच्या जगभरात गाजणाऱ्या या पुस्तकाचे मराठी वाचकही नक्कीच स्वागत करतील, असा विश्वास अनिल मेहता यांनी दिनांक १७ मे रोजीच्या पत्रकारपरिषदेत व्यक्त केला.

या पुस्तकाचा अनुवाद करताना विशेष अडचणी जाणवल्या नाहीत. काही संघटनांकडून संदर्भाविषयी आक्षेप घेण्यात येत असले, तरी धार्मिक भावना दुखावल्या जातील असे उल्लेख यामध्ये नाहीत, असे मत अनुवादक अजित ठाकूर यांनी व्यक्त केले.

## * वल्लरी करमरकर संस्कृत घेऊन प्रथम श्रेणीत एम.ए.

''मी संस्कृत विषय घेऊन प्रथमश्रेणीत एम.ए. झाले आहे, मग मी 'मेंटली डिसेबल्ड कशी?' असा सवाल सांगलीच्या वल्लरी भालचंद्र करमरकर हिने केला आहे. 'मी मानसिक विकलांग आहे, म्हणूनच माझा उल्लेख कुणी 'मेंटली डिसेबल्ड' असा केला की मला यातना होतात...' अशी व्यथा तिने व्यक्त केली.

मी शाळेत व्यवस्थित अभ्यास केला, परीक्षा दिल्या. बी.ए. भाग दोनपर्यंत मी कॉलेजला जात होते. नजीकच्या कॉलेजात संस्कृत विषय नव्हता, म्हणून मी बहिस्थ विद्यार्थी बनून बी.ए.ला प्रथमश्रेणीत विद्यापीठात दुसरी आले. टायपिंग, कॉम्प्युटर शिकले. लहानपणापासून वाचन, संगीताचा छंद जोपासला.

जन्माच्यावेळी जिचे फक्त डोळे आणि कान हे दोनच अवयव व्यवस्थित



काम करीत होते, जिला 'सेरेब्रल पाल्सी' या असाध्य आजाराने ग्रासून टाकले होते, अशा वल्लरीने प्रचंड आत्मविश्वास व जिद्दीच्या जोरावर या अपंगत्वावर मात करून दाखवली. तिची आणि तिच्या पालकांची (आई विद्याताई, वडील भालचंद्र करमरकर आणि आत्या मथुताई) ही अचाट जिद्द पाहून कोणीही थक्क होऊन जाईल. याची दखल घेऊन दूरदर्शनच्या 'सह्याद्री' वाहिनीने एक वर्षापूर्वी 'माय-लेकी' या कार्यक्रमात त्यांचा सत्कार केला. तिला 'प्रेरणा' पुरस्कार दिला. तिच्या या अभूतपूर्व चिकाटीची 'बीबीसी'नेही दखल घेतली आहे.

तिचे वडील भालचंद्र करमरकर सांगतात, तिचा आजार कोणत्याच उपचाराने बरा होणारा नव्हता. अखेर नवव्या वर्षी आम्ही सर्व औषधोपचार बंद केले. पत्नी विद्या आणि आत्या मथुरा यांनी तिच्यासाठीच पूर्ण वेळ द्यायला सुरुवात केली. त्यातून ती बरी होत गेली. स्वत:च्या पायावर उभी राहिली. याचे अनुभवकथन करणारे 'फिटे अंधाराचे जाळे' हे पुस्तक मी लिहिले. ते वाचून प्रभावित झालेल्या नीलकांती पाटेकर यांनी तिच्यावर 'लाइफ इज ब्युटिफूल' हा लघुपट तयार केला. तो पुलोत्सव, मधुरांगण वगैरे ठिकाणीही दाखविला गेला आहे.

वल्लरी करमरकर यांचे 'फिटे अंधाराचे जाळे' हे पुस्तक मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित झाले आहे.

## * माहितीपर पुस्तकांकडे मुलांचा ओढा

वाचनसंस्कृती कमी झाल्याची चर्चा एका बाजूला होत असली, तरी नवी पिढी वाचनाबाबत जास्त जागरूक होत चालल्याचे ठळकपणे दिसते आहे. यंदाच्या उन्हाळ्याच्या सुटीत मुलांसाठी विविध प्रकारच्या साहस व गंमत शिबिरांबरोबर नवनव्या विषयांवरील पुस्तकांचीही रेलचेल सर्वत्र दिसून येते आहे.

पुण्यात 'क्रॉसवर्ड'ची नऊ विक्री केंद्रे आहेत. या सर्व ठिकाणच्या बालसाहित्यविषयक दालनांची प्रातिनिधिक माहिती देताना, डेक्कन परिसरातील केंद्राचे व्यवस्थापक म्हणाले की, दहा वर्षांखालील मुलांना गंमतगोष्टी जास्त भावतात. त्या पुढील मुलांमध्ये रामायण, महाभारत, भगतसिंहांसारख्या वीर पुरुषांची चरित्रे, सामान्यज्ञान व गणिताबाबत रंजक माहिती देणाऱ्या पुस्तकांची आवड वाढू लागली आहे. दुसरे म्हणजे वाढत्या स्पर्धेचा हा परिणाम असून, पालकच आपल्या मुलांसाठी पुस्तकांची गोडी लावत आहेत. त्यामुळे निरनिराळ्या विषयांवरील माहिती कोशांनाही सुगीचे दिवस आले आहेत.

परदेशवारी करणारे भारतीय तेथील नातेवाईक किंवा मित्रपरिवारातील बालवाचकांसाठी खासकरून ऐतिहासिक, पौराणिक विषयांवर आधारित साहित्य, तसेच 'पंचतंत्र', 'अमर चित्रकथा', 'बिरबलाच्या कथा' वगैरे भेटीदाखल आवर्जून नेतात, असे दिसून आले आहे. पुस्तकांच्या दुकानांमध्ये व प्रदर्शनांमध्येही बालसाहित्यासाठी आकर्षक पद्धतीने दालने सजवली जातात, हाही अलीकडच्या

काळातील एक मोठा बदल आहे. त्याचा फायदा यंदाच्या उन्हाळाच्या सुटीतही मिळतो आहे, असे काही पुस्तक विक्रेत्यांनी सांगितले आहे.

मेहता पब्लिशिंग हाऊसचे सुनील मेहता यांच्या मते, इंग्रजीच्या तोडीची आकर्षक रंगसंगतीची, सचित्र व सुरेख छपाईची पुस्तके आता मराठीतही निघू लागली आहेत. सूर्य, चंद्र, पृथ्वी, सौर ऊर्जा आदी विविध विषयांवर लहान मुलांचे कुतूहल जागवणारी पुस्तके आता आम्ही प्रकाशित करीत आहोत. त्यात पानभर चित्र व केवळ एकाच ओळीचा मजकूर यामुळे सोपेपणा निर्माण झाला आहे. मुलांना पुस्तकांची गोडी लावण्यासाठी हे खास प्रयत्न चालू आहेत. 'कुतूहल' हे गांजवे चौकातील दुकान विज्ञान खेळणी, प्रयोग संच व बालसाहित्यासाठीही कायम सज्ज असते. तेथील सुशय डाके म्हणतात, एरवीपेक्षा उन्हाळ्याच्या सुटीत पुस्तकांचा खप सुमारे पंचवीस टक्क्यांनी वाढलेला जाणवतो आहे. त्याचसोबत विज्ञान खेळणी व प्रयोग संचांची खरेदीही सुटीच्या काळात जास्त होताना दिसते आहे.

### * राजकीय अर्कचित्रे काढण्याची कला अवघड

''राजकीय व्यंगचित्रे नाशवंत असून, राजकारणाशी संबंधित अर्कचित्रे काढण्याची कला अत्यंत अवघड असते,'' असे मत ज्येष्ठ व्यंगचित्रकार वसंत सरवटे यांनी व्यक्त केले.

श्रेयस नवरे यांच्या 'हस्तांदोलन' या राजकीय अर्कचित्रांच्या प्रदर्शनाचे उद्‌घाटन त्यांच्या हस्ते ४ एप्रिल रोजी करण्यात आले.

हुबेहूब चित्र न रेखाटता त्याचे दृश्य सादरीकरण म्हणजे अर्कचित्र, असे सांगून श्री. सरवटे म्हणाले, ''रंग आणि रेषांमधून अर्कचित्रातील आशय, त्याची मांडणी, त्याचा तपशील या सर्व बाबींचा अभ्यास करणे गरजेचे असते. राजकारणातील प्रत्येक व्यक्तीचा चेहरा, त्याचे हावभाव, त्याची बोलण्याची पद्धत यातील वैशिष्ट्ये अचूकपणे अर्कचित्रांतून मांडण्यासाठी कसब लागते. संबंधित व्यक्तीविषयी चित्रकाराला काय वाटते हे चित्रातून स्पष्ट व्हायला पाहिजे; तसेच त्या चित्रातून योग्य भाषा व्यक्त होणेही गरजेचे असते.''

चित्रकार शि. द. फडणीस म्हणाले, ''चित्राचा अंतरात्मा ओळखण्याची कला मोजक्या व्यक्तींकडे असते. सभोवताली घडणाऱ्या अनेक घटनांमधून चित्राच्या कल्पना मिळू शकतात. श्रेयसने व्यंगचित्राचा धागा पकडून ठेवला असून, वाचकांची दृष्टी निकोप होण्यासाठी या चित्रांचा उपयोग होईल.''

चित्रे जन्माला आल्यावर आनंद देतातच; पण त्यांच्या निर्मितीची प्रक्रियाही आनंददायी असते, असे मनोगत श्रेयस नवरे यांनी मांडले.

### * बालचित्रपट प्रदर्शनासाठी अनुदान!



बालचित्रपट पाहण्याचा अनुभव खेड्यापाड्यातील बालचमूलाही मिळावा, यासाठी 'बाल चित्र समिती'तर्फे (सीएफएसआय) मोफत बालचित्रपट दाखविण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. सध्या सुरू असणाऱ्या संस्थेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त हा उपक्रम हाती घेण्यात येईल.

पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या पुढाकाराने स्थापन झालेल्या 'सीएफएसआय'ने नुकतेच पन्नासाव्या वर्षात पदार्पण केले. मनोरंजनाद्वारे मुलांचे शिक्षण करण्याचे उद्दिष्ट या संस्थेने पुढे ठेवले आहे.

सध्या देशातील अनेक राज्यांमध्ये सवलतीच्या दरांमध्ये समितीचे बालचित्रपट दाखविले जात असले, तरी त्यामध्ये अनेक समस्या असल्याचे सांगून विपणन व्यवस्थापक अतहर शेख म्हणाले, ''आगामी काळात देशातील अधिकाधिक मुलांपर्यंत पोहोचायचे झाल्यास सवलतीच्या दरापेक्षाही मोफत चित्रपट दाखविणे अधिक सोयीचे ठरणार आहे. त्यासाठी पुढील वर्षीपासून सुरू होणाऱ्या अकराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये (२००७-१२) सरकारने बाल चित्र समितीला केवळ चित्रपटाच्या निर्मितीसाठीच नाही, तर त्याच्या प्रदर्शनासाठीही अनुदान उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.''

बाल चित्र समितीच्या अध्यक्षा नफिसा अली यांनीही या प्रस्तावाला पाठिंबा दिला असून, सरकारकडून त्याला मंजुरी मिळाल्यास शहरांपासून वाड्या-वस्त्यांवर राहणाऱ्या बालकांना चित्रपटांचा आनंद अल्प दरात घेता येईल असे त्यांनी सांगितले.

सुवर्णमहोत्सवी वर्षात येत्या नोव्हेंबरमध्ये 'डिजिटल फिल्म फेस्टिव्हल'ही आयोजिण्याचा संकल्प असल्याचे सांगून ते म्हणाले, ''मुलांशी संबंधित विषयावर अनेक छोटे लघुपट, माहितीपट आणि अनुबोधपट सध्या निर्माण केले जात आहेत. अपुऱ्या 'बजेट'मुळे प्रेक्षकांपर्यंत हे चित्रपट पोहोचू शकत नाहीत. त्यांना व्यासपीठ निर्माण व्हावे, या उद्देशाने दिल्लीत हा महोत्सव होणार आहे.

### * पोलीस ठाण्याच्या आवारात वाचनालय

प्रत्येकाला सर्व बाबतीत यश मिळेलच असे नाही, पण सर्वांनी शहाणे होणे ही आजची गरज असून त्यासाठी किमान वाचन आवश्यक आहे असे प्रतिपादन आमदार दिलीप देशमुख यांनी केले.

लातूर, गांधी चौक पोलीस ठाण्याच्या आवारात लोकसहभागातून सुरू करण्यात आलेल्या वाचनालयाचे उद्‌घाटन देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.

पोलीस ठाण्याच्या आवारात ग्रंथ व वृत्तपत्र वाचनाची सोय असणारे महाराष्ट्रातील लातूर हे एकमेव पोलीस ठाणे असावे.

फार काही वाचायला जमले नाही तर किमान दासबोध, तुकारामाची गाथा,

ज्ञानेश्वरी हे ग्रंथ वाचलेच पाहिजेत. पोलिसांनी सुरू केलेल्या या उपक्रमाला १०१ पुस्तके व संगणक आपण भेट देणार असल्याचे त्यांनी जाहीर केले.

जिल्हा पोलीस प्रमुख डॉ. सुहास वारके यांनी प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी लोकसहभागातून वाचनालय सुरू करण्यात येणार असल्याचे सांगितले. पोलीस कर्मचाऱ्यांना देखील माहितीच्या बाबतीत मागे राहून चालणार नाही म्हणून वाचनालयाचा उपक्रम हाती घेतला असल्याचे सांगितले.

पोलीस उपाधीक्षक शहाजी उमाप यांनी आपल्या प्रास्ताविकात म्हटले की, ३० डिसेंबर २००५ रोजी वाचनालयाचे भूमिपूजन केले व २२ फेब्रुवारी २००६ रोजी बांधकामास शुभारंभ केला. २२ एप्रिल रोजी बांधकाम पूर्ण केले. अवघ्या साठ दिवसांत लातूरकर मंडळींच्या सहभागामुळे हा उपक्रम यशस्वी होऊ शकला.

उपनगराध्यक्षा खाजाबानू बुऱ्हाण यांनी बालकांसाठी १०१ पुस्तके देण्याचे जाहीर केले. शहरातील विविध मान्यवरांनी देणगीदाखल वाचनालयाला पुस्तके दिली.

### * पुस्तक प्रकाशनक्षेत्रात भारताचा जगात सहावा क्रमांक

पुस्तक प्रकाशनाच्या क्षेत्रात भारताचा जगात सहावा क्रमांक असल्याचे 'युनेस्को'ने केलेल्या पाहणीत आढळले आहे.

'युनेस्को'ने १९९५ मध्ये 'पुस्तक व स्वामित्व हक्क दिन' साजरा करण्याची घोषणा केली. भारतात हा दिन अजून फारस प्रचलित झालेला नाही. मात्र, जगभरात तीस देशांत हा दिवस मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो.

भारतात २००१ ते २००४ या काळात दरवर्षी सरासरी १७ हजार पुस्तकांप्रमाणे सुमारे ६८ हजार पुस्तके प्रकाशित झाल्याचे 'युनेस्को'च्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. प्रकाशन क्षेत्रात अमेरिका, इंग्लंड, जर्मनी, रशिया व फ्रान्स या देशांनंतर भारताचा क्रमांक लागतो. आशियाई देशांत भारत पहिल्या क्रमांकावर आहे. त्यानंतर जपान व चीन या देशांचा क्रमांक लागतो. २००५ मध्ये भारतात विविध भाषांमध्ये वीस हजार पुस्तके प्रकाशित झाली. त्यात इंग्रजी, हिंदी, मल्याळी, बंगाली, कन्नड या पाच भाषांनंतर मराठीचा क्रमांक लागतो.

भारतात पुस्तकांची पुनर्विक्रीही मोठ्या प्रमाणात चालते. काही दुकानांमध्ये खास जुनी पुस्तकेच मिळतात, हे पुस्तकप्रेमींना माहीत असते, आता जुन्या पुस्तकांची ऑनलाइन खरेदीही शक्य आहे. **www.secondhandbooksindia.com** या संकेतस्थळावर जुनी पुस्तके उपलब्ध आहेत.

### * डॉ. माशेलकर यांना नॅशनल ॲकॅडमी ऑफ सायन्सचे सदस्यत्व

ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर आणि विश्वविख्यात अर्थशास्त्रज्ञ डॉ. अविनाश दीक्षित या दोन मराठी शास्त्रज्ञांना अमेरिकेतील 'नॅशनल ॲकॅडमी ऑफ सायन्स' या जगप्रसिद्ध संस्थेने २२ एप्रिल रोजी वॉशिंग्टनमध्ये सदस्यत्व देऊन



गौरविले. विशेष म्हणजे संस्थेच्या गेल्या सुमारे दीडशे वर्षांच्या इतिहासात आजवर फक्त सात भारतीयांना हा बहुमान लाभला आहे.

नॅशनल ॲकॅडमी ऑफ सायन्सचा पुरस्कार विज्ञान जगतात प्रतिष्ठेचा मानला जातो. ॲकॅडमीचे सुमारे २००० सदस्य असून त्यातील १९० सदस्य नोबेलविजेते आहेत. वैज्ञानिकाच्या एखाद्या विशिष्ट शोधासाठी नव्हे तर त्याच्या एकंदरीत कामगिरीच्या आधारे ॲकॅडमी स्वत:हून या शास्त्रज्ञाला आपले सदस्यत्व प्रदान करीत असते. (या ॲकॅडमीचे सदस्यत्व मिळणे हाच बहुमान असतो.)

डॉ. माशेलकर आणि डॉ. दीक्षित हे महाविद्यालयीन जीवनापासूनचे सहाध्यायी आहेत. मुंबईतील जयहिंद महाविद्यालयात दोघांनी एकाच वेळी प्रवेश घेतला होता. डॉ. माशेलकर यांनी रसायनशास्त्र हा विषय निवडला तर डॉ. दीक्षित यांनी मॅथेमॅटिक्स घेऊन नंतर अर्थशास्त्रात मुशाफिरी केली. डॉ. माशेलकर सध्या 'कौन्सिल ऑफ सायन्टिफिक रिसर्च (सीएसआयआर) या भारतातील सर्वोच्च वैज्ञानिक संस्थेचे प्रमुख आहेत. तर डॉ. दीक्षित अमेरिकेतील प्रिन्स्टन विद्यापीठात अर्थशास्त्राचे प्राध्यापक आहेत.

### * भगतसिंगांचे साहित्य मराठीत प्रसिद्ध करावे

शहीद भगतसिंग यांचे जन्मशताब्दी वर्ष येत्या सप्टेंबरपासून सुरू होत असून त्यानिमित्त राज्य सरकारने भगतसिंगांचे समग्र लिखाण प्रकाशित करावे, अशा मागणीचे पत्र मुख्यमंत्र्यांकडे पाठवण्यात आले आहे. डॉ. नरेंद्र दाभोलकर, न्या. पी. बी. सावंत, डॉ. श्रीराम लागू, प्रा. ग. प्र. प्रधान, उल्हास पवार, प्रा. राम बापट, भाई वैद्य, सुधीर बेडेकर, डॉ. राजा दीक्षित यांच्या त्यावर सह्या आहेत.

भगतसिंगांचे व्यक्तिमत्त्व आणि त्यांचे विचार हा भारतीय स्वातंत्र्य संग्रामाचा एक महान वारसा असून त्यांनी भूमिगत असताना लिहिलेले लेख, टिपणे, पत्रके, निवेदने तसेच विविध खटल्यांमध्ये घेतलेल्या भूमिका आणि कारागृहातील रोजनिशी यामधून त्यांच्या अभ्यासाचे, वैचारिक विकासाचे आणि चिंतनाचे पैलू समोर येतात.

### * मराठी पुस्तकांच्या बनावट आवृत्त्या

'अल्केमिस्ट', 'द मंक हू सोल्ड हिज फेरारी', 'दा विन्ची कोड'... इ. शिव खेरांपासून ते डॅन ब्राउनपर्यंतच्या लेखकांनी इंग्रजी पुस्तके पन्नास-शंभर रुपयांत मिळणे, ही काही नवी गोष्ट नाही. मात्र प्रकाशकांचे, साहित्यिकांचे दिवाळे काढणाऱ्या या 'पायरसी'चा फटका आता मराठी साहित्यालाही बसू लागला आहे. मराठीतील 'अग्निपंख'सारख्या पुस्तकांच्या बनावट आवृत्त्या निघाल्या आहेत. हा प्रकार न रोखल्यास मराठी प्रकाशन व्यवसाय धोक्यात येईल, अशी भीती व्यक्त केली

जात आहे.

### * संत रामदासांवरील माहितीपट

राष्ट्रसंत रामदासस्वामी यांच्यावर 'आनंदवन भुवनी' या नावाचा अडीच तासांचा माहितीपट ३० एप्रिल रोजी ई-टीव्हीवर दाखवण्यात आला. डॉ. मुकुंद राईलकर यांनी रामदासस्वामींची मध्यवर्ती भूमिका केली आहे. संजय दाबके यांनी दिग्दर्शन केले आहे. अरुण गोडबोले यांच्या मदतीने ई-टीव्हीचे मराठी विभागप्रमुख सुहास जागीरदार यांनी हा माहितीपट तयार केला.

'आनंदवन भुवनी'ची संहिता डॉ. अरुणा ढेरे यांनी लिहिली असून सुधीर मोघे आणि शशांक पोवार यांनी रामदासांच्य पदांना चाली लावल्या आहेत. रवींद्र साठे, उपेंद्र भट, अनुराधा मराठे, रघुनंदन पणशीकर आणि अभिजित कोसंबी यांनी ती गायली असून समर्थ सेवा मंडळाचे मारुतीबुवा रामदासी यांनी 'कल्याण करी रामराया' ही रचना भैरवीत सादर केली आहे.

प्रकाश इनामदार यांनी समर्थांनी लिहिलेले शाहिरी सवाल-जबाब, तर कीर्तनकार चारुदत्त आफळे यांनी 'दासबोधा'तील मूर्ख, उत्तमपुरुष आणि निद्रापुराणातील समर्थांचा उपदेश खास ढंगात मांडला आहे. निवेदन अरुण नलावडे यांचे आहे. 'आनंदवन भुवनी'ची सुरुवात संतसाहित्यावरील भाष्यकार प्राचार्य शिवाजीराव भोसले यांच्या छोट्याशा निरूपणाने झाली आहे.

रामदासांचा पहिला मठ असणारे चाफळ, शिंगणवाडी, शिष्य कल्याण महाराजांचा मठ असणारे डोमगाव टाकळी, धुळ्यातील वाग्देवी मंदिर, तसेच शिवथर घळ, सज्जनगड याठिकाणी हे शूटिंग झाले. रामदासस्वामींचे कार्य आणि त्यांच्या जीवनातील अद्‌भुत नाट्य पाहता त्याला पूरक असणारी माहिती आणि कागदपत्रेही या माहितीपटात समाविष्ट करण्यात आली आहेत. त्यामध्ये चाफळमधील आश्रमाच्या जमिनीची शिवाजीराजांची सनद, तसेच सज्जनगडावरील किल्लेदाराला शिवरायांनी पाठवलेले पत्र यांचा समावेश आहे.

### * पुणे विद्यापीठात 'नॅशनल लॉ स्कूल'

पुणे विद्यापीठात आंतरराष्ट्रीय दर्जाचे, विधी अभ्यासक्रमासाठी लागणाऱ्या सुविधांनी सज्ज असे 'नॅशनल लॉ स्कूल' काढण्याचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेने नुकताच मंजूर केला आहे.

देशात सध्या हैदराबाद, बंगळूर, कोलकाता, गांधीनगर या ठिकाणी 'नॅशनल लॉ स्कूल' आहेत. त्याच धर्तीवर पुण्यात असे 'स्कूल' काढण्याबाबत हंगामी कुलगुरू रत्नाकर गायकवाड यांनी पुढाकार घेतला आहे. या 'स्कूल'अंतर्गत पदविका, पदवी, पदव्युत्तर आणि पीएच.डी. अशा सर्व अभ्यासक्रमांचे शिक्षण विद्यार्थ्यांना मिळू शकेल. अनेक विधी महाविद्यालयांमध्ये पदवी अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी पुरेसे प्राध्यापक नसल्याने अतिथी



प्राध्यापक नेमण्यात येतात. या 'स्कूल'मध्ये केवळ प्राध्यापक-व्याख्याता दर्जाचे शिक्षकच सर्व अभ्यासक्रमांसाठी असतील.

### * ज्ञान आयोगाच्या सल्लागारपदी डॉ. कोळस्कर

केंद्र सरकारने सॅम पित्रोदा यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या ज्ञान आयोगावर पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. अशोक कोळस्कर यांची सल्लागार म्हणून नियुक्ती झाली आहे.

प्राथमिक ते उच्चशिक्षण क्षेत्रातील शिक्षकांचे शिक्षण, नवकल्पनांचा शोध आणि खेड्यापाड्यात शिक्षणाचे जाळे निर्माण करणे अशा तीन बाबींवर डॉ. कोळस्कर काम करणार आहेत. ही नियुक्ती तीन वर्षांसाठी आहे. या आयोगात आठ सदस्य आहेत.

''विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा नवकल्पना राबवताना कसा उपयोग करता येईल, हे ठरवणे त्यांचे मुख्य काम असेल. आभासी वर्ग, सार्वजनिक उद्योग आणि खासगी क्षेत्राचे सहकार्य याचा शिक्षण तळागाळात पोहोचविण्यासाठी कसा उपयोग होऊ शकेल, शिक्षकांचा दर्जा कसा वाढवायचा याबाबत विविध प्रारूपांचा अभ्यास करून पथदर्शी प्रकल्प तयार करणे आणि तो मोठ्या स्तरावर राबवणे हासुद्धा त्यांच्या कामाचा भाग आहे.''

### * 'मूळ गीतरामायण' सीडीवर आणण्याची योजना

पुणे आकाशवाणीच्या दुर्मिळ स्वरखजिन्यातून बाहेर निघालेल्या गेल्या वर्षभरात २५ सीडी/कॅसेट बाजारात आल्या. सुमारे दोन हजार कॅसेट-सीडींची विक्री पुणे आकाशवाणी केंद्रात गेल्या वर्षात झाली आहे. त्यात कर्नाटकी संगीतातल्या एम. एस. सुब्बालक्ष्मी यांच्यापासून धृपदगायनासाठी प्रसिद्ध असणारे डागर बंधू, बंदिश-ठुमरी गायिका सिद्धेश्वरी देवी, उस्ताद आमिर खाँ अशा दिग्गजांचे अत्यंत दुर्मिळ रेकॉर्डिंग आहे, असे पुणे आकाशवाणी केंद्राचे संचालक शरद भोसले यांनी सांगितले. भीमसेनजींचा आवाजही रसिकांना नक्कीच पुन्हा ऐकायला आवडेल, हे लक्षात घेऊन सीडी काढण्यात येणार आहे. याशिवाय पुणे आकाशवाणी केंद्राच्या 'मर्मबंधातली ठेव' असणारे 'गीत रामायण' कॅसेट-सीडींच्या स्वरूपात रसिकांपर्यंत पोहोचवण्यात येणार आहे. गदिमांचे शब्द आणि बाबूजींचे संगीत आकाशवाणीवर आणण्यासाठी झटणाऱ्या सीताकांत लाड यांचा आवाज, प्रभाकर जोशी यांचे निवेदन आणि ५६ गीते यांचे रेकॉर्डिंग याला आता तब्बल ५० वर्षे झाली आहेत. त्याच्या १२ कॅसेटस्/सीडी होतील.

### * शुद्धलेखन हा आग्रह न राहता सवय व्हावी

शुद्धलेखन हा आग्रह न राहता ती सवय झाली पाहिजे, असे प्रतिपादन ठाण्याचे शुद्धलेखनतज्ज्ञ अरुण फडके यांनी केले आहे. ग. धों. देशपांडे

स्मृतिन्यासाच्या 'वाचन उत्तेजन योजना २००६' अंतर्गत 'शुद्धलेखन कार्यशाळे'चे उद्घाटन प्रा. सु. मा. कुलकर्णी यांच्या हस्ते झाले.

एक दिवसाच्या कार्यशाळेत तक्त्यांच्या आधारे शुद्धलेखनाशी मैत्री कशी करता येते याचे रंजक व उद्बोधक विवेचन फडके यांनी केले.

शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षणात शुद्धलेखनाच्या संपूर्ण शिक्षणाचा अभाव, पालकांबरोबरच अध्यापक आणि प्राध्यापक यांचेही शुद्धलेखनाबाबतचे अपुरे ज्ञान, इंग्लिश आणि हिंदी भाषांचे होणारे अतिक्रमण थांबविण्यासाठी मराठी माणसाने जागरुक राहून आपल्या घरात, कार्यालयात, व्यवसायाच्या ठिकाणी सतत मराठीत बोलण्याची सवय ठेवावी, असे ते म्हणाले. भाषा, संगीत व संस्कृती यापैकी एक जरी बुरुज ढासळला तर उर्वरित आपोआपच ढासळतात. राष्ट्र रसातळाला जाते, असा इशारा त्यांनी दिला.

शुद्धलेखनाचा व्यासंग करून मुद्रितशोधन करणे हा भावी काळात उत्तम व्यवसाय ठरू शकतो. लेखनिक, मुद्रितशोधक पुरेसे मिळत नाहीत. पत्रकार आणि शिक्षकांचे शुद्धलेखन चांगले असेल तर विद्यार्थी व वाचकांसमोर अयोग्य लेखन येणार नाही, हे लक्षात येऊन शिक्षक आणि पत्रकारांसाठी शुद्धलेखन कार्यशाळा आयोजित कराव्यात, अशी सूचना सु. मा. कुलकर्णी यांनी केली.

### * 'काव्य'हेही कंठसंगीताचे महत्त्वाचे अंग : मुकुल शिवपुत्र

''सूर, ताल, लयीप्रमाणे 'काव्य' हेही कंठसंगीताचे एक महत्त्वाचे अंग आहे. आपल्या काही संगीतकारांमध्ये 'काव्या'कडे कमी लक्ष देण्याकडे कल असदिसतो. निदान ठुमरी, गजल गाणाऱ्यांनी तरी शब्दांकडे, काव्याकडे लक्ष देणे अपेक्षित आहे...'' असे मत प्रसिद्ध गायक मुकुल शिवपुत्र यांनी व्यक्त केले.

मुकुल यांच्या प्रात:कलीन रागगायनाची मैफल 'आशय सांस्कृतिक' तर्फे १ मे रोजी टिळक स्मारक मंदिरात झाली.

''संगीताचा माझा अभ्यास आणि रियाज वयाच्या बाराव्या वर्षापासून सुरू झाला. बरेच शिक्षण अर्थात कुमारजींकडे झाले. कुमारजींचा लोकगीते, साहित्य आणि अन्य कलांचा अभ्यास होता. कुमारजी अनेक दुर्मिळ ध्वनिमुद्रिका आणायचे. अनेकांच्या मैफली व्हायच्या. सकारात्मक दृष्टिकोनातून कुमारजींचे प्रयोग आकाराला आले. त्यांच्यासारखी नवरागनिर्मिती अन्य कुणाकडून घडणे कठीण आहे,'' असे ते म्हणाले.

'रेडिओवर कर्नाटक संगीत ऐकल्यावर त्यात पाठांतराला अधिक महत्त्व असल्याचे माझ्या लक्षात आले. प्रयत्नांती ते थोडेफार पदरात पडले. हिंदुस्थानी संगीतात 'उपज' अंग महत्त्वाचे असते. यासाठी मी पं. के. जी गिंडे यांच्याकडे मोजक्याच रागात धृपदाची आलापी शिकलो. बडे गुलाम अली, केसरबाई केरकर, रहिमतखाँ, बेगम अख्तर यांचे गाणे आवडायचे. पं. भीमसेनजींकडेही काही



काळ शिकलो. अजूनही शिकण्याची इच्छा आहे.''

### * निनाद बेडेकर शिवचरित्राबाबत मौन बाळगणार

लाल महालातील दादोजी कोंडदेव यांचा पुतळा काढून टाकण्याच्या मागणीच्या पार्श्वभूमीवर यापुढे शिवचरित्रावर काही लिहावयाचे आणि बोलावयाचे नाही, असे इतिहासाचे अभ्यासक निनाद बेडेकर यांनी १ मे रोजी जाहीर केले.

एका पत्राद्वारे आपली भूमिका त्यांनी सविस्तर स्पष्ट केली आहे.

''ब्राह्मण समाजाने इतिहासावर, विशेषत: शिवचरित्रावर काही लिहू-बोलू नये, अशा अर्थाची मागणी काही संघटनांनी केली आहे. काही तुरळक अपवाद वगळता या मागणीला समाजातून काही विरोध झालेला नाही. अशा परिस्थितीत ब्राह्मणांनी शिवचरित्रावर लिहिण्या-बोलण्याने समाजात कटुता निर्माण होत असेल, तर ब्राह्मणांनी शिवचरित्रावर काही लिहू-बोलू नये, असे माझे मत बनले आहे. त्यानुसार मी ब्राह्मण असल्याने, मी यापुढे शिवचरित्रावर काही लिहावयाचे वा बोलावयाचे नाही, असे ठरविले आहे,'' असे श्री. बेडेकर यांनी म्हटले आहे.

''इ.स. १६३० मध्ये आदिलशाही सरदार रायारावाने पुण्याचा कसबा लुटून तेथे गाढवाचा नांगर फिरविला. पुण्याचा कसबा ओस पडला. पुढे १६३६ मध्ये शहाजी महाराजांना पुणे परगणा मुकासा मिळाला. रायारावाने पुण्यातून जाताना एक लोखंडी पहार जमिनीत ठोकून ठेवली होती. याचा अर्थ असा होता की, आता इथे कोणी वस्ती करावयाची नाही, दिवा लावायचा नाही, जमीन नांगरायची नाही. रानोमाळ गेलेल्या लोकांमध्ये विश्वास उत्पन्न करण्यासाठी दादोजी कोंडदेवांनी लोकांना कौल देऊन बोलावले. त्या प्रसंगी नांगराला सोन्याचा फाळ लावून ही भूमी नांगरली. पुण्याच्या इतिहासातील हा क्षण अत्यंत रोमांचकारी आहे. पुण्याच्या भरभराटीची ही सुरुवात आहे. पुणे महापालिकेने हा रोमांचकारी क्षण समूहशिल्पाद्वारे पकडून ठेवला आहे. सहा कलमी शकावलीत गाढवाच्या आणि सोन्याच्या नांगराची नोंद आहे आणि त्यात दादोजी कोंडदेव मलटणकराचेच नाव आहे. त्यामुळे दादोजींचा पुतळा काढून टाकावा, ही मागणी कितपत योग्य आहे, हे जनतेने ठरवावे,'' असे श्री. बेडेकर यांनी म्हटले आहे.

### * राहुल बोस यांचे प्रभावी कथावाचन

मुंबईतील महालक्ष्मी परिसरात भीक मागून जगणारी सुनीता, अचानक पाच कोटी रुपये मिळालेला गरीब शेतकरी रामसिंग आणि रेल्वे अपघाताचे घाव मनावर कायमचे कोरले गेलेला राजू अशी लघुकथेतील पात्रे अभिनेता राहुल बोस यांनी अभिवाचनाने जिवंत केली.

असोसिएशन ऑफ ब्रिटिश स्कॉलर्स आणि ब्रिटिश लायब्ररी यांच्या वतीने नीरू नंदा यांच्या 'इफ' या पुस्तकातील तीन लघुकथांच्या अभिवाचनाचा कार्यक्रम

झाला. शहरी मानसिकता आणि समस्यांभोवती फिरणाऱ्या ११ कथांचा या पुस्तकात समावेश आहे. सौ. नंदा यांनी चित्रमयी शैलीत लिहिलेल्या या कथा मानवी संबंधांचा उत्कटतेने ठाव घेतात. राहुलने यातील 'मेंटॉरिंग सुनीता', 'सायलेंट रिव्हर' आणि 'द पीक' या कथांचे अभिवाचन केले.

अभिवाचनानंतर सौ. नंदा आणि राहुल बोस यांनी श्रोत्यांशी संवाद साधला. ''नियती माणसाला घडवत असते. प्रत्येकाच्या आयुष्यात अपरिहार्यपणे येणारा हा 'जर' त्याच्या आयुष्यावर खोलवर परिणाम करणारा असतो. माझ्या कथांमध्ये मी हेच मांडायचा प्रयत्न केला आहे. त्यामुळेच या पुस्तकाचे नाव 'इफ' ठेवले,'' असे सौ. नंदा यांनी सांगितले.

## * नवोदित साहित्य संमेलन

ज्येष्ठ साहित्यिक आणि समीक्षक डॉ. आनंद यादव यांच्या अध्यक्षतेखाली २७ आणि २८ मे रोजी दहावे भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलन संपन्न झाले.

या दशकपूर्ती संमेलनात कविसंमेलन, कथाकथन आणि चर्चासत्रे, परिसंवाद ठेवण्यात आले होते. 'मराठी साहित्यातील ग्रामीण साहित्याचे योगदान', 'मराठी साहित्य संस्कृती आणि लोककला यांच्यावर दूरचित्रवाणीचे आक्रमण किती तारक, किती मारक' आणि 'समाज परिवर्तनात साहित्याचे स्थान' यांचा समावेश होता. डॉ. यादव यांची प्रकट मुलाखतही झाली.

## * 'ब्रिटिश लायब्ररी'चा 'पुस्तक मैत्री' उपक्रम

लहान वयातच वाचनाची गोडी लागावी, यासाठी त्यांच्या आकलनशक्तीला अनुरूप अशी अनेक पुस्तके 'ब्रिटिश लायब्ररी'त मुलांसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहेत. या पुस्तकांवर आधारित एक स्पर्धाही आयोजिण्यात आली आहे.

''जागतिक ग्रंथदिनाच्या अनुषंगाने सात ते बारा या वयोगटातील मुलांसाठी 'पुस्तक मैत्री' उपक्रम आयोजिण्यात आला आहे. सध्या या उपक्रमांतर्गत मुलांच्या भावविश्वाशी निगडित सुमारे शंभर पुस्तके उपलब्ध असून, त्यातील जास्तीत जास्त पुस्तके मुलांनी वाचावीत, असा प्रयत्न आहे. त्यासाठी 'लॉग बुक' तयार करण्यात आले आहे. ३० जूनपर्यंत वाचलेल्या पुस्तकांची नोंद केली जाणार आहे. या उपक्रमात सहभागी होणाऱ्या प्रत्येक मुलाला प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.''

मुलांच्या बुद्धीला चालना मिळावी यासाठी वाचलेल्या पुस्तकांविषयी काय वाटते, हेदेखील त्यांनी लिहायचे आहे. पुस्तकाच्या परीक्षणासाठी तीन मुलांना पारितोषिके दिली जाणार आहेत.



## * साहित्य-संस्कृती मंडळाच्या अध्यक्षपदी मधू मंगेश कर्णिक

ज्येष्ठ साहित्यिक मधू मंगेश कर्णिक यांना राज्य शासनाने २८ एप्रिल रोजी त्यांच्या वाढदिवशी अनोखी भेट दिली. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या अध्यक्षपदी शासनाने त्यांची नेमणूक केली.

मधू मंगेश कर्णिक यांचा जन्म २८ एप्रिल १९३१ रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील करूळ गावी झाला. कथा, कादंबरी, ललितगद्य, नाटक, चित्रपट, दूरदर्शन मालिका, बालवाङ्मय, वृत्तपत्रीय स्तंभलेखन यांसारखे विविध वाङ्मय प्रकार सातत्याने आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने हाताळणाऱ्या मधू मंगेश कर्णिक यांनी विद्यार्थिदशेतच साहित्यनिर्मितीला सुरुवात केली. १९५८ मध्ये त्यांचा 'कोकणी वस्ती' हा पहिला कथासंग्रह प्रसिद्ध झाला. रत्नागिरीत १९९० मध्ये झालेल्या ६४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. त्यानंतर इंदूर येथील शारदीय साहित्य संमेलन, ४६ वे औदुंबर साहित्य संमेलन, पुणे येथील दुसरे जलसाहित्य संमेलन; तसेच चिपळूण येथे झालेल्या दहाव्या कामगार साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले आहे.

उत्कृष्ट वाङ्मयनिर्मितीच्या राज्य शासनाच्या अनेक पुरस्कारांबरोबरच मॅजेस्टिक पुरस्कार, फुले-आंबेडकर स्मृती पुरस्कार, मॅग्नम फाउंडेशन पुरस्कार, दमाणी साहित्य पुरस्कार, रणजित देसाई साहित्य पुरस्कार, कोकण साहित्य भूषण यासारखे विविध पुरस्कार त्यांना बहाल करण्यात आले आहेत. कर्णिक यांचे 'कोकणी ग वस्ती' नंतर पारध, तोरण, भुईचाफा, तहान, झुंबर, केवडा, दरवळ, कमळण यासारखे अनेक कथासंग्रह प्रसिद्ध झाले असून, देवकी आणि माहीमची खाडी या त्यांच्या दोन्ही कादंबऱ्यांनी साऱ्या साहित्यविश्वाचे लक्ष वेधून घेतले.

## * 'क्रॉसवर्ड'कडून वर्षाला २५ लाख पुस्तकांची विक्री

वर्षाला पंचवीस लाख पुस्तकांची विक्री... देशातील वार्षिक उलाढाल ८३ कोटी रुपयांवर तर पुण्यातील उलाढाल वीस कोटींवर. मुख्यत: इंग्रजी पुस्तकांची विक्री करणाऱ्या 'क्रॉसवड'ची ही आकडेवारी. पुण्यातील नववे आणि देशातील बत्तिसावे दालन सुरू करताना 'क्रॉसवर्ड'ची ही स्थिती आहे.

'क्रॉसवर्ड'ने 'इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटर'मध्ये बारा हजार चौरस फूट क्षेत्रात नवे दालन उघडले आहे. त्याचे २३ एप्रिल रोजी उद्घाटन केल्यानंतर 'क्रॉसवर्ड'चे मुख्य कार्यकारी अधिकारी आर. श्रीराम व दालनाचे भागीदार दिनेश गुप्ता यांनी ही माहिती दिली. नव्या दालनात जवळपास ३५ हजार पुस्तके (टायटल्स) आहेत. त्याशिवाय सीडी, डीव्हीडीची विक्रीही तेथे होते. मराठी पुस्तकांचा विभागही त्य दालनात आहे.

श्रीराम म्हणाले, ''आमच्याकडे सर्वाधिक विक्री मुलांच्या पुस्तकांची व

रंजक साहित्याची होते. त्याखालोखाल कादंबऱ्यांचा खप होतो. व्यवस्थापन क्षेत्राकडे तरुणांचा ओढा असल्याने त्याविषयीच्या पुस्तकांनाही मागणी असते. ताणतणावांच्या वाढत्या प्रमाणामुळे मानसशास्त्र, स्वयंशिस्त, अध्यात्म या विषयांवरील पुस्तकेही मोठ्या प्रमाणावर खपतात.''

### * 'आनंदाचे डोही'चे प्रकाशन

''सध्याच्या जीवनात संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम उपयोगी पडतील का, या प्रश्नाचे उत्तर देताना मन, बुद्धी आणि आत्मा यांचे शिक्षण करण्याचे काम निरूपणकार करतात,'' असे मत विभागीय आयुक्त प्रभाकर करंदीकर यांनी व्यक्त केले.

डॉ. रामचंद्र देखणे यांनी लिहिलेल्या 'आनंदाचे डोही' या पुस्तकाचे प्रकाशन 'सकाळ'चे संपादक यमाजी मालकर यांच्या हस्ते झाले.

अभिरुची उच्च करण्यासाठी प्रवृत्त करणे म्हणजे संस्कार, असे सांगून श्री. करंदीकर म्हणाले, ''आपल्या जीवनात अनेक समस्या आहेत. मात्र, या समस्यांना उत्तर देण्याचे काम निरूपणकार करू शकतात. संतसाहित्य सध्याच्या जगातही उपयुक्त आहे.''

यमाजी मालकर म्हणाले, ''संतसाहित्यातील ओव्या आणि अभंग यांचा सध्याच्या काळाशी असलेला सुसंगत अर्थ 'आनंदाचे डोही'मधून पुढे येतो. ग्रामीण भागातील समाजाचे भावविश्व संतसाहित्याशी निगडित आहे. त्यातून अनेक मोठी कामे उभी राहू शकतात.''

''निरुपण हेच संतसाहित्याचे प्रयोजन आहे. आईच्या इच्छेखातर भारुडांमागील अर्थ शोधताना प्रबंध तयार झाला. संशोधकाने तळ शोधावा; पण तो गाठताना त्यातील नितळपणा हरवू नये, ही शिकवण त्या वेळी मिळाली.''

संतांच्या साहित्याने आजवर समाजाला एकत्र ठेवण्याचे काम केले आहे, असे सांगून तरुण पिढीच्या शिक्षणाला संतसाहित्याची जोड आवश्यक असल्याचे मत डॉ. दीपक टिळक यांनी मांडले.

### * मानसिक जागतिकीकरण ही आजची गरज

वेगाने विकसित होणारे तंत्रज्ञान आत्मसात करणारे मानसिक जागतिकीकरण ही आजची गरज आहे. तंत्रज्ञानाचे जागतिकीकरण आणि मानिकसतेचे जागतिकीकरण यातील अंतर किती प्रभावीपणे आणि जलद मिटवतो, यावर आपले भावी यश अवलंबून आहे, असे मत 'सकाळ'चे संपादक संचालक आनंद आगाशे यांनी व्यक्त केले.

'विपुलश्री' मासिकाच्या आठव्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित स्नेहमेळाव्यात ते अध्यक्षपदावरून बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून 'सिम्बायोसिस'चे संस्थापक



संचालक डॉ. शां. ब. मुजुमदार उपस्थित होते. मासिकाच्या संपादक माधुरी वैद्य, सल्लागार संपादक आशा कर्दळे या वेळी व्यासपीठावर उपस्थित होत्या. मासिकातर्फे घेण्यात आलेल्या वासंतिक कथास्पर्धेत यशस्वी झालेल्या रोहिणी झेंडे, मोहन जोशी, अरविंद लिमये, डॉ. अनघा केसकर, जयश्री पेंडसे, अंजली ठाकूर यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली; तसेच 'विपुलश्री'च्या मे महिन्याच्या वासंतिक अंकाचे प्रकाशन डॉ. मुजुमदार यांच्या हस्ते झाले.

अतिशय प्रतिकूल परिस्थितीत दर्जेदार मासिक सुरू ठेवल्याबद्दल 'विपुलश्री'च्या सर्व सहकाऱ्यांचे कौतुक करून श्री. आगाशे म्हणाले, ''तंत्रज्ञानाचा वेग प्रचंड आहे. त्याची केवळ ओळख पुरेशी ठरणार नाही, तर ते आत्मसात करणे आवश्यक आहे. नवे तंत्रज्ञान वापरणाऱ्या नव्या पिढीशी संवाद साधणे, तंत्रज्ञान हे संकट न मानता संधी मानणे ही भावी काळातील यशाची गुरुकिल्ली ठरेल.''

डॉ. मुजुमदार यांनी 'सहजीवन' ही संकल्पना स्पष्ट करून सामाजिक सहिष्णुता देश, भाषा, वंश, जात, धर्म यापलीकडची असल्याचे सांगितले. वनस्पती, प्राणी, पक्षी आणि मानवप्राणी हे सारेच परस्परपूरक असे सहजीवन कसे आचरतात, याचे विवेचन त्यांनी पारदर्शिकांच्या सहाय्याने केले. परीक्षकांच्या वतीने नंदा सुर्वे यांनी मनोगत मांडले. आशा कर्दळे यांनी आभार मानले.

### * चौथे अखिल भारतीय मराठा साहित्य संमेलन

''साहित्यात जात महत्त्वाची नसून, साहित्यिक कोणत्या जाणीवेतून व अंत:प्रेरणेतून लेखन करतो हे महत्त्वाचे आहे. हे संमेलन माणसाला भयमुक्त करणारे व्हावे,'' अशी अपेक्षा ख्यातनाम कवी फ. मुं. शिंदे यांनी चौथ्या अखिल भारतीय मराठा साहित्य संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी लातूर येथे व्यक्त केली.

प्रा. शिंदे म्हणाले, ''सध्या साहित्य कमी व संमेलने जास्त असा अनुभव येत आहे. साहित्यात अनेक प्रवाह येऊ लागले आहेत. अशा साहित्य संमेलनाची अंत:प्रेरणा काय आहे, ते सर्वांना बरोबर घेऊन जात आहेत काय; हे पाहणे महत्त्वाचे आहे. या देशात जात हे सत्य असून, ती सर्वांना जन्मजात चिकटली असते. मराठा समाजातील स्त्रियांच्या पाठीशी जिजाऊंची प्रबळ प्रेरणा आहे. त्या जातीतील महिलांनी आता लेखन केले पाहिजे. सर्व प्रवाहांना साहित्यिकांनी समजून घ्यावे. एकमेकांशी संवाद करून साहित्याने दोन वर्गांना जोडणे आवश्यक आहे.''

संमेलनाचे अध्यक्ष डॉ. साहेबराव खंदारे यांनी आपले भाषण वाचून दाखविले. मराठा समाजाचा सामाजिक, सांस्कृतिक इतिहास नव्याने लिहिला पाहिजे. मराठी साहित्याच्या इतिहासाचे पुनर्लेखन व्हावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

## * मराठी उद्योजकीय संमेलन

उद्योगधंद्यात यशस्वी होण्यासाठी मोठी स्वप्ने पाहायला शिका, धंदा म्हणजे समाजसेवा असून, बेईमानी करणे नाही; धंदा हे धनिक होण्याचे साधन आहे, असे मत शिवसेना खासदार मनोहर जोशी यांनी जागतिक मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजतर्फे आयोजित पहिल्या राष्ट्रस्तरीय मराठी उद्योजकीय संमेलनात व्यक्त केले. मराठी माणूस बदलण्याचा मराठा चेंबरचा प्रयत्न आहे, असेही ते म्हणाले. उद्योग करताना बारीकसारीक अडचणींचा बाऊ करू नये. काही माणसे दिवसभर रडत असतात. आता रडणे सोडा. तसेच मोठी स्वप्ने पाहायला शिका. उद्योगांच्या संधी सर्वत्र आहेत; त्यासाठी परदेशातच जायला हवे असे नाही. फक्त या संधींचा फायदा घेता यायला हवा. अपयश येणार नाही हा विश्वास बाळगून उद्योग केला तर यश नक्कीच येईल. कोणताही धंदा श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नाही. जो धंदा पैसा देतो तो श्रेष्ठ. तसेच एकाच वेळी तीन प्रकारचे उद्योग करा. एका प्रकारात थोडा धोका पत्करून धंदा करावा, दुसऱ्या प्रकारात स्थिर उत्पन्न देणारे व्यवसाय निवडा व तिसरा प्रकार म्हणजे त्याच वेळी घर चालावे म्हणून काही बचतही करा, अशी यशस्वी उद्योजकांची पंचसूत्रीही त्यांनी सांगितली.

ज्येष्ठ साहित्यिक प्रा. राम शेवाळकर यांनी उद्योगात मेहनत केली तर मान मिळेलच; साहस करणारा उद्योजक यशस्वी होईलच. मराठी मानसिकता उद्योजकांचा मत्सर करते; मात्र त्यांचे कष्ट पाहात नाहीत, असे शाब्दिक फटकारे मारले.

नोकरी म्हणजे न्यूनगंड आहे, आत्महीनता आहे, मानसिक गुलामगिरी आहे, पुरुषार्थाचा उपमर्द आहे. आज जागतिकीकरणाच्या युगात उद्योगधंद्यांचे संदर्भ बदलत आहेत. या परिस्थितीत साचेबद्ध मानसिकता चालणारच नाही, असे नियोजन मंडळाचे सदस्य भालचंद्र मुणगेकर म्हणाले.

## * मराठी व्याकरणावर चर्चासत्र

मराठी अभ्यास परिषदेच्या वतीने 'मराठी व्याकरणाचा पुनर्विचार' या विषयावर चर्चासत्र घेण्यात आले. प्रा. कृ. श्री. अर्जुनवाडकर, प्रा. उमाकांत कामत, डॉ. मिलिंद मालशे, डॉ. विनायक दुर्गे आणि डॉ. सुमन बेलवलकर या चर्चासत्रात सहभागी झाले होते.

मराठी व्याकरणाचा निव्वळ पुनर्विचार नव्हे, तर कृतियुक्त विचार व्हायला हवा, असे सांगून डॉ. गं. ना. जोगळेकर म्हणाले, ''मराठी व्याकरणावर संस्कृतचा प्रभाव असल्याने सुमारे सत्तर वर्षांपूर्वीच त्यामध्ये बदल व्हायला हवे होते, असा निष्कर्ष मराठी व्याकरण परिषदेने काढला होता. मात्र, आता व्याकरणामध्ये कोणत्या गोष्टींचा समावेश करायचा, काय वगळायचे, याचा निर्णय घेण्याची वेळ आली असून, जाणकारांनी त्याविषयी संशोधन करून फेरलेखन करावे.''



मराठीतील व्याकरण शिकविण्याची पद्धती अतिशय क्लिष्ट असून, त्यामुळे भाषेचे शत्रू निर्माण होतात, असे मत व्यक्त करून डॉ. सुमन बेलवलकर म्हणाल्या, ''मराठीच्या पाठ्यपुस्तकांमधून शिकविले जाणारे व्याकरण अत्यंत सदोष आहे. त्यामुळे वृत्त, अलंकार, समास यांचा अभ्यास करून प्रश्नपत्रिकेतील व्याकरणाशी संबंधित १५ गुण सहज मिळविता येतात. पण व्यावहारिक जीवनात व्याकरण कच्चे राहते. यामध्ये सुधारणा करण्यासाठी व्याकरण सध्याच्या युगाशी अधिकाधिक सुसंगत व्हायला हवे.''

नव्या युगात भाषा अनेकविध माध्यमांत वापरली जात आहे. मराठी भाषा आणि लेखन गतिमान युगात अधिक लवचिक होण्याची आवश्यकता आहे. भाषिक व्यवहारातील आकलन नव्या पिढीला सहज व्हावे, याकरिता व्याकरणानेही व्यापक भूमिका स्वीकारायला हवी, असे श्री. उमाकांत कामत यांनी सांगितले.

## * अनुवादकांना सुविधा देण्यासाठी आंतरभारती केंद्र

मेक्सिको, ब्राझील, दक्षिण आफ्रिका या देशांमध्ये प्रसिद्ध झालेले महत्त्वाचे पुस्तक अवघ्या काही महिन्यांतच इंग्रजी आणि युरोपीय भाषांमध्ये अनुवादित होते. पण एखाद्या भारतीय भाषेत काय चालले आहे, याची दुसऱ्या भारतीय भाषेत वर्षानुवर्षे गंधवार्ताही नसते, याचे कारण अनुवादाविषयी असलेली उदासीनता हेच आहे. 'विविधतेतून एकता' साधण्याच्या या कळीच्या मंत्राचे स्वप्न सानेगुरुजींनी पाहिले. त्या स्वप्नाचे महत्त्व जाणलेल्या मराठीतल्या त्यांच्या वैचारिक वारसदारांनी आता ही उदासीनता झटकण्याचे निकराचे प्रयत्न चालवले आहेत, त्याच प्रयत्नांचा भाग म्हणून रायगड जिल्ह्यातील माणगाव येथे आंतरभारती अनुवाद सुविधा केंद्राची स्थापना होत आहे.

माणगावातील वडघर येथे सानेगुरुजी राष्ट्रीय स्मारक ट्रस्टचे काम सुरू होतेच. तेथे पायाभूत सुविधा उभारून अनुवाद केंद्र स्थापण्याची कल्पना ज्येष्ठ प्रकाशक रामदास भटकळ यांनी मांडली. ती आता प्रत्यक्षात येत आहे.

या अनुवाद सुविधा केंद्राचे उद्घाटन सात मे रोजी सकाळी प्रभादेवीच्या पु. ल. देशपांडे कला अकादमीतल्या मिनी थिएटरमध्ये मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय खोले यांच्या हस्ते झाले. वीणा आलासे, डॉ. प्रमोद तेलगिरी, सुरेश दलाल, प्रा. जितेंद्र भाटिया आणि मंगेश पाडगावकर या अनुवादकांच्या उपस्थितीत कार्यक्रम झाला. त्यात अनुवादाच्या समस्या आणि केंद्राचे अपेक्षित स्वरूप याविषयीही खल झाला.

भटकळ म्हणाले की, अनुवादकांचे पूर्वानुभव उपलब्ध करून घेणे, प्रोत्साहन मिळणे आणि आर्थिक सहाय्य देणारी संस्था हवी असणे, या तीन मूलभूत गोष्टी अनुवादकाला हव्या असतात. आंतरभारती अनुवाद सुविधा केंद्रात या सुविधा

देण्याचे काम होणार आहे. अनुवादकाला अत्यल्प मोबदल्यात इथे चार-पाच महिने राहून शांतपणे काम करता येईल.

त्याच्या कामात उपयोगी ठरणारे साहित्य म्हणजे डिक्शनरीज, भाषांतर शास्त्राची पुस्तके, पूर्वसुरींच्या अनुभवांवरचे साहित्य, भाषांतरित पुस्तके त्याला मिळतील. गुजराती, कन्नड, कोकणी, मराठी आणि सिंधी या पाच भाषांत प्रारंभी अनुवादाचे काम होईल.

हिंदी, इंग्रजी या पूरक भाषा अर्थातच असतील. भाषांतराचे काम साहित्य अकादमी, नॅशनल बुक ट्रस्टसह अनेक खासगी संस्था करत आहेत. त्या सर्वांचे नेटवर्क तयार करून डेटाबेस बनवण्यात येईल.

## * तुकाराम डॉट कॉम

भारतामध्ये दहा कोटी व्यक्ती मराठी बोलतात. 'तुकाराम डॉट कॉम'मुळे तुकोबांसह मराठी संस्कृतीचाही संचार वाढतो आहे, ही नक्कीच आनंदाची गोष्ट असल्याचे कवी आणि समीक्षक दिलीप चित्रे यांनी सांगितले.

'माझ्या आईने माझी भारतीय संस्कृतीशी ओळख करून दिली आणि आता मी संत तुकारामांची वेबसाइटही मनापासून पाहतो; एवढेच नव्हे तर विठ्ठल आणि पंढरपूर आता मला जवळचे वाटू लागले आहेत. थँक्स टू मॉम. नाहीतर मी केवळ ब्रिटनी स्पिअर्सच्या साइटवरच समाधान मानले असते...' अमेरिकेत मियामी इथे राहणाऱ्या दोरायस्वामी या पंधरा वर्षांच्या विद्यार्थ्याची ही बोलकी प्रतिक्रिया संत तुकाराम वेबसाइटची वाढती लोकप्रियता स्पष्ट करण्यास पुरेशी आहे. संयुक्त राष्ट्रांच्या सभासद १९२ देशांपैकी १२४ देशांचे नागरिक ही वेबसाइट सातत्याने पाहात आहेत. याचाच अर्थ भारतीय संस्कृती आणि मराठी विचारसरणी या देशांमध्ये रुजत आहे.

'तुका झालासे ग्लोबल' अशी उक्ती सार्थ करणाऱ्या या साइटमुळे धर्मनिरपेक्षतेच्या आजच्या काळात पौर्वात्य, पाश्चिमात्य यांच्याबरोबरच इस्लामिक राष्ट्रांनीही तुकोबांना आपले मानले आहे! पाकिस्तानसह बहारिन, बांगलादेश, इजिप्त, इराण, पोर्तुगाल, कतार, सौदी अरेबिया, सुदान, तैवान, टर्की, तुर्कमेनिस्तान, संयुक्त अरब एमिरात अशा अनेक राष्ट्रांनाही तुकाराम तेवढेच प्रिय आहेत, तुकोबांशी आपले हृदय नाते वर्णन करणाऱ्या प्रतिक्रिया या देशातील अनेक नागरिकांनी वेबसाइटवर व्यक्त केल्या आहेत.

सुमारे चार वर्षांपूर्वी सुरू झालेल्या 'तुकाराम डॉट कॉम'चे इंजिनिअर दिलीप धोंडे यांनी या वेबसाइटची मराठीप्रमाणेच इंग्रजी आवृत्तीही काढली आहे.

## * गोविंदराव टेंबे यांचे चरित्र

मराठी संगीत रंगभूमीला नवी दिशा देणाऱ्या गोविंदराव टेंबे यांच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवी वर्षाची सांगता ५ जून रोजी झाली. त्यानिमित्त त्यांचे ७०० पानी चरित्र प्रकाशित झाले.

'स्वरसेतू' या परफॉर्मिंग आर्टसला वाहिलेल्या त्रैमासिकाच्या संस्थापिका-संपादिका डॉ. चारुशीला दिवेकर यांनी टेंब्यांविषयी इतस्ततः विखुरलेली माहिती प्रथमच एकत्रित आणिली.

इतिहासाच्या प्रत्येक टप्प्यावर टेंब्यांच्या कर्तृत्वाची मोहोर उमटली असली तरी त्यांच्या या कर्तृत्वाची म्हणावी तशी नोंद घेतली गेलेली नाही, याविषयी त्यांनी खंत व्यक्त केली.

मराठी संगीत रंगभूमीला नवी दिशा, नवे परिमाण देण्याचा मान त्यांच्याकडे जातो. टेंब्यांपूर्वी नाटककार स्वतःच आपल्या नाटकातील गाण्यांना चाली लावत. पण टेंबे हे हार्मोनियमवर ख्याल वाजविणारे पहिले संगीतकार होते. उस्ताद बिस्मिल्ला खाँनी शहनाईला मैफलीत आणले, तेच कर्तृत्व टेंब्यांनी हार्मोनियमबाबत गाजवले. त्यांनी नव्या बंदिशी लिहिल्या, रागांच्या वर्गीकरणाची स्वतःची पद्धत आणली. संगीतात अनेक प्रयोग केले. ते गायक, वादक, नट, शिक्षक, संवादलेखक आणि उत्तम समीक्षक असे सर्व काही होते. संगीत समीक्षेचे ते प्रणेते होते. अयोध्येचा राजा या पहिल्या बोलपटाचे नायक, गायक, संगीतकार होते.

## * 'गुगल' गेट्स इट!

'गुगल'मध्ये गेल्यानंतर जगाच्या कुठल्याही कानाकोपऱ्यातील माहिती क्षणार्धात हजर करणाऱ्या शक्तिशाली सर्च इंजिनपुढे मायक्रोसॉफ्टचे प्रमुख व संगणक क्षेत्रातील सम्राट बिल गेट्स यांनी मान झुकवली आहे. 'गुगल' आणि 'मायक्रोसॉफ्ट' यांच्यात जबरदस्त स्पर्धा निर्माण झाली आहे.

सर्च व इंटरनेट ॲडव्हर्टायझिंग या दोन क्षेत्रात गुगलने स्पर्धेच्या सुरुवातीला तरी जोरदार मुसंडी मारली आहे, याची कबुली खुद्द गेट्स यांनी दिली आहे. जाहिरातदारांसमवेत झालेल्या एका बैठकीत ते म्हणाले की, आम्ही लवकरच गुगलचे आव्हान यशस्वीरीत्या परतवून लावू. मायक्रोसॉफ्ट कंपनी नेहमीच आघाडीवर राहिली पाहिजे, असा आमचा प्रयत्न राहत आला आहे. गेट्स यांनी कबुली दिली की, काही महत्त्वाच्या प्रकल्पांमध्ये चुकीच्या व्यक्तींची नियुक्ती केल्याने आम्ही सुरुवातीला गुगलपेक्षा मागे पडलो. याउलट गुगलने 'सर्च'मध्ये तडफदार प्रगती केली. अर्थात याचा अर्थ सर्व क्षेत्र त्यांनी काबीज केले असा होत नाही. अजून बऱ्याच गोष्टी घडायच्या आहेत.

मायक्रोसॉफ्टच्या 'एमएसएन' आणि 'विंडोज लाईव्ह' या दोन उद्योगांमध्ये अंदाजे २ अब्ज डॉलरची अधिक गुंतवणूक करण्याचा विचार असल्याची घोषणा बिल गेट्स यांनी केली.

## * शतकाचा उदयास्त पाहणाऱ्या चंद्राबाई किर्लोस्कर

मागच्या पिढीतल्या पाश्चात्य विद्याविभूषित शिक्षणशास्त्रज्ञ आणि विचारवंत लेखिका श्रीमती चंद्रा कर्नाटकी यांचा जन्म बेळगाव जिल्ह्यातल्या खानापूरला सुविद्य सारस्वत कुटुंबात २६ एप्रिल १९०६ रोजी झाला.

आपल्या निष्कलंक कारकीर्दीने आणि स्फुट लेखनाने बाईंनी एक जमाना गाजविलेला होता. महाराष्ट्र सरकारच्या 'शिक्षण उपसंचालिका' या उच्च पदावरून चंद्राबाई १९६१ साली सेवानिवृत्त झाल्या. सरकारात तेरा वर्षे नोकरी करून नंतर पंचेचाळीस वर्षे निवृत्तीवेतन उपभोगणाऱ्या त्या एकमेव सेवक आहेत!

लंडनला जाऊन शिक्षणशास्त्रातली 'टी.डी.' ही पदविका आचार्य अत्रे यांनी मिळवली. त्यांच्यापासून स्फूर्ती घेऊन चंद्राबाई स्वबळावर लंडनला गेल्या आणि 'टीचर्स डिप्लोमा' (लंडन), आणि 'हायर डिप्लोमा इन एज्युकेशन' (डब्लिन) अशा दोन पदविका संपादन करून ब्रिटिशांच्या राजवटीत १९३५ साली हिंदुस्थानात परतल्या. हुजूरपागेत शिक्षिका म्हणून नोकरी केल्यावर त्यांची नेमणूक 'इन्स्पेक्ट्रेस ऑफ गर्ल्स स्कूल्स' या पदावर झाली. फिरतीची ती नोकरी नेकीने बजावल्यामुळे त्यांना महाराष्ट्र सरकारच्या 'शिक्षण उपसंचालिका' या वरिष्ठ पदावर बढती मिळाली. त्याअगोदर कुठल्याही महिलेने ते पद भूषविलं नव्हतं. त्या पदावरूनच १९६१ साली त्या पुण्यातच सेवानिवृत्त झाल्या.

त्यांचे वडील श्री. ना. कर्नाटकी संशोधक-चरित्रलेखक होते. न्यायमूर्ती तेलंग, डॉ. भांडारकर, डॉ. भाऊ दाजी लाड वगैरेंची चरित्रे त्यांनी लिहिली होती. चंद्राबाईंनी ललित लेखन केलं. कथा, कविता, प्रवासवर्णनं, निबंध, पोवाडे असं अनेक घाटांचं लेखन केलं. विशेष म्हणजे आपल्या आयुष्याची तारीखवार रूपरेषा बाईंनी लिहून ठेवली आहे. चंद्राबाईंच्या लेखांची कात्रणं, छायाचित्रं आणि महत्त्वाची कागदपत्रं, त्यांची भाची डॉ. वनमाला सरदेशपांडे यांच्या माहीमच्या घरी सुरक्षित आहेत.

चंद्रा कर्नाटकी अविवाहित, विनापाश आहेत. मंगलोरच्या रमादेवी या अध्यात्मिक गुरूंच्या त्या अनुग्रहित आहेत. त्यांनी सर्व आयुष्य पुण्यात काढलं. पंच्याऐंशीव्या वर्षी त्यांनी हिंगण्याच्या वृद्धाश्रमात स्वेच्छेने प्रवेश घेतला. अगदी अलीकडे त्यांचं स्मरण मंद झाल्यामुळे त्यांना 'संजीवन' रुग्णालयात ठेवलं आहे.

## * राजा केळकर म्युझियम- विकास प्रकल्प

''राजा दिनकर केळकर संग्रहालयाच्या विकास प्रकल्पासाठी राज्य सरकारचे सर्वतोपरी देईल,'' असे आश्वासन केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांनी केळकर संग्रहालयातील ग्राफिक आर्ट आणि मल्टिमीडिया स्टुडिओचे उद्घाटन करताना दिले. सौ. प्रतिभाताई पवार, बजाज उद्योगसमूहाचे राहुल बजाज, विभागीय आयुक्त प्रभाकर करंदीकर, महापालिका आयुक्त डॉ. नितीन करीर, डॉ. सतीश देसाई, संग्रहालयाच्या विकास प्रकल्पाचे समन्वयक सुधन्वा रानडे आणि व्यवस्थापन मंडळाचे सदस्य सुदर्शन रानडे, सुरेंद्र रानडे आणि सौ रेखा रानडे आदी या वेळी उपस्थित होते.

श्री. पवार यांनी संग्रहालयाची पाहणी केली; तसेच संग्रहालयाच्या प्रस्तावित विकास प्रकल्पाची ध्वनिचित्रफित पाहिली. निधीअभावी प्रलंबित राहिलेला केळकर संग्रहालयाचा विकास प्रकल्प पूर्ण होण्यासाठी कृषीमंत्री शरद पवार यांनी त्यामध्ये लक्ष घालावे, अशा स्वरूपाचे निवेदन संग्रहालयाच्या वतीने देण्यात आले. पुण्यात विकास प्रकल्पाच्या वास्तुरचनाकारांशी चर्चा करून प्रकल्पासाठीच्या निधीचा नेमका अंदाज घेण्यात येईल. दोन-तीन टप्प्यांमध्ये काम पूर्ण करण्यापेक्षा एकाच वेळी विकास प्रकल्पाचे सर्व काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने निधीची गरज आहे. त्यासाठी राज्याकडून वेळेत निधी मिळावा, यासाठी प्रयत्न केला जाईल.''

सुधन्वा रानडे म्हणाले, ''आंतरराष्ट्रीय स्तरावरील संग्रहालयाच्या तोडीच्या सर्व सुविधा नव्या प्रकल्पामध्ये देण्यात येतील. सरकारकडून वेळेत निधी उपलब्ध झाल्यास ठराविक मुदतीमध्ये सर्व काम पूर्ण करण्यात येईल.''

## * संस्कृत हस्तलिखितांना 'डिजिटल' स्वरूप!

संशोधकांसाठी उपयुक्त संस्कृत साहित्य उपलब्ध करून देणाऱ्या 'आनंदाश्रम' संस्थेतर्फे हस्तलिखितांचे 'डिजिटलायझेशन' करण्यात येणार आहे.

सध्या आनंदाश्रमात संस्कृतची दहा हजार हस्तलिखिते आहेत. ही हस्तलिखिते काळाच्या ओघात नामशेष होऊ नयेत, म्हणून त्यांचे कायमस्वरूपी जतन करण्यासाठी 'डिजिटलायझेशन' प्रक्रिया करण्यात येणार आहे.

त्याविषयी संस्थेचे कार्यकारी विश्वस्त वसंत आपटे म्हणाले, ''देशाच्या अनेक भागांतून अभ्यासू संशोधक संस्कृतशी संबंधित एखादा संदर्भ मिळविण्यासाठी संस्थेमध्ये येतात. संस्थेतील दहा हजार हस्तलिखितांमधून त्यांना आवश्यक असणारा ग्रंथ मिळण्यात बराच वेळ जातो. तसेच, कापडी दफ्तरांमध्ये ही हस्तलिखिते आजवर जतन केली असल्याने सततच्या हाताळणीच्या परिणामही त्यावर होत असतो. म्हणूनच, देश-विदेशातील संशोधकांना त्यातील माहिती एका 'क्लिक'वर उपलब्ध व्हावी, यासाठी त्याचे मायक्रोफिल्मिंग करण्यात येत आहे.

अलंकार, उपनिषद, काव्य, काव्य नाटक, कोश, वेद, कामशास्त्र अशा २६ विभागांमध्ये 'कॅटलॉग' तयार करण्यात आला असून, दिल्लीतील 'नॅशनल सेंटर फॉर मॅन्युस्क्रिप्टस' संस्थेच्या सहकार्याने 'डिजिटलायझेशन'ची प्रक्रिया केली जाणार आहे.

सुमारे ११५ वर्षांपूर्वी संस्कृतच्या प्रसारासाठी महादेव चिमणजी आपटे यांनी 'आनंदाश्रम' संस्थेची मुहूर्तमेढ रोवली. जर्मनीमधील हैडलबर्ग विद्यापीठासमवेत

वेदग्रंथ आणि हस्तलिखिते यांचे आदान-प्रदान करण्याचीही योजना आहे. परदेशातील अभ्यासकांसाठी 'संकेतस्थळ' सुरू करण्यात येणार आहे.

## * ज्ञानेश्वरीचे भाषांतर अन्य भाषांमधूनही व्हावे

''ज्ञानेश्वरीतील विचार आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचविण्यासाठी अन्य भाषांमधूनही ज्ञानेश्वरीचे भाषांतर होण्याची गरज आहे,'' असे मत ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी व्यक्त केले. मुकुंद गोखले यांनी लिहिलेल्या 'सायन्स ऑफ इंडियन मिस्टिक कॉन्शसनेस दॅट इज ज्ञानेश्वरी फार दि थर्ड मिलेनियम' या पुस्तकाचे डॉ. माशेलकर यांच्या हस्ते प्रकाशन झाले. प्रमुख पाहुणे प्राचार्य शेवाळकर म्हणाले, की ज्ञानेश्वरीतील तसेच वेदांमधील विचार आचरण्यात आणण्याची गरज आहे. यामुळे समाजातील अधिकाधिक लोकांपर्यंत ज्ञानेश्वरीतील विचार पोहोचण्यास मदत होईल.

## * रंगभूमीचा इतिहास 'डीव्हीडी'वर

मराठी रंगभूमीची प्रदीर्घ काळ सेवा करणाऱ्या ज्येष्ठ रंगकर्मींचे कार्य 'इतिहास-रंगभूमीचा' या डीव्हीडी मालिकेद्वारे जतन केले जात आहे. अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या वतीने हा इतिहास संग्रहित करण्याचे काम सध्या सुरू असून, सुमारे ८० कलावंतांची रंगमंचीय गाथा मुलाखती, छायाचित्रे, आठवणी, क्लिपिंग्ज याद्वारे कायमस्वरूपी उपलब्ध होणार आहे. संगीत नाटक मंडळींचा सुवर्णकाळ पाहणारे सांगलीतील मा. अविनाश (वय ९७) हे या मालिकेतील सर्वात ज्येष्ठ कलावंत आहेत.

या प्रकल्पाविषयी समन्वयक व दिग्दर्शक योगेश सोमण म्हणाले, ''नाट्य परिषदेचे अध्यक्ष मोहन जोशी यांच्या नेतृत्वाखाली नवीन कार्यकारिणी अस्तित्वात आल्यानंतर या प्रकल्पाला चालना मिळाली. रंगभूमीशी संबंधित सुमारे ४० व्यक्तींवरील 'डीव्हीडी' तयार झाल्या असून, त्यात चंद्रकांत गोखले, निळू फुले, डॉ. श्रीराम लागू, श्रीकांत मोघे, मधुकर तोरडमल, भालचंद्र पेंढारकर, शाहीर साबळे, आत्माराम भेंडे, वसंतराव देशपांडे, गणपत पाटील, काळू-बाळूक, सुमन धर्माधिकारी, उदयराज गोडबोले, कुसुम शेंडे अशा अनेक दिग्गजांचा समावेश आहे.''

## * साडेनऊ कोटी डॉलरचे चित्र

जगप्रसिद्ध चित्रकार पिकासो याने त्याची प्रेयसी डोरा मार हिचे १९४१ मध्ये काढलेले एक चित्र, न्यूयॉर्क येथे झालेल्या लिलावात तब्बल साडेनऊ कोटी डॉलरना विकले गेले. लिलावात सर्वोच्च किमतीला विकले गेलेले हे दुसरे चित्र आहे.

या चित्रात डोरा मार एका मांजरीला घेऊन बसल्याचे दाखविले आहे.



पिकासोच्या अखेरच्या काही चित्रांपैकी ते एक आहे. सॉथबी या लिलाव करणाऱ्या संस्थेचे सहअध्यक्ष डेव्हिड नॉर्मन यांनी सांगितले, की या चित्रातील बारकावे आणि रंगांचा सुरेख मेळ, हेच या चित्राच्या श्रेष्ठत्वाचे गमक ठरले आहे. यापूर्वी २००४ मध्ये पिकासोचे 'बॉय विथ द पाईप' हे चित्र, दहा कोटी ४० लाख डॉलरला विकले गेले होते.

पिकासोची प्रेयसी म्हणून डोरालाही अमाप प्रसिद्धी मिळाली होती. ती त्याची 'मॉडेल'ही होती. डोरा स्वत: चित्रकर्ती होती. तिने 'म्युएर्निका' नावाचे चित्र रंगविताना पिकासोला मदतही केल्याचे सांगण्यात येते. या चित्रात स्पेनमधील यादवीचे भयावह स्वरूप उघड करण्यात आले आहे.

## * गाण्यामागच्या आठवणी!

आशय संस्कृतीच्या वतीने आयोजित 'गप्पांगण' कार्यक्रमात नीला शर्मा यांनी गायिका आरती अंकलीकर-टिकेकर यांची मुलाखत घेतली. त्या वेळी त्यांनी आपल्या 'गायनप्रवासा'च्या आठवणी सांगितल्या.

शालेय जीवनात इयत्ता दुसरीपासून गाण्यास झालेली सुरुवात... आई-वडिलांकडून घरात झालेले संगीताचे संस्कार... माणिकबाईंच्या गाण्याचा पडलेला प्रभाव... गुरू पं. वसंतराव कुलकर्णींची शिस्त आणि पु. ल. देशपांडे यांनी केलेले मार्गदर्शन... सुधीर फडके, अशोक पत्की, लता मंगेशकर, जावेद अख्तर यांच्याविषयी सांगितलेले अनुभव... यासारख्या दिलखुलास गाण्यातून गायिका आरती अंकलीकर-टिकेकर यांच्या गाण्यामागच्या आठवणींचा प्रवास उलगडला!

'कर्नाटकात जन्म झाल्यामुळे कानडी मातृभाषा असली तरी माझे शिक्षण मात्र मराठीतून झाले. आई-वडील दोघेही चांगले गायक. त्यामुळे संगीताचे योग्य संस्कार घरातच झाले. शाळेतील शिक्षक आगाशे सरांकडून मिळालेली प्रेरणा आयुष्यात उपयोगी ठरली. विविध स्पर्धांना सुधीर फडके, माणिक वर्मा, उषा मंगेशकर हे परीक्षक असायचे. त्यांच्याकडून मिळालेली शाबासकी प्रेरणा देऊन जायची.'

पूर्वी संगीतामध्ये देवाण-घेवाण होती; परंतु आता प्रत्येक कलाकाराला आपण एक घराणे आहोत, असे वाटते. संगीत जितके सखोल तितके पसरट असते. ज्याला जन्मत: गाण्याची नजर असते त्याला परिश्रमाची गरज नसते. रियाजाने सर्वच येते असे नाही; मात्र गाण्याला परिश्रमाने तेज येते. किशोरीताई यांच्याकडे दोन वर्षांत खूप शिकायला मिळाले, असे टिकेकर यांनी सांगितले.

'सरदारी बेगम' चित्रपटासाठी जावेद अख्तर यांनी १५ मिनिटांत गाणे लिहिले. त्यानंतर ते ताबडतोब गायले गेले; परंतु आता सर्व रेकॉर्डिस्टवर अवलंबून आहे. प्रत्येकाने अनुभवसंपन्न होणे आवश्यक आहे. 'गगना गंध आला मधुमास धुंद झाला' हे शांता शेळके यांनी लिहिलेले गाणे आरती टिकेकर यांनी सादर केले.

नाव, पैसा मिळविण्याची इच्छा नसलेले शिष्य आजही आहेत. शास्त्रीय संगीत मनोरंजनासाठी नाही, तर ते आत्मरंजनासाठी आहे. स्वरस्थानांच्या मध्ये संगीत असून, तो आपल्या गाण्यांचा प्राण आहे. सर्व घराण्यांचा मला अभिमान आहे. संगीतामध्ये क्रिएटिव्हिटीला अंत नाही. काळाप्रमाणे गाणे बदलत आहे, असे टिकेकर यांनी सांगितले.

### * वैविध्यपूर्ण वाचन लेखनसमृद्धता वाढवते

कविता म्हणजे फक्त शब्दांची जुळवाजुळव नसून अनुभव आणि अंत:रंग यातून ती फुलत असते. यासाठी कवींनी वैविध्यपूर्ण वाचन करण्याची गरज आहे, असे मत कवी प्रवीण दवणे यांनी व्यक्त केले.

काव्यवैभव सांस्कृतिक प्रतिष्ठान संत तुकारामनगर यांच्या वतीने आचार्य अत्रे रंगमंदिरात काव्यप्रवास या काव्यसंग्रहाच्या प्रकाशन प्रसंगी ते बोलत होते. प्रतिष्ठानचे अध्यक्ष निशिकांत गोडबोले. वासंती कुंभोजकर, संजय कांबळे,डॉ.श्रीकांत खैरे, डॉ. जयप्रकाश गिरमे, चंद्रकांत गायकवाड, प्रकाश दिलपाक, पांडुरंग मंगुळकर यावेळी उपस्थित होते.

दवणे म्हणाले कवींनी थोर लेखक, कवी यांच्या कथांचे कवितांचे वाचन करणे आवश्यक आहे. त्यामुळे शब्दभांडार वाढून आपल्या काव्याचा दर्जा सुधारतो, शब्दांचा तुटवडा पडत नाही. आपले लेखन समृद्ध होते.

टीकेबाबत सकारात्मक दृष्टिकोन ठेवून आत्मपरीक्षण करून दर्जा सुधारणे आवश्यक आहे. कवितेत माणूस घडविण्याची ताकद असते. सामान्य माणूस कानाने ऐकतो, व डोळ्यांनी पाहतो. पण कवी कानाने बोलतो आणि डोळ्याने ऐकतो.

याप्रसंगी साहित्य क्षेत्रातील राम कोलारकर, प्रा. मुरलीधर जावडेकर, प्र. ह. जोशी, शशिकांत सोनटक्के, अशोक कोठारी, रमेश वाकनीस, ॲड. प्रभू स्वाती ठकार, मंगेश देवडे, आदींचा श्री. दवणे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

### * 'श्यामची आई' शाळाशाळांत

संस्कारांच्या मुशीत 'जनरेशन नेक्स्ट' घडावी, यासाठी आता शाळाशाळांमधून 'श्यामची आई' दाखवण्याचा प्रकल्प आकारास येत आहे. राज्यभरातील सुमारे एक लाखाहून अधिक शाळांत हा राष्ट्रपती पदकविजेता गाजलेला चित्रपट दाखविण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांकडून प्रत्येकी १० ते १५ रु. आकारून हा चित्रपट दाखविण्यासाठी रुद्र व्हिडिओ कंपनी प्रयत्नशील आहे.

संस्कारक्षम वयात एखाद्या गोष्टीचा आग्रह धरून जबरदस्तीने शिस्त लावण्यापेक्षा स्वयंप्रेरणेने मुलांनी एखादी गोष्ट करावी, याचे आदर्श उदाहरण म्हणजे 'श्यामची आई'! चित्रपट पाहणाऱ्या मुलांसाठी 'माझी आई आणि तिचा माझ्यावरील प्रभाव', 'श्यामची आई आजच्या काळाची गरज', कौटुंबिक मूल्यांची आजच्या आयुष्यातील गरज' या विषयांवर राज्यस्तरीय निबंध स्पर्धाही आयोजित करण्यात येणार आहे.

### * 'दीक्षा हे पसायदानाचेच प्रत्यक्ष रूप'

'महाराष्ट्र ही आध्यात्मिक साधनेसाठी आदर्श भूमी आहे. ज्ञानेश्वरांनी माणसाला उन्नत अवस्था प्राप्त होण्यासाठी पसायदान रचले. भगवानजी प्रणित 'दीक्षा' या पसायदानाचेच प्रत्यक्ष रूप आहे,' असे उद्‌गार प्रसिद्ध अभिनेत्री स्मिता जयकर यांनी वननेस युनिव्हर्सिटीच्या दीक्षा कार्यक्रमात बोलताना काढले.

टाइम्स फाऊंडेशन आणि डी.वाय. पाटील ग्रुप यांच्या सहकार्याने वननेस युनिव्हर्सिटीतर्फे हा कार्यक्रम हॉटेल हिल्टन टॉवरमध्ये आयोजिण्यात आला होता. वननेस युनिव्हर्सिटीचे संस्थापक श्री. भगवान आणि श्री. अम्मा यांचे पट्टशिष्य श्री. नमनजी या प्रसंगी दीक्षेचे महत्त्व विशद करण्यासाठी उपस्थित होते. डॉ. डी. वाय. पाटील आणि ज्येष्ठ अभिनेत्री आशा पारेख यांनी दीपप्रज्वलन केले.

जयकर म्हणाल्या की, 'दीक्षा म्हणजे गुरूने शिष्याला केलेला उपदेश किंवा गंडाबंधन नव्हे, तर मेंदूच्या बायलॉजिकल प्रोग्रॅममध्ये घडवलेला बदल आहे. दीक्षेचे स्वरूप प्रत्यक्ष अनुभवायलाच हवे. मी जीवनात समाधानी आहे, तरीही माझ्यात दीक्षेने मोठा बदल घडवला.'

श्री नमनजी म्हणाले की, 'माणसे आयुष्यात यशस्वी असतात. पण अंतर्मनात गोंधळ असतात. ते मिटवून शांती देण्याचे काम दीक्षा करते. शांत माणूस आनंदी असतो आणि तोच समाज घडवू शकतो.'

### * पाढे म्हणण्यासाठी पुस्तक

पाढे म्हणणे केव्हाच 'इतिहासजमा' झाले आहे. पालकांनाही पाढे पाठ नाहीत, अशी सध्या अवस्था आहे. इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेण्याचा कल वाढल्याने मुलांनी पाढ्यांशी जणू 'गट्टी फू'च केली आहे. या पार्श्वभूमीवर मराठी लेखन कोशकार अरुण फडके यांचे 'गट्टी पाढ्यांशी' हे पुस्तक बाजारात आले आहे.

मराठी आणि इंग्रजी या दोन्ही माध्यमांतील मुलांसाठी हे पुस्तक असून १ ते १०० अंक आणि बे ते तीस पाढे हे अंकी आणि अक्षरी दोन्ही भाषेतून कसे म्हणायचे, हे पुस्तकातून प्रत्यक्ष दाखवण्यात आले आहे. पाढ्यांचे पूर्वीपासून चालत आलेले मराठीतले वैशिष्ट्यपूर्ण उच्चार त्यात देण्यात आल्याने पाढे लवकर आणि सहज पाठ होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा आहे.

इंग्लिश पाढे अक्षरी लिहिताना काय काळजी घ्यावी हे नीट समजावून देण्यात आले आहे. संयोगचिन्हाचा वापर केव्हा करावा, ए चा आणि ॲण्डचा

वापर केव्हा करावा अथवा करू नये, तसेच अपूर्णांक इंग्लिशमध्ये कसे लिहावे-म्हणावेत याची उदाहरणे या पुस्तकामध्ये आहेत. नित्योपयोगी कोष्टके, लांबी, क्षेत्रफळ, द्रवांची परिमाणे, वजन, कागद, वेळ या विषयांवरील माहिती दोन्ही भाषांमध्ये देण्यात आली आहे. अंक किंवा संख्या रोमन अंकांत कशा लिहिव्यात, याचीही माहिती आहे.

आठवीनंतर गणित हा विषय ऐच्छिक करण्याचा मानस शिक्षणमंत्री वसंत पूरके यांनी व्यक्त केला त्यावर उलट सुलट चर्चा सध्या सुरू आहे. पण ज्यांचे पाढे पाठ आहेत, त्यांना गणित अवघड नाही, असे तज्ज्ञांचे मत आहे. यादृष्टीने एक पाऊल अंकुर प्रकाशनने १५ रुपयांत उपलब्ध केलेल्या या २५ पानी पुस्तकाने टाकले आहे.

*** महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या अध्यक्षपदी द. मा. मिरासदार**


शताब्दी महोत्सव साजरा करणाऱ्या महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक द. मा. मिरासदार यांची एकमताने निवड करण्यात आली. या निवडीनंतर कार्याध्यक्ष ग. ना. जोगळेकर यांच्या हस्ते मिरासदार यांचा सत्कार करण्यात आला.

परिषदेच्या उपाध्यक्षपदी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. वि. मा. बाचल, माजी आमदार अरविंद लेले आणि भास्करराव आव्हाड यांची एकमताने निवड झाल्याची माहिती स्थानिक कार्यवाह मिलिंद जोशी यांनी सांगितली. विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष म्हणून निवृत्त न्यायाधीश प्र. ना. बेहेरे यांची, तर नवे विश्वस्त म्हणून उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडळाचे अध्यक्ष उल्हास पवार यांची निवड झाली. कार्यकारी विश्वस्त म्हणून राजा फडणीस, तर कार्यकारी मंडळावरील पुण्याबाहेरचे कार्यवाह म्हणून कोल्हापूरच्या राजन मुठाणे आणि ठाण्याच्या पांडुरंग दातार यांची निवड झाल्याचे जोशी यांनी सांगितले. परिषदेचे स्वीकृत सदस्य म्हणून रत्नाकर कुलकर्णी यांना निवडण्यात आले.

❒




# एवढे या पुस्तकात आहे तरी काय?




एका खुनाच्या शोधातून समोर आलेली अनेक सांकेतिक चिन्हं..
धार्मिक संकेत आणि त्यातून उलगडत गेलेले प्राचीन काळा-पासून अस्तित्वात असलेले गूढ प्रक्षोभक रहस्य...

## द दा विंची कोड

**डॅन ब्राऊन अनु. अजित ठाकूर**

**जगभरात ४ कोटींपेक्षा जास्त विकली गेलेली, ४४ भाषांमधून प्रसिद्ध झालेली रहस्यमय कादंबरी**

लँग्डन म्हणाला, ''गेली शंभर वर्षे हे गुपित एकाकडून दुसऱ्याकडे जात आहे. ही सगळी कागदपत्रे, त्यातले गुपित रहस्य आणि त्याची ताकद या सर्वांना मिळून, सांगरीअल असं म्हणतात. ''या मागची दंतकथा फार गुंतागुंतीची आहे. पण सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रायरी पंथाने हा पुरावा जतन करून ठेवला आणि आणि सत्य प्रकाशात आणण्यासाठी योग्य क्षण उजाडण्याची ते वाट पाहत आहेत.''

''कुठलं सत्य? इतकं शक्तीशाली असं काय रहस्य असू शकतं?'' लँग्डनने दीर्घ श्वास घेतला. लँग्डन हसत म्हणाला, ''तू नक्कीच ऐकलं असशील. फक्त तू या गोष्टीला होली ग्रेल या नावाने आतापर्यंत ऐकलं असशील.'' होली ग्रेल! म्हणजे 'शेवटचा प्याला'!

**किंमत ३२०रु. टी बुक क्लबच्या सभासदांना १६०रु. सभासदांना २४०रु. पोस्टेज ३०रु.**

## दर्जेदार असे काही...



**'द दा विंची कोड' या डॅन ब्राऊन यांच्या खळबळजनक कादंबरीचा मराठी अनुवाद करणारे अनुवादक अजित ठाकूर यांनी मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे अनेक 'बेस्ट सेलर' कादंबऱ्यांचे उत्तम मराठी अनुवाद केले आहेत. त्यापैकी काहींचा येथे परिचय–**




### सन्स ऑफ फॉर्च्यून

भिन्न जगात वाढलेल्या जुळ्या भावांची खिळवून ठेवणारी विलक्षण कहाणी.

**मूळ लेखक- जेफ्री आर्चर**

किंमत ३५०रू.




### सिटी ऑफ बोन्स

वीस वर्षांपूर्वी घडलेल्या एका लहान मुलाच्या खुनाची करुण कहाणी माणुसकीवर प्रश्नचिन्हे रेखाटत जाते.

**मूळ लेखक- मायकेल कॉनेली**

किंमत २४०रू.




### गॉन फॉर गुड

उध्वस्त कुटुंब, भावनिक असुरक्षितता गुन्हेगारीला जन्म देते, नातेसंबंध गोठवून टाकणारे एक रहस्य उलगडते.

**मूळ लेखक- हार्लन कोबेन**

किंमत २५०रू.

प्रत्येकी पोस्टेज २०रु.



## गांधर्वी




**— बाणी बसू —**

**-अनु. मृणालिनी गडकरी-**


**किंमत १७०रु.**

देवदत्त किन्नर कंठ लाभलेल्या गायिकेची; 'अपाला'ची ही कहाणी. गायन हाच तिचा धर्म. तेच तिचे प्रेम. तिच तिची प्रकृती. अशा या 'अपाला'चे अखेर काय झाले? तिला आयुष्यात काय मिळाले? तिने इतरांना काय दिले? या स्वर्गीय आवाज लाभलेल्या गायिकेला जीवनसंघर्षाला कसे सामोरे जावे लागले? या संघर्षात कोणी दिली का तिला साथ? आयुष्यभर प्रश्नच प्रश्न. एका प्रश्नातून निर्माण होणारा दुसरा प्रश्नच.

कलावंताचे जीवन असेच नसते का?

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

## मुलाखत- डॉ. आनंद यादव



**ज्येष्ठ साहित्यिक डॉ. आनंद यादव यांनी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांवर लिहिलेल्या 'लोकसखा ज्ञानेश्वर' या वास्तववादी चरित्रात्मक कादंबरीविषयी अनेक जाणकार वाचकांची प्रतिसादपत्रे येत आहेत. या कादंबरीच्या निर्मितीविषयी डॉ. यादव यांची नेमकी भूमिका जाणून घेण्यासाठी जळगाव येथील पत्रकार चंद्रकांत भंडारी यांनी त्यांची सविस्तर मुलाखत घेतली.**

***१. 'लोकसखा ज्ञानेश्वर' ही कादंबरी कशी सुचली?***

मला ही कादंबरी तशी अचानक सुचलेली नाही. गेली चाळीस-पंचेचाळीस वर्षे मी मानसिक पातळीवर ज्ञानेश्वरांच्या सहवासात आहे. १९६० साली मी एम.ए. करत असताना आम्हाला एक पेपर 'आधुनिक किंवा 'मध्ययुगीन/प्राचीन ग्रंथकाराचा अभ्यास' असा होता. विद्यार्थ्यांने कोणताही एक ग्रंथकार निवडावा असा उद्देश असे. त्यानुसार 'ज्ञानेश्वर' हा ग्रंथकार निवडला आणि त्याचा वर्षभर अभ्यास केला.

'ज्ञानेश्वर' हा 'प्राचीन ग्रंथकार' निवडण्याचेच कारण असे की आधुनिक साहित्याची मला मुळातूनच आवड होती. ते आपण आयुष्यात कधीही आणि कितीही वाचू शकतो. पण 'प्राचीन ग्रंथकार' अभ्यासासाठी निवडल्याशिवाय आपण वाचू शकणार नाही; असे त्यावेळी वाटले आणि वर्षभर ज्ञानेश्वरांचा 'एक ग्रंथकार' म्हणून शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यास केला.

या काळात ज्ञानदेवांच्या साहित्याने माझ्या मनाचा पूर्णपणे कब्जा घेतला होता. शिवाय ज्ञानदेवांच्या जीवनात त्यांची जी ससेहोलपट झाली होती ती, आणि एवढी वाताहत होऊनही त्यांनी ठेवलेले सद्वर्तन, सोशिकपणा, समजूतदारपणा आणि ध्येयवाद या बाबी मला अतिशय आवडल्या... कळत-नकळत मनोमन त्यांचाच आदर्श ठेवला. कारण मीही एका प्रतिकूल परिस्थितीतून वाटचाल करीत होतो... त्यामुळे आणि ज्ञानेश्वरांचे साहित्य विद्यार्थ्यांना शिकवल्यामुळे ज्ञानेश्वर माझे जणू सखेसोबती झाले होते... परिणामी आयुष्यात स्वस्थता मिळाल्यावर



'लोकसखा ज्ञानेश्वर' या कादंबरीच्या लेखनासाठी हात घातला.

***२. तुम्ही ज्ञानेश्वरांना 'लोकसखा' असं म्हटलं आहे, ते कोणत्या अर्थानं?***

ज्ञानदेवांच्या वाङ्मयाचा आणि त्यांच्या चरित्राचा अभ्यास करताना ठळकपणे काही गोष्टी लक्षात आल्या. ते इतर संतांप्रमाणे केवळ संसार आणि केवळ परमार्थ साधणारे संत नाहीत, तर ते इतरांपेक्षा खूपच वेगळे आणि व्यापक दृष्टी असलेले संत आहेत. केवळ संतच नाहीत, तर तत्कालीन सर्व समाजाच्या व्यापक हिताचा व्यापक दृष्टीने अभ्यास करणारे विचारवंत आहेत. समाजाला पडलेल्या अनेक मर्यादांना विधायक सहृदयतेने आणि सात्त्विक वृत्तीने बाजूला हटवणारे क्रियावान लोकबंधू म्हणजेच लोकसखा आहेत. समाज कायमचा एकात्म राहावा; या हेतूने नवे तत्त्वज्ञान निर्माण करणारे तत्त्वज्ञ आहेत. आपले तत्त्वज्ञानी विचार ब्राह्मणेतर अज्ञ बहुजनांना पूर्णपणे कळावेत आणि त्यांनी ते प्रत्यक्ष आचरणात आणावेत म्हणून मराठी लोकभाषेत प्रासादिक साहित्यनिर्मिती करणारे ते संत साहित्यिक आहेत. त्यासाठी विविध जातीजमातीतून क्रियावान नेतृत्व करणारे संत त्यांनी मित्रत्वाच्या वृत्तीने जवळीक साधून निर्माण केले. एक संतमेळाच त्यांनी निर्माण केला. आणि त्यांना बरोबर घेऊन भारतातील अनेक तीर्थक्षेत्रांना भेटी दिल्या. भारतातील जनसामान्यांच्या समाजाचे दर्शन घडवून त्यांची दृष्टी व्यापक केली. त्या अर्थाने ते 'लोकसखा' आहेत. केवळ संत किंवा माऊली नाहीत. 'सखा' केवळ नेता नसतो; तर आत्मीय भावनेने मार्गदर्शन करणारा जिवलग 'आप्त' असतो असे मला अभ्यासांती वाटले; म्हणूनच मी त्यांना 'लोकसखा' म्हटले आहे.

***३. 'ज्ञानेश्वरांच्या चरित्रावरील चमत्कारांचा झाकोळ या कादंबरीने दूर केला' असं म्हटलं जातं. या बाबतीत तुमचं मत काय आहे?***

त्याचं थोडं स्पष्टीकरण केलं पाहिजे. प्राचीन आणि मध्ययुगीन वाङ्मयात 'पुराण' नावाचा एक साहित्यप्रकार होता. 'पुरा नवम् इति पुराणम्' अशी त्याची व्याख्या केली आहे. म्हणजे प्राचीन समाजजीवनात ज्या अर्थपूर्ण घटना किंवा असामान्य व्यक्ती होऊन जात असत, त्यांना पुराणात नवं रूप देऊन त्या अधिक आकर्षक, रोचक केल्या जात असत. 'पुराण' हा साहित्यप्रकार प्रामुख्याने जनसामान्यांसाठी, ब्राह्मणेतर तसेच स्त्रियांसाठी असे. हा सामान्य अज्ञजन चमत्कारांवरच श्रद्धा ठेवतो. चमत्कारयुक्त घटना किंवा चमत्कार करून दाखवणाऱ्या व्यक्ती त्यांना 'दैवी' वाटतात आणि त्यामुळे अज्ञसमाज त्यांच्यावर श्रद्धा ठेवून त्यांना आंधळेपणाने अनुसरतो, त्यांची पूजा करतो.

प्राचीन आणि मध्ययुगीन समाज हा प्रामुख्याने धर्मप्रधान जीवन जगणारा होता. त्यामुळे अशा प्रकारच्या चमत्कारांना त्याकाळच्या पुराण वाङ्मयात ऊत




आलेला दिसतो. कीर्तनकार, प्रवचनकार, पुरोहित मंडळी अशा प्रकारचे चमत्कार नेहमी आपल्या कल्पनेनुसार जुन्या वाङ्मयात घुसडत असत. ती एक त्यांची कीर्तन, प्रवचन किंवा गोष्टी सांगण्याची शैलीच असे. अजूनही अशी कीर्तने, प्रवचने, गोष्टी सांगणारी धंदेवाईक मंडळी, महाराज, साधू वगैरे आपल्या समाजात भरपूर आहेत. अशा व्यक्तींनी आणि पुराणनिर्माणकर्त्यांनी ज्ञानदेवांच्या चरित्रात असे अनेक चमत्कार घुसडलेले आहेत. ज्ञानदेव चरित्राचा अभ्यास करताना हे माझ्या लक्षात आले.

आधुनिक युग हे प्रामुख्याने बुद्धिनिष्ठ, तर्कप्रधान आहे. कोणताही सुबुद्ध, सुशिक्षित माणूस अशा चमत्कारांवर आज विश्वास ठेवू शकत नाही. भौतिक जीवनात तो वास्तववादी घटनांवर, त्यांच्यातील कार्यकारण संबंधांवर विश्वास ठेवू शकतो. त्या अंगांनीच तो आपल्याही जीवनाचा अर्थ लावू शकतो. आपले आधुनिक मराठी साहित्यही याच सूत्रांच्या आधारे लिहिले जाते. चमत्कारावर आधारलेले साहित्य आधुनिक माणसाला खोटारडे आणि थोतांड निर्माण करणारे वाटते.

दुसरे असे की ज्ञानेश्वरांचे जीवन आणि कार्य अशा प्रकारच्या चमत्कारांमुळे महान आणि दैवीगुणयुक्त झालेला नाही, तर ते त्यांनी केलेल्या सकस समाजकार्यामुळे, निर्माण केलेल्या उच्च वाङ्मयामुळे, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी अंगी बाणलेल्या सात्त्विक गुणांमुळे आणि नैतिक वर्तनांमुळे; महत्त्वाचे आणि युगप्रवर्तक असे परमेश्वरविषयक तत्त्वज्ञान निर्माण केल्यामुळे, जीवनकार्याची परिपूर्ती झाल्यावर स्वत:चा देह संजीवन समाधीद्वारा परमेश्वरचरणी निर्धारपूर्वक अर्पण केल्यामुळे ते महान वाटतात. आधुनिक युगातही अशा विभूती झालेल्या आहेत. रमण महर्षी, रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी यांसारखे थोर महात्मे कमीअधिक फरकाने ज्ञानेश्वरांच्याच तोलामोलाचे होते, असे वाटते. कालमानानुसार त्यांच्या कार्यात कमीअधिक फरक दिसतो; एवढेच. पण हे सगळेच संतमहात्मे आध्यात्मिक पातळीवर जीवन जगणारे युगपुरुष आहेत; हे मात्र निश्चितपणे म्हणता येते. या व्यापक हेतूनेच ज्ञानेश्वरांच्या जीवनावरील चमत्कारांचे झाकोळ दूर करून त्यांचे वास्तववादी चरित्र शोधण्याचा व त्याला कादंबरीरूप देण्याचा प्रयत्न केला आहे. या कादंबरीचे यशापयश वाचकांनीच ठरवावयाचे आहे.



***४. 'आत्मचरित्रात्मक कादंबऱ्यांतून आनंद यादव आज बाहेर पडले आहेत. ते वेगळे लेखनही समर्थपणे करू शकतात, ही गोष्ट 'लोकसखा ज्ञानेश्वर' या कादंबरीने सिद्ध केली आहे' असं विधान केलं तर तुम्हाला काय वाटेल?***

स्थूलमानानं हे विधान खरं आहे असंच मी म्हणेन. पण त्या विधानाला थोडी पुस्ती जोडली पाहिजे, ती जोडतो आहे.

१९८० ते १९९७ या सतरा वर्षांच्या काळात मी माझे जीवनदर्शन घडवण्याच्या हेतूने माझ्या आत्मचरित्राचे चार खंड लिहिले. 'झोंबी'चे लेखन मी १९८० ते १९८६ असे सहा वर्षे केले. हे लेखन, त्याचे पुनर्लेखन, त्यावर पुन्हा संस्कार असे सहा वर्षे चालले होते. ते पूर्ण झाले. मग पुढचे लेखन झपाट्याने १९९५ ते ९६ अखेरपर्यंत केले. 'काचवेल' हा आत्मचरित्राचा चौथा खंड १९९७ साली प्रसिद्ध झाला. या लेखनाच्या काळातच त्यातील काही भाग मी दिवाळी अंकासाठी देत होतो त्यामुळे ही सतरा वर्षे आत्मचरित्रात मी गढून गेलो होतो. या चारही खंडांना अमाप प्रसिद्धी मिळाली. त्यामुळे 'आनंद यादवांचे लेखन म्हणजे आत्मचरित्रात्मक कादंबऱ्या' असे समीकरण मराठी रसिक वाचकांच्या मनात तयार झाले. वास्तविक मी आत्मचरित्राच्या बाहेर भरपूर लेखन केले आहे. मात्र सामान्यपणे वाचकांच्या मनात वरील समीकरण पक्के होऊन राहिले आहे.

आता हे मात्र निश्चितपणे खरे की 'लोकसखा ज्ञानेश्वर' ही कादंबरी आजवरच्या माझ्या साहित्यापेक्षा वेगळी आहे. आजपर्यंत मी आधुनिक काळाशी, समाजाशी संबंधित असे आधुनिक विषय घेऊन साहित्यनिर्मिती केली आहे. पण 'लोकसखा ज्ञानेश्वर' ही कादंबरी मात्र मध्ययुगीन काळाशी, समाजाशी संबंधित असा विषय घेऊन लिहिली आहे. त्यामुळे माझ्यातील साहित्यिकासमोर निर्मितीच्या वेळी अनेक समस्या उभ्या राहिल्या. मुख्य म्हणजे ज्ञानेश्वरकालीन समाजस्थिती समजून घ्यावी लागली. मूळ हिंदू धर्म आणि त्याच्या गाभ्याच्या मुख्य प्रेरणा काय आहेत, तत्कालीन समाजात कोणत्या विकृती निर्माण झाल्या, कर्मकांड, थोतांड, पुरोहितवर्गाची स्वार्थी वृत्ती इत्यादीमुळे त्याची अधोगती कशी झाली, यासरख्या गोष्टी समजावून घेऊन मनाशी काही निष्कर्ष काढले. त्याचबरोबर ज्ञानदेवांच्या चरित्राची रूपरेषा निश्चित करावी लागली. त्यांच्या चरित्रातील अनेक सुट्या सुट्या घटना गोष्टींमध्ये कार्यकारणभाव वास्तववादी दृष्टिकोनातून प्रस्थापित करावा लागला. ज्ञानेश्वरांना आणि त्यांच्याशी संबंधित व्यक्तींना समजून घेतले खरे. पण ज्ञानेश्वरांची सात्त्विक मानसिकता, आध्यात्मिक पातळीवरचे त्यांचे वर्तन, बोलणे-चालणे, प्रसंगांना सामोरे जाण्याची शैली, समाज-समरसता, तिचे भान ठेवून वागणे, हे बौद्धिक पातळीवर समजावून घेतले, तरी पण प्रत्यक्ष कादंबरीचे लेखन करताना निर्मितीच्या पातळीवर ज्ञानदेवांशी एकात्म होऊन, अखंड लेखन करीत राहणे

मला फारच जड गेले. माझ्या आधुनिक काळातील वास्तववादी, भौतिकवादी मनाला त्याचे सर्वस्व सोडून मध्ययुगातील त्या ज्ञानेश्वर नामक व्यक्तित्वाशी संपूर्ण एकात्म होताना माझे फार मानसिक हाल झाले. खूपच प्रयास पडले. कारण या कादंबरीचा नायक हा जीवनाची अत्युच्च पातळी असलेल्या आध्यात्मिक वृत्तीने जगतो. त्याच पातळीवर तो कृती करतो, बोलतो– त्याच्या अत्युच्च, आध्यात्मिक पातळीशी मी निर्माता-लेखक या नात्याने एकरूप, एकात्म किंवा एकजीव झाल्याशिवाय या नायकाला मी न्यायच देऊ शकणार नाही असे वाटत होते. तसे झाले नसते तर सगळी कादंबरीच अपयशी ठरणार होती. त्यामुळे ही कादंबरी लिहायला चार-साडेचार वर्षे लागली. ती लिहून पूर्ण झाल्यावर मी रस पिळून काढलेल्या उसाच्या चिपाडासारखा संपूर्ण नि:सत्त्व झालो होतो, माझा मी राहिलो नव्हतो... सतत झोपून राहावं असं वाटत होतं. तीन-साडेतीन महिन्यांनी थोडा सावरल्यासारखा झालो, असा टोकाचा अनुभव पूर्वी कोणत्याही साहित्यनिर्मितीच्या वेळी आला नव्हता.

***५. प्रस्तुत कादंबरी लिहून पूर्ण झाली ती प्रसिद्ध होऊन चार-पाच महिनेही उलटून गेले. तेव्हा कादंबरीचा निर्माता-लेखक म्हणून आता आपणास कसे वाटते?***

हा प्रश्न काहीसा गंभीर आणि अवघडही आहे. कारण ‘लोकसखा ज्ञानेश्वर’ कादंबरीत ‘ज्ञानदेवांना’ हा नायक केवळ एक पात्र म्हणून मला रंगवायचे नव्हते. तो एक युगपुरुष आहे, या जाणिवेने मी त्यांना समजून घेत गेलो होतो.

असं पाहा– कोणत्याही देशातील समाजाचा प्रदीर्घ इतिहास पाहिला तर असे दिसून की तो समाज, त्यातील समाज व्यवस्था, समाजजीवन हे कायम प्रवाही असते. काळाच्या ओघात त्या समाजात त्या-त्या व्यवस्थेत आणि जीवनात विस्कळीतपणा, निर्जीवता, नीतिनियमांचे विकृतीकरण, आदर्शांचे सपाटीकरण झालेले असते. नाममात्र ते उरलेले असते– अशावेळी कोणी तरी युगपुरुष, महान व्यक्ती किंवा प्रवर्तक जन्माला येतो, आणि ती कालबाह्य झालेली सर्व व्यवस्था बदलून नवी मूल्यात्मक मांडणी करतो... आधुनिक युगात आपण त्यांना ‘सुधारणा’, नवसमाजनिर्मिती इत्यादी नावांनी ओळखतो. ही प्रक्रिया सतत चाललेली असते; असे समाज इतिहास सांगतो.

अशी नवी मांडणी करणाऱ्या व्यक्तींना आपण कालौघात ऋषी, अवतारी पुरुष, संत, साधुपुरुष, महात्मा, सुधारक, युगप्रवर्तक इत्यादी नावांनी ओळखत असतो. समाजात ते ‘दैवत’ म्हणून ओळखली जातात. ऐतिहासिकदृष्ट्या त्यांच्या महान कार्याचे विश्लेषण, विवेचन केले जाते, त्यांच्यावर वैचारिक ग्रंथ निर्माण होतात.

पण अशा पुरुषांवर साहित्यगुणांनी युक्त अशी प्रातिभ निर्मिती करणे, हे



फार अवघड कार्य असते. कारण अशा प्रकारच्या निर्मितीसाठी त्या व्यक्तींमध्ये पुन्हा प्राण भरावे लागतात, तिला जिवंत करावे लागते– तिच्यात जिवंतपणाचे गुणविशेष प्रतिभेच्या जोरावर निर्माण करून ती व्यक्ती साहित्यकृतीत वावरते आहे, असे साक्षात् प्रत्ययकारी लेखन करणे ही बाब तशी अतिशय अवघड आणि गुंतागुंतीची असते. प्रतिभावंत साहित्यिकच ती करू जाणे. तशातच इतिहासकाळातील महान व्यक्ती असेल तर ते कार्य आणखी अवघड आणि आव्हानात्मक असते.

प्रस्तुत कादंबरीला हात घालण्यापूर्वी आपण फार मोठी जोखीम पत्करत आहोत असं मला वाटत होतं. म्हणून मला चार-साडेचार वर्षे निर्मितीसाठी संघर्ष करावा लागला. मानसिक पातळीवर नवनव्या समस्यांना सामोरा जाताना मी पार थकून गेलो. पण आज निर्मिती पूर्ण झाल्यानंतरच्या काळात गेले चार महिने एका अनोळख्या परिपूर्तीचा आनंद चाखत आहे.

❐


## लौकरच प्रकाशित होणार...

दुसऱ्या महायुद्धात महिला गुप्तहेरांची फ्रान्समधील शौर्यगाथा

**जॅकडॉज**

लेखक : केन फॉलेट

अनुवाद : **रवींद्र गुर्जर**

## आगामी...

मराठी साहित्य विश्वात ‘इतिहास’ घडवील असे अनुभवकथन

**आम्ही दुनियेचे राजे**

लेखक
**रवींद्र गुर्जर**

संपर्क -
**गायत्री साहित्य,** २६/१२, प्रतिकनगर, येरवडा, पुणे ४११ ००६.


## -कांचन काशीनाथ घाणेकर यांचे अनुभवकथन-




'डॉक्टरांसारखा प्रतिभावंत कलाकार
माझ्या आयुष्यात प्रियकर, पती अशा
नात्यांनी आल्यापासूनच्या अनेक
खळबळजनक घटनांचा हा प्रवास...'

**नाथ हा माझा**

किंमत २५०रू.



जन्मदात्री सुलोचना, चित्रमहर्षि भालजी
पेंढारकर आणि अन्य जिव्हाळ्याच्या
आत्मीय व्यक्ती यांच्यावरचं
कृतज्ञ लेखन.

प्रत्येकी पोस्टेज
२०रु.

**रेशीमगाठी**

किंमत १००रू.

## ललित



मानसशास्त्राच्या लोलकातून कलात्मकतेने
साकारलेले, प्रत्येकाने अनुभवावे असे
सुखाचे रंग.

**रंग सुखाचे**

**डॉ. रमा मराठे**

किंमत ८० रू.



सर्वांगानी जीवनाचे मर्म शोधून सुखाचा
मार्ग दाखवणारे सुंदर ललितलेखन.

प्रत्येकी पोस्टेज
२०रु.

**या सुखांनो**

**सुरेश वसंत नाईक**

किंमत १७०रू.



## चरित्रं / व्यक्तिचरित्रं

अहिल्याबाई होळकर यांच्या
अलौकिक जीवनावरील
प्रभावी कादंबरी

**कर्मयोगिनी**

**-विजया जहागीरदार-**




**किंमत**
**३००रु.**

सुभाषचंद्र बोसांच्या अतीव
साहसी व दुर्दम्य कर्तृत्वाचा
सम्यक परिचय

**नेताजी**

**-वि. स. वाळिंबे-**





**किंमत**
**३५०रु.**

महात्मा फुलेंच्या वादळी
आयुष्यावरील लक्षवेधी
कादंबरी

**महात्मा**


**-डॉ. रवींद्र ठाकूर-**

प्रत्येकी पोस्टेज २०रु.




**किंमत**
**३००रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**




**पुस्तक परिचय**

# जे.आर.डी. टाटा- एक चतुरस्त्र माणूस

**व्यवसायाच्या सर्वांगीण विकासाबरोबर सामाजिक उत्तरदायित्वाचे व्यापक भान**

**माधुरी शानभाग**

सर रतन टाटा यांना यंदाचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला; आणि टाटा उद्योगसमूहाच्या गेल्या शतकभराच्या योगदानाबद्दलची कृतज्ञता आणि जनमान्यतेची भावना यांचे प्रतीक म्हणून या पुरस्काराचा स्वीकार केला गेला. टाटा उद्योगसमूहात दोन लाखांवर कर्मचारी आहेत. सात उद्योगक्षेत्रातील ९४ कंपन्यांचा त्यात समावेश होतो. त्यातही टाटा स्टील, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस, टाटा मोटर्स, टाटा टी, टाटा पॉवर, टाटा इंडिकॉम या कंपन्यांचा भारतीय उद्योगक्षेत्रात मोठाच दबदबा आहे. टाटा उद्योगसमूहाने ब्रिटनमधील 'टेटली टी'ची मालकी इ.स. २००० मध्ये मिळवून जगभरातील चहा कंपन्यांमध्ये दुसरा क्रमांक गाठला. टाटा कन्सल्टन्सी ही भारतातील सर्वात मोठी माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील संस्था. तिची वार्षिक उलाढाल १ बिलियन डॉलर्सपेक्षाही जास्त आहे. एकूणच भारतीय संदर्भात टाटा उद्योगसमूहाचे औद्योगिक क्षेत्रातील योगदान हे अत्यंत महत्त्वपूर्ण राहिलेले आहे. शंभरावर वर्षे टाटा-बिर्ला हा द्वंद्व समास भारतीय औद्योगिक क्षेत्राचा मानदंड राहिलेला आहे. आता अर्थातच अंबानी-नारायणमूर्ती-मित्तल-आझम प्रेमजी वगैरे नवे आयकॉन्स आपापले प्रभावक्षेत्र वाढवत आहेत...

सर रतन टाटा यांना महाराष्ट्रभूषण देऊन गेल्या सव्वाशे वर्षात टाटा उद्योगसमूहाने मुंबईच्या विकासात आणि औद्योगिक प्रगतीत जी कामगिरी बजावली, तिच्याबद्दलची कृतज्ञता आणि जाण प्रकट केली.

आज टाटा समूहाचे प्रमुख म्हणून सर रतन टाटा हे कार्यरत आहेत. त्यांचे वडील नवल टाटा हे जेआरडी टाटांचे दूरचे बंधू. पण जेआरडी टाटांनी आपल्या निवृत्तीनंतर रतन टाटा यांच्या हाती टाटा समूहाची सूत्रे सोपवली; आणि टाटा समूहाचे संस्थापक जमशेदजी टाटा यांचीच परंपरा राखली. जमशेदजींनी आपला



उत्तराधिकारी म्हणून आपल्या दूरच्या भावाचे पुत्र रतन दादाभाई टाटा यांना आपल्या उद्योगात सामावून घेतले; आणि व्यवसायाचा व्याप वाढवला. आरडींना आपली तब्येत बिघडत आहे याची कल्पना आल्यावर त्यांनी आपला केंब्रिजला शिकणारा मुलगा जहांगीर रतन टाटा याला पदवीपर्यंतही न थांबता तातडीने १९२५ साली बोलावून घेतले आणि जमशेदपूरला १९२६ मध्ये वर्षभर राहून सर्वांगीण प्रशिक्षण घ्यावे असे सुचवले. परंतु ते वर्ष पूर्ण होण्याच्या आधीच आरडींचे निधन झाले आणि जेआरडींनी टाटासमूहात वेगवेगळ्या जबाबदाऱ्या एक तपभर पार पाडून १९३७ मध्ये चेअरमनपद स्वीकारले. १९८८ साली त्यांनी चेअरमनपदाची धुरा रतन टाटा यांजवर सोपवली.

**जेआरडी टाटा यांच्या पन्नास वर्षांच्या कारकीर्दीत टाटा समूहाची सर्वंकष प्रगती झाली आणि त्या समूहाच्या नियंत्रणाखाली ९४ कंपन्या आल्या. भारताच्या अग्रगण्य उद्योगसमूहात टाटा हे नाव कायम अग्रभागी राहिले.**

जेआरडी टाटा यांच्या पन्नास वर्षांच्या कारकीर्दीत टाटा समूहाची सर्वंकष प्रगती झाली आणि त्या समूहाच्या नियंत्रणाखाली ९४ कंपन्या आल्या. भारताच्या अग्रगण्य उद्योगसमूहात टाटा हे नाव कायम अग्रभागी राहिले.

जेआरडी टाटांच्या कार्यकर्तृत्वावर प्रकाश टाकणारे दहा लेख प्रा. माधुरी शानभाग यांनी लिहिले असून त्यांचे संकलन 'जेआरडी- एक चतुरस्त्र माणूस' या नावाने मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रसिद्ध केले आहे. माधुरी शानभाग यांच्या विज्ञानकथा आणि अनुवाद यांनी वाचकांना आकृष्ट केले आहे. राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या आत्मचरित्राचाही अनुवाद त्यांनी केला आहे. साहजिकच त्यांच्या गुणग्राहक निरीक्षणशक्तीची प्रचीती यावी ही अपेक्षा असणारच! ज्याच्यावर लिहायचे त्या व्यक्तीचा संपर्क, सहवास वा परिचय नसताना लिहिणे एकूण अवघडच! परंतु जेआरडींना जवळून पाहिलेल्या आर.एम. लाला वगैरेंच्या पुस्तकांचा आणि गुगल सर्च इंजिनचा भक्कम आधार घेऊन प्रा. माधुरी शानभाग यांनी जेआरडींच्या सहवासातच आहोत, अशा आत्मविश्वासाने हे लेखन केले आहे. त्यामुळे वाचकांनाही जेआरडींच्या वेगवेगळ्या स्वभाववैशिष्ट्यांबद्दल आदर-आत्मीयता वाटेल.

आरंभीच्या लेखात टाटा समूहाची स्थापना आणि सुरुवातीची वाटचाल यांची हकीकत आली आहे. नवसारीच्या जमशेदजी टाटांनी कापडाच्या उत्पादनासाठी मुंबईची दमट हवा उपयुक्त हे जाणून १८७४ साली मुंबईला येऊन एम्प्रेस मिल

**आपल्या फ्रेंच शिक्षिकेच्या वीस वर्षे वयाच्या मुलीवर चाळिशीतल्या रतनजींचे मन बसले; तेव्हा जमशेदजींनी त्या दोघांचे लग्न लावून दिले (१९०२). रेशमी सोनेरी केसांच्या या नववधूला 'सुनी' असे पारशी नाव देण्यात आले, सुनीला पारशी धर्मात प्रवेश मिळाला.**

चालू केली. त्यासाठी मँचेस्टरहून यंत्रसामग्री आणली. १८५६ मध्ये जन्मलेल्या रतनजी दादाभाई टाटा या आपल्या बायकोच्या बहिणीच्या मुलाला त्यांनी मुंबईला बोलावून घेतले. रतनजी दादाभाई- आरडी- यांना एम्प्रेस मिलमध्ये भागीदारी दिली. १८८७ मध्ये टाटा अँड सन्स स्थापन करून वेगवेगळे व्यवसाय सुरू केले. तांदळाची निर्यात, रेशमी कापडाची आयात, जपान-अमेरिकेतील न्यूयॉर्क येथेही त्यांनी कार्यालये काढली. १९१२ मध्ये पहिला सिमेंट कारखाना काढला. आरडींच्या पत्नीचे लग्नानंतर वर्षभरातच निधन झाले.

जमशेदजी टाटा यांचा मुलगा दोराबजी याच्याबरोबर न पटल्याने आरडींनी पॅरिसला जाऊन रेशीम आणि मोती यांचा व्यापार करायचे ठरवले. आपल्या फ्रेंच शिक्षिकेच्या वीस वर्षे वयाच्या मुलीवर चाळिशीतल्या रतनजींचे मन बसले; तेव्हा जमशेदजींनी त्या दोघांचे लग्न लावून दिले (१९०२). रेशमी सोनेरी केसांच्या या नववधूला 'सुनी' असे पारशी नाव देण्यात आले. सुनीला पारशी धर्मात प्रवेश मिळाला. सुनीला पाच अपत्ये झाली. पहिली मुलगी सिल्या; दुसरा मुलगा जहांगीर (जेह- जेआरडी), कन्या रोडाबेह, पुत्र दाराब आणि सर्वात धाकटा जिमी (जन्म १९१६). पहिल्या चौघांचा जन्म पॅरिसमध्ये झाला. १९२२ मध्ये आरडींनी मुंबईत मलबार हिलवर प्रशस्त बंगला बांधायला घेतला. पण सुनीची तब्येत टीबीमुळे ढासळत चालली. युरोपात युद्ध चालू असल्याने ती जपानमध्ये योकोहोमा येथे राहिली. युद्धाचे वातावरण थोडे निवळल्यावर ती फ्रान्सला गेली; पण तेथेच तिचे निधन झाले. त्यामुळे आरडींवर पाच मुलांची देखभाल करण्याची जबाबदारी पडली. त्याच वेळी जमशेदपूरच्या कारखान्यात आर्थिक अडचणींमुळे कामगारांचे पगारही करणे अवघड झाले. दोराब टाटांनी आपली सर्व संपत्ती तारण ठेवून दोन कोटींचे कर्ज काढले. १९२४ पासून मात्र कारखाना सुरळीत चालू झाला.

आरडींनी टाटा स्टीलमध्ये आयसीएस अधिकारी जॉन पिटरसन याला संचालक म्हणून घेतले. १९२५ मध्ये स्वत:ची तब्येत ढासळल्याने केंब्रिजला शिकणाऱ्या जहांगीरला पदवी पूर्ण होण्याआधीच बोलावून घेतले. पिटरसन यांना त्यांनी म्हटले, ''हा माझा मुलगा. याला सर्व शिकवा.''

जेआरडींनी जमशेदपूरला प्रशिक्षणाला आरंभ केला. वर्षाच्या आतच आरडींचे



निधन झाले आणि जेआरडी यांच्यावर संपूर्ण टाटा समूहाची जबाबदारी पडली. तंत्रज्ञानातील पदवी नाही ही उणीव स्वत: अभ्यास करून व अद्ययावत ज्ञान संपादन करून त्यांनी भरून काढली.

**वयाच्या अवघ्या चौतीसाव्या वर्षी जेआरडी हे टाटासमूहाचे चेअरमन झाले; आणि भारतीय उद्योगव्यवसायात तरुणांना अधिक वाव मिळू लागला. अनुभवी ज्येष्ठ व्यक्तींची चेअरमनपदी निवड करण्याची त्याकाळची प्रथा.**

''आपण सैनिकापासून अधिकारी न होता एकदम जनरलपदी पोहोचलो आहोत'' असे हसत हसत म्हणून ते सर्वांना विश्वासात घेऊन चर्चेला प्रवृत्त करीत आणि योग्य तो निर्णय घेत. परफेक्शन इज इन डिटेल्स हे त्यांचे आवडते सूत्र होते.

त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञ माणसे केवळ विशिष्ट प्रसंगी सल्लामसलतीसाठी आणण्यापेक्षा कायम आपल्या नोकरीत ठेवण्याचा प्रघात त्यांनी पाडला. अर्थतज्ज्ञ दिनशॉ, सॉलिसिटर जेडी चोक्सी, नानी पालखीवाला, होमी मोदी, कर्नल सहानी, रुसी मोदी, डॉ. जॉन मथाय, सुमंत मुळगावकर, अजित केरकर, दरबारी सेठ अशा अनेक तज्ज्ञांना त्यांनी टाटामध्ये सामावून घेतले आणि त्यांच्या कर्तृत्वाला पूर्ण वाव दिला. टाटामध्ये स्वतंत्र स्टॅटिस्टिकल विभाग सुरू केला (१९४०). वाय. एस. पंडित यांनी २८वर्षे हा विभाग सांभाळून सर्व प्रकारच्या आकडेवारीमध्ये अद्ययावतपणा ठेवला.

भारत सरकारलाही या आकडेवारीमुळे औद्योगिक बाबतीत निर्णय घेणे सुलभ ठरू लागले. टाटा ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सर्व्हिसेस ही स्वतंत्र कंपनी काढून उद्योगात नव्याने प्रकाश करणाऱ्या तरुणांना प्रशिक्षण देण्यास आरंभ केला. व्यवस्थापनक्षेत्र हा विषय त्या आधी कोणाला स्वतंत्र अभ्यासाचा विषय वाटत नव्हता. मिनू मसानी यांच्या नेतृत्वखाली जनसंपर्क विभाग सुरू करण्यातही त्यांचा पुढाकार होता. १९६१ मध्ये हार्वर्ड विद्यापीठाच्या सहकार्याने अहमदाबादला पहिली आयआयएम संस्था सुरू झाली. त्याआधी आपल्या अधिकाऱ्यांसाठी रिफ्रेशर कोर्सेस जेआरडींनी सुरू केलेले होते. १९६४ मध्ये पुण्यात टाटा मॅनेजमेंट ट्रेनिंग सेंटर सुरू झाले.

वयाच्या अवघ्या चौतीसाव्या वर्षी जेआरडी हे टाटासमूहाचे चेअरमन झाले; आणि भारतीय उद्योगव्यवसायात तरुणांना अधिक वाव मिळू लागला. अनुभवी ज्येष्ठ व्यक्तींची चेअरमनपदी निवड करण्याची त्याकाळची प्रथा. त्यामुळे फार धाडसी, नावीन्यपूर्ण उपक्रम हाती घेताना खळखळ होई. तरुणांच्या धाडसी, तडफदार नेतृत्वाचा फायदा व्यावसायिक प्रगतीला नवी दिशा देऊ शकतो हे

**१९२९ मध्ये फ्लाइंग क्लब स्थापन झाला. ३ फेब्रुवारी रोजी जेआरडींनी तीन सोबत्यांसह तीन तास पंचेचाळीस मिनिटांचे उड्डाण केले. त्यानंतर त्यांना स्वतंत्रपणे विमान उडवायची परवानगी मिळाली. लगेच त्यांनी इंग्लंडला जाऊन जिप्सी मॉथ हे विमान खरेदी केले.**

जेआरडींच्या द्वारे सर्वांच्या लक्षात आले. १९४५ साली जमशेदपूरला रेल्वे इंजिन, बॉयलर वगैरे उत्पादन करणारा सर्वंकष इंजिनिअरिंग उद्योग उभा राहिला. टेल्कोमुळे पुढे शेतीसाठी ट्रॅक्टर, बुलडोझर, डिझेल इंजिन अशी अवजड वाहनेही देशात होऊ लागली. सिमेंटचे उत्पादनही जोरात सुरू झाले. सुमंत मुळगावकर यांनी सर्वसामान्य ड्रायव्हरलाही सहजपणे चालवता, दुरुस्त करता येईल असा ट्रक तयार करण्यासाठी सगळे तंत्रज्ञान पणाला लावले. (इंडिका ही संपूर्ण भारतीय बनावटीची पहिली कारही बनवण्याचे श्रेय टाटांनाच जाते). १९४८ साली एअर इंडियाची आंतरराष्ट्रीय सेवा सुरू झाली. त्यानंतर टाटा केमिकल्स, १९६० मध्ये टाटा एक्सपोर्टस यांचा शुभारंभ झाला. संगणक क्षेत्र, बांधकाम, चहाउद्योग... नवनवी क्षेत्रे टाटा समूह पादाक्रांत करीत राहिला. आर्थिक उदारीकरणाच्या धोरणानंतर टाटांची दौड आणखी वेगाने सुरू झाली. १९८५ ते १९८९ या पाच वर्षांत टाटासमूहाने चौदा नवे प्रकल्प सुरू केले आणि रतन टाटा यांच्यावर त्यांची जबाबदारी सोपवली गेली.

जेआरडींनी १९३७ मध्ये चेअरमनपद स्वीकारले तेव्हा टाटा समूहात १४ कंपन्या होत्या; १९९० साली त्यांनी चेअरमनपद सोडले तेव्हा त्या ९४ होत्या. आणि सतरा कोटींवरून दहा हजार कोटींपर्यंत उलाढाल वाढली होती.

पॅरिसमध्ये जन्म व बालपण, इंग्लंडमध्ये शिक्षण... यामुळे नव्या तंत्रज्ञानाचे, शहरी जीवनाचे संस्कार जेआरडींवर झाले.

आकाशात झेपावणारे झेपेलीन विमान त्यांनी पाहिले... आपणही विमान चालवायचे अशी आकांक्षा ते विमान जागवून गेले. १९२७ मध्ये चार्ल्स लिंडबर्ग यांनी न्यूयॉर्क ते फ्रान्स उड्डाण करून पहिल्यांदा अटलांटिक महासागर ओलांडला. त्यामुळेही विमान चालवण्याची प्रेरणा प्रबळ झाली... फ्रान्समध्ये वीस वर्षांवरील सर्व तरुणांना लष्करात वर्षभर भरती होण्याची सक्ती होती... त्यामुळे जेआरडींना लष्करी सेवेचाही अनुभव मिळाला. वडिलांच्या सांगण्यावरून भारतात परतल्यावर टाटा सन्समध्ये काही काळ काम केल्यावर आपल्याला यापुढे भारतातच राहावे लागणार हे त्यांच्या लक्षात आले आणि त्यांनी फ्रेंच नागरिकत्वाचा त्याग केला.

१९२९ मध्ये मुंबईत फ्लाइंग क्लब स्थापन झाला. ३ फेब्रुवारी रोजी जेआरडींनी



**टाटा एनर्जी इन्स्टिट्यूटद्वारे नवनवे प्रकल्प सुरू करण्यात आले. टाटा स्पोर्टसद्वारे जेआरडी स्पोर्टस कॉम्प्लेक्स हे क्रीडासंकुल उभे करण्यात आले. अशा प्रकारे शिक्षण, आरोग्य, ग्रामीण विकास, कला, संस्कृती, क्रीडा, संशोधन अशा अनेक क्षेत्रांत टाटा कुटुंबियांनी विविध प्रकल्पांना चालना दिली.**

तीन सोबत्यांसह तीन तास पंचेचाळीस मिनिटांचे उड्डाण केले. त्यानंतर त्यांना स्वतंत्रपणे विमान उडवायची परवानगी मिळाली. लगेच त्यांनी इंग्लंडला जाऊन जिप्सी मॉथ हे विमान खरेदी केले. ते घेऊन हौशी वैमानिकाची भूमिका ते पार पाडू लागले. ३ मे १९३० रोजी कराचीहून इंग्लंड हे उड्डाण करण्याच्या शर्यतीत जेआरडींनी भाग घेऊन एकट्याने हे अंतर कापले. कराचीहून लंडनला जाणारा पहिला भारतीय म्हणून अवघ्या तरुणांचे ते हीरो ठरले. एवढेच नव्हे तर थेली विकाजी या सुंदर तरुणीशी ते विवाहबद्धही झाले.

१९३२ मध्ये हवाई टपाल वाहतुकीसाठी त्यांनी परवाना मिळवला. त्यासाठी दोन विमाने खरेदी केली. १५ ऑक्टोबर १९३२ रोजी टपालसेवेचा प्रारंभ झाला. पुढे दर शनिवारी टाटांचे हे छोटे विमान मुंबई, अहमदाबाद, वल्लारी, मद्रास या प्रवासावर निघून, मंगळवारी परत येई... पहिल्या वर्षी टाटा सन्सच्या हवाईसेवेला दहा हजार रुपयांचा फायदा झाला. पुढे प्रवासी वाहतुकीलाही परवानगी मिळाली. त्यावेळी विमान २० हजार रुपयांना मिळे. मुंबई-भावनगर प्रवासाला ५६ रुपये लागत. १९३८ साली कंपनीला ६ लाख रुपयांचा फायदा झाला. १९४४ मध्ये टाटांनी भारतात विमाननिर्मिती करायचे ठरवले. पुण्यात कारखान्याच्या उभारणीला सुरुवात झाली; पण ब्रिटिशांना स्पर्धेची भीती वाटली. विमान उत्पादनाला परवानगी नाकारली गेली. १९४८ मध्ये एअर इंडियाची रीतसर स्थापना झाली. ८ जून १९४८ रोजी मलबार प्रिन्सेस हे विमान मुंबई विमानतळावरून उडाले आणि लंडनला ठरलेल्या वेळी पोहोचले...

जेआरडी टाटा हे दूरदर्शी, द्रष्टे होते. भावी काळात कोणकोणते प्रश्न उद्‌भवतील, कोणकोणती ज्ञानक्षेत्रे प्रभावी ठरतील याचे त्यांना चांगले भान होते. डॉ. होमी भाभा यांच्यासाठी त्यांनी अणुऊर्जा संशोधन केंद्राची स्थापना केली. पुढे त्याचेच रूपांतर 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च'मध्ये झाले.

जमशेदजी भाभा यांच्या कलाविषयक मतांनी भारावलेल्या जेआरडींनी 'नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्टस्' या संस्थेची स्थापना केली. त्याला टाटा थिएटरची जोड दिली. देशातील सांस्कृतिक प्रयोगशीलतेचे आणि चोखंदळ अभिरुची जोपासण्याचे ते केंद्र बनले. बंगलोरला डॉ. राजा रामण्णा यांच्या नेतृत्वाखाली 'नॅशनल इन्स्टिट्यूट

**जेआरडी आणि नेहरू यांचेही समाजवाद व भांडवलशाही धोरण यावरून मतभेद झाले. भारत स्वयंपूर्ण करण्याची व त्यासाठी औद्योगिक क्षेत्रात सर्व आघाड्यांवर अग्रेसर होण्याची भूमिका नेहरूंना प्रारंभी अवास्तव वाटली. त्यामुळे नेहरूंनी त्यांचा सल्ला घेण्याचे शक्यतो टाळणेच पसंत केले.**

ऑफ ॲडव्हान्स्ड स्टडीज्' ही संस्था उभी केली. उर्जाक्षेत्रातील संशोधनासाठी टाटा एनर्जी इन्स्टिट्यूट'द्वारे नवनवे प्रकल्प सुरू करण्यात आले. टाटा स्पोर्टसद्वारे जेआरडी स्पोर्टस कॉम्प्लेक्स हे क्रीडासंकुल उभे करण्यात आले. अशा प्रकारे शिक्षण, आरोग्य, ग्रामीण विकास, कला, संस्कृती, क्रीडा, संशोधन अशा अनेक क्षेत्रांत टाटा कुटुंबीयांनी विविध प्रकल्पांना चालना दिली.

जेआरडींच्या काही आठवणी 'कवडसे' या लेखात संकलित केल्या आहेत. त्यातील डॉ. सुधा मूर्ती यांची आठवण जेआरडींच्या संवेदनशील स्वभावाची कल्पना देणारी आहे. सुधा मूर्ती (त्यावेळच्या सुधा कुलकर्णी) एम.टेक.च्या परीक्षेला बसण्याच्या सुमारास टेल्कोमध्ये शिकाऊ इंजिनिअर अधिकाऱ्यांची भरती करण्याबद्दलची एक जाहिरात वृत्तपत्रात आली. तिच्यात शेवटी महिलांनी या जागेसाठी अर्ज करू नयेत अशी टीप होती. सुधा मूर्तींनी एक पोस्टकार्ड जेआरडी टाटा यांच्या नावाने लिहून पोस्टात टाकले. स्त्रियांना शिक्षणाची समान संधी घटनेने दिली आहे; मग त्यांना आपली क्षमता दाखवण्याची संधी टाटांनी का नाकारावी? याबद्दल त्या पत्रात पोटतिडकीने लिहिले होते. दहा दिवसांनी त्या पत्राचे उत्तर आले. ''मुलाखतीसाठी या. येण्याजाण्याचा प्रथमवर्गाचा खर्च देण्यात येईल'' असे त्यांनी कळवले होते... एका साध्या पत्राची जेआरडी यांजसारख्या टाटा समूहाच्या चेअरमननी दखल घेतली याचे त्यांना आश्चर्य वाटले. त्या मुलाखतीत सुधा कुलकर्णी यांची निवडही झाली... नंतरही जेआरडींचे सौहार्द त्यांना सतत जाणवले...

मोरारजीभाई देसाई यांनी जेआरडींबद्दल काहीसा आकस बाळगून त्यांना एअर इंडियाच्या चेअरमनपदावरून दूर केले... मोरारजी हेकेखोर होते. टाटांनी वीजेच्या गरजेबाबत अभ्यास करून जादा वीजनिर्मितीची व्यवस्था करण्याची भूमिका नियोजनकारांपुढे मांडली. मोरारजींनी ती सरळ धुडकावून लावली. तेव्हा टाटा चटकन बैठकीतून उठून बाहेर निघाले. ''तुमचा महत्त्वाचा वेळ फुकट कशाला घालवायचा? तज्ज्ञ मंडळींनी दिलेल्या आकडेवारीवरून वीजेचा तुटवडा भासणार... तुम्हाला तसे मुळीच वाटत नाही. मग चर्चेचा उगाच घोळ कशाला?'' ...या टाटांच्या रोखठोक वक्तव्याने मोरारजी जमिनीवर आले... टाटांची भूमिका त्यांना



मान्य करावी लागली. टाटांचा अंदाज बरोबर ठरला. आजही वीज टंचाई जाणवत आहे कारण पुरेशा तरतुदी करण्याबाबत सरकारने चालढकल केली.

जेआरडी आणि नेहरू यांचेही समाजवाद व भांडवलशाही धोरण यावरून मतभेद झाले. भारत स्वयंपूर्ण करण्याची व त्यासाठी औद्योगिक क्षेत्रात सर्व आघाड्यांवर अग्रेसर होण्याची जेआरडींची भूमिका नेहरूंना प्रारंभी अवास्तव वाटली. त्यामुळे नेहरूंनी त्यांचा सल्ला घेण्याचे शक्यतो टाळणेच पसंत केले.

जेआरडींच्या पत्नींना १९८० साली हार्ट ॲटॅक आला. पुढे १९८२ मध्ये त्या पडल्याने त्यापुढे व्हीलचेअरवर बसूनच सर्व व्यवहार करावे लागत. त्या काळात जेआरडी लवकर घरी येत. त्यांना वाचून दाखवत. टीव्ही बघत. थेलीबरोबर जास्तीत जास्त राहता यावे म्हणून रविवारी गोल्फ खेळण्याचेही त्यांनी थांबवले.

पत्नीच्या मृत्यूनंतर त्यांच्या जीवनात फारच एकाकीपणा आला. त्यांची बहीण गुल ही ऑगस्ट १९९३ मध्ये वारली. २९ नोव्हेंबर १९९३ रोजी त्यांचे निधन झाले. त्यावेळी त्यांचे वय ८९ होते.

जेआरडींचे संपन्न, सुसंस्कृत व्यक्तिमत्त्व, त्यांचा दूरदर्शीपणा, गुणी माणसांची त्यांना असणारी पारख, नवे प्रकल्प राबविण्याची क्षमता, कामगारांना कुटुंबियांप्रमाणे वागविण्याची पद्धत, सांस्कृतिक व कलाक्षेत्रात नवनव्या प्रयोगांना दिलेले प्रोत्साहन– या गोष्टींचा विसर पडणे शक्य नाही. राज्यकर्त्यांनी त्यांची किंमत वेळीच केली असती तरी भारतीय औद्योगिक प्रगतीचा प्रवाह दीर्घकाळ कुंठित राहिला नसता.

**पृष्ठे : १६० ● किंमत : १००रु. ● सभासदांना : ७५ रु. ● पोस्टेज: २०रु.**


## २०००० वाचकांनी गौरविलेले पुस्तक... संभाजी

''अंत्यसंस्काराचा हा निर्णय आम्हाला डावलून आमच्या पाताळयंत्री कारभाऱ्यांनी आणि मातोश्रींनी घेतलाच कसा? का त्या शिवरायांचा हा शंभूबाळ अजून जिवंत नव्हता? की आपल्या जन्मदात्या लोकोत्तर पित्याच्या देहाला अग्नी देण्याइतकेही त्याचे हात पवित्र उरले नव्हते?''




**विश्वास पाटील**

किंमत : ४८०रु. पोस्टेज ३५रु.

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

## कहाणी उद्योगजगतातील सम्राटांची

आपले व्यवहारकौशल्य, बुद्धीमत्ता आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर अक्षरशः शून्यातून बलाढ्य उद्योगविश्व उभारणाऱ्या तसेच पूर्वसूरींच्या उद्योगविश्वाला पुन्हा नवी उभारी देणाऱ्या काही कर्तृत्ववान उद्योजकांच्या या यशोगाथा.
नवउद्योजकांना तसेच उद्योगाची मुहूर्तमेढ रोवू पाहणाऱ्यांना ही पुस्तके अत्यंत मार्गदर्शक ठरतील.




**बिझिनेस महाराजे**

गीता पिरामल
- अनु. अशोक जैन -

किंमत २५०रु.




**बिझिनेस लेजंड्स**

गीता पिरामल
- अनु. अशोक जैन -

किंमत ३००रु.




**थॉट लीडर्स**

श्रीनिवास पंडित
अनु. सुप्रिया वकील / विलास वाडकर

किंमत ३००रु.

प्रत्येकी पोस्टेज २०रु.

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**



# मयादा - इराकची कन्या

**जीन सॅसन**

**सद्दामच्या राजवटीतले सुन्न करणारे अन्याय आणि अत्याचार**

**अनु. भारती पांडे**




मयादा - इराकची कन्या हे पुस्तक इराकमधील सद्दाम हुसेनच्या कारभारावर प्रकाश टाकणारे आहे.

इराकवर अमेरिकेने २१ मार्च २००३ रोजी हल्ला केला आणि ९ एप्रिल रोजी बगदादवर कब्जा मिळवला. १३ एप्रिलला सद्दाम हुसेनचे मूळ गाव तिक्रित ताब्यात घेतले आणि १५ एप्रिलला युद्ध संपल्याची घोषणा केली... त्यानंतर दीड-दोन वर्षांनी सद्दाम हुसेनलाही पकडण्यात यश मिळवले. आता सद्दाम हुसेनवर खटला चालू आहे. त्याच्याशी सद्दाम हुसेनचा असहकार चालू असून ''या कोर्टाला माझ्याविरुद्ध खटला चालविण्याचा अधिकारच नाही... मी कसलाही प्रमाद केलेला नाही...'' अशी आपली भूमिका तो मांडत आहे. इराकचा अध्यक्ष म्हणून सद्दाम हुसेनची अधिकृत कारकीर्द जुलै १९७९ पासून सुरू झाली असली तरी १९६८ पासूनच सद्दाम हुसेन हा इराकमधील खरा सत्ताप्रमुख होता. १९५८ साली इराकमध्ये सैन्याचा उठाव होऊन राजे दुसरे फैझल यांची हत्या करण्यात आली. बाथ पार्टीने सत्ता ताब्यात घेण्याचा नंतर प्रयत्न केला; पण तो फसला आणि सद्दाम हुसेनला पळ काढावा लागला. १९६३ मध्ये सात महिने बाथ पार्टीचे इराकवर प्रभुत्व होते. परंतु पुढे तिची पीछेहाट झाली. १९६८ मध्ये अहमद हास्सन अल बाकिरने बाथ पार्टीला पुनश्च सत्ता मिळवून दिली. त्याचा प्रतिनिधी या नात्याने सद्दाम हुसेन कारभार पाहू लागला. स्वतःचे बळ वाढवू लागला. तब्बल दहा वर्षांनी अल बाकिरला निष्प्रभ करून सद्दाम हुसेन इराकचा सर्वेसर्वा अध्यक्ष झाला आणि बाथ पार्टीच्या स्वच्छता मोहिमेची घोषणा करून हजारो सदस्यांना पक्षविरोधी कारवाया केल्याबद्दल त्याने मृत्युदंड दिला. इराकचे उपपंतप्रधान तारीक अझीझ यांच्या खुनाचा प्रयत्न केल्याच्या आरोपावरून इराकने

**छळाचे वेगवेगळे प्रकार वापरण्यातील कौशल्य हे या अधिकाऱ्यांच्या नेमणुकीचे वा बढतीचे आवश्यक असे क्वालिफिकेशन मानले जाते. 'मयादा'मध्ये अशा छळाचे अनेक नमुने आपल्यापुढे येतात आणि मन सुन्न होते.**

इराणविरुद्ध वातावरण पेटवले. आणि इराकमधील ज्या शिया व्यक्तींच्या पासपोर्टवर 'इराणमध्ये जन्म' असा शिक्का होता त्यांना इराकमधून हाकलून लावण्याची मोहीम उघडली. सप्टेंबर १९८० मध्ये इराण व इराकचे युद्ध झाले. ७ जून १९८१ रोजी इराकच्या बगदादजवळील अणुनिर्मिती केंद्रावर इस्रायलने बाँबफेक केली. १९८८ मध्ये पुन्हा इराक-इराण नागरी युद्ध पेटले; ते सहा महिने चालले. औपचारिक युद्धबंदीच्या घोषणेने ते थांबले. २ ऑगस्ट १९९० रोजी इराकने कुवेतवर स्वारी केली. सहा दिवसांत कुवेत जिंकून इराकचा १९ वा विभाग म्हणून कुवेतला सामील करून घेतले; परंतु संयुक्त राष्ट्रसंघाच्या ठरावाद्वारे कुवेतमधून ३ एप्रिल १९९१ रोजी सर्व इराकी सैन्य हटवण्यात आले. इराकवर आर्थिक बंधने लादण्यात आली आणि इराकी सैन्य घटवण्याची प्रक्रियाही सुरू झाली.

इराकने या काळात आपले शस्त्रबळ वाढवण्याचे धोरण जारीच ठेवले; आणि अण्वस्त्रनिर्मितीसाठीही वेगवेगळ्या राष्ट्रांकडून तंत्रज्ञान मिळवण्याला अग्रक्रम दिला. इराकमधील अण्वस्त्रकेंद्रांची पाहणी करण्याचा संयुक्त राष्ट्रसंघाच्या प्रतिनिधींना मुभा देण्याचा ठराव मानण्यास इराकने नाराजी दर्शविली.

'मयादा'च्या रूपाने सद्दाम हुसेन याच्या राजवटीतील अत्याचार-अन्यायाचे भीषण स्वरूप स्पष्ट करण्यात आले आहे. एकतंत्री हुकुमशहांच्या राजवटीत नागरिकांना आपला स्वाभाविक सहज जीवनक्रम चालवणेही मुश्किल होते. आपले विचार आणि मते व्यक्त करण्याची मुभा राहत नाही. आपल्या अवतीभवतीची माणसे आपल्याबद्दल खोटेनाटे सांगून, आपण सत्तेविरुद्ध आहोत असा संदेश संबंधित अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवून आपल्या घरादारावर नांगर फिरवू शकतात. आपण जराशीही टीका केली तरी आपल्याला तेथील गुप्तहेर यंत्रणा ताब्यात घेऊ शकते आणि चौकशीच्या नावावर हवे तसे अनन्वित अत्याचार करू शकते. चौकशीच्या नावावर फार्स चालतो; शिक्षा देण्याचे जणू आधीच ठरलेले असते; आणि छळाचे एकापेक्षा एक अघोरी मार्ग चोखाळण्यात पोलिस यंत्रणा धन्यता मानत असते. विकृत मनोवृत्तीचे छळवादी अधिकारी सत्य वदवण्याच्या अभिनिवेशात निरपराध व्यक्तींनाही वाटेल त्या निर्घृण मार्गाने शारीरिक-मानसिकदृष्ट्या विकल-विव्हल करीत असतात. आपल्याला हवी तशी कबुली देईपर्यंत छळ



चालू ठेवतात आणि त्या प्रयत्नात त्या व्यक्तीला जन्मभरासाठी अपंग, विकलांग करायला तयार असतात. छळाचे वेगवेगळे प्रकार वापरण्यातील कौशल्य हे या अधिकाऱ्यांच्या नेमणुकीचे वा बढतीचे आवश्यक असे क्वालिफिकेशन मानले जाते. 'मयादा'मध्ये अशा छळाचे अनेक नमुने आपल्यापुढे येतात आणि मन सुन्न होते.

**मयादाची आई सल्वा अल हुसरी ही अनेक भाषा जाणणारी. विविध वकिलातींशी व राजदूतांशी परिचित असणारी आकर्षक कॉस्मापॉलिटन व्यक्तिमत्त्वाची प्रभावशाली महिला. सद्दाम हुसेनलाही तिचा धाक वाटे. तासाभराच्या पूर्वसूचनेनेही पाचपन्नास लोकांसाठी उत्तम मेजवानीचे आयोजन करू शके.**

मयादा हल अस्करी हिचे आजोबा जाफर पाशा हे इराकचे एकेकाळचे संरक्षण मंत्री आणि पंतप्रधान; काही काळ ग्रेट ब्रिटनमधील राजदूत. इराकचे राजे गाझी यांचे संरक्षण करताना त्यांचा खून झाला (१९३६). साहजिकच मयादाचा इराकच्या राजघराण्याशीही चांगला संपर्क.

तिच्या आईचे वडील साती अल अस्करी हे अरब राष्ट्रवादाचे प्रवर्तक; शिक्षणतज्ज्ञ आणि लेखक. राजे फैझल पहिले यांचे निकटवर्ती सहकारी. मयादाची आई सल्वा अल हुसरी ही अनेक भाषा जाणणारी. विविध वकिलातींशी व राजदूतांशी परिचित असणारी आकर्षक कॉस्मापॉलिटन व्यक्तिमत्त्वाची प्रभावशाली महिला. सद्दाम हुसेनलाही तिचा धाक वाटे. तासाभराच्या पूर्वसूचनेनेही पाचपन्नास लोकांसाठी उत्तम मेजवानीचे आयोजन करू ती शके. परदेशी राजदूतांवर तिचा प्रभाव विलक्षण असे. त्यांच्याशी संपर्क वाढवण्यासाठी मयादाच्या आईच्या मेजवान्या उपयुक्त ठरत. इराणच्या गुप्तहेर यंत्रणेचा प्रमुख डॉ. फदल हा तिच्या व्यापक जनसंपर्काचा फायदा घेण्यासाठी, परदेशी लोकांचे मत इराकबद्दल चांगले व्हावे यासाठी मयादाच्या या बहुश्रुत आईवर अशी कामगिरी अधूनमधून सोपवत असे. सद्दामलाही तिच्या या कौशल्याबद्दल आदर होता. परदेशी स्नेह्यांमध्ये इराकची प्रतिमा उंचावण्याच्या दृष्टीने डॉ. फदल सल्वावर निर्भर राहात. डॉ. फदल यांनी तिच्या घरात गुप्त श्रवणयंत्र बसवण्याची कल्पना काढली तर तिने त्याला कडाडून विरोध केला. सातीची मुलगी आपण होऊन इराकमध्ये, बाथिस्ट पार्टीच्या अमदानीतही राहते याचा सद्दामच्या सरकारला अभिमान होता. त्यामुळे तिला आदराने वागवले जाई. तिने जर काही सुचवले तर डॉ. फदल सकारात्मक प्रतिसाद देत. तिने कोणाही व्यक्तीबाबत व समस्येबाबत मदत मागितली तर शक्य तेवढी मदत करीत. फर्झाद बाझॉफ्ट या ब्रिटिश पत्रकाराबरोबर हेरगिरीच्या आरोपावरून पकडल्या गेलेल्या डॅफ्नी पॅरिश या ब्रिटिश नर्सबाबत ब्रिटिश वकिलाच्या पत्नीने ती निर्दोष असल्याचे सल्वाला सांगितले. तिने ते डॉ. फदलला कळवले;

**सद्दामबद्दल प्रशस्तिपर लिहिणे अशक्य झाल्यामुळे मयादा वृत्तपत्रातील वार्ताहराची नोकरी सोडून स्वत:चा छापखाना सुरू करते... या छापखान्यात सद्दामविरोधीक पत्रक छापले गेल्याच्या आरोपावरून तिला पकडण्यात येते. महिलांच्या कोठडीत ठेवण्यात येते.**

तेव्हा डॉ. फदल यांनी तिला मुक्त करण्याच्या दिशेने पावले टाकली. सद्दामने सल्वाला या कामाबद्दल एक दुमजली घर बक्षीस दिले. तथापि सल्वाने पुढे इराण सोडून अम्मानमध्ये घर केले. इराक सोडून अन्यत्र राहण्याची संधी मयादालाही होती, पण मयादा तशी संधी घेत नाही... त्यामुळेच तिच्यावर पुढे सद्दामच्या कारावासात जाण्याची पाळी येते.

खरे तर मयादा ही पत्रकार म्हणून स्वत:ची प्रतिमा निर्माण करते आणि तिचे लेख आवडत असल्याचे सद्दामही तिला सांगत असतो.

सद्दामच्या आणि तिच्या 'घनिष्ट' संबंधांमुळे तिच्यावर लेखनाच्या काही खास जबाबदाऱ्याही टाकण्यात येतात. सद्दाम तिला अधूनमधून भेटीलाही बोलावत असतो. परंतु वृत्तपत्रात सद्दाम व त्याचे सहकारी यांच्याबद्दल लिहिणे पुढे पुढे मयादाला आत्मवंचनाकारक वाटू लागते. कारण सद्दामच्या कारकीर्दीत भ्रष्टाचार आणि अत्याचार यांची परमावधी होते. लोकशाही मूल्ये सर्रास पायदळी तुडवली जातात. सद्दामविरुद्ध एखाद्याने काही उद्गार चुकूनही काढले तरी त्याची सरळ कारागृहात रवानगी होते. त्याचा छळ केला जातो. त्याच्या घरादारावर जप्ती येते...

सद्दामबद्दल प्रशस्तिपर लिहिणे अशक्य झाल्यामुळे मयादा वृत्तपत्रातील वार्ताहराची नोकरी सोडून स्वत:चा छापखाना सुरू करते... या छापखान्यात सद्दामविरोधी पत्रक छापले गेल्याच्या आरोपावरून तिला पकडण्यात येते. महिलांच्या कोठडीत ठेवण्यात येते. त्या कोठडीत– वॉर्ड क्र. ५२ मध्ये इतरही महिला कैदी असतात. या अठरा जणींबरोबर काढलेल्या आठ दिवसांत तिला जे ऐकायला, बघायला मिळते, सोसावे लागते त्याची कहाणी 'मयादा'मध्ये आपल्याला वाचायला मिळते आणि सद्दामच्या राजवटीतील अत्याचारांची आणि छळवादाची अनेकविध रूपे समोर येतात. त्याच्या दहशतवादाची आणि सर्वंकष छळवादाची ही रूपे कोणत्याही संवेदनाक्षम व्यक्तीला सुन्न करून सोडतील अशीच आहेत. न्यायदानाचा बाह्य देखावा उभा करण्यातील या यंत्रणांची नाटकी फसवेगिरीही आपल्याला स्पष्ट दिसते आणि सद्दामच्या दुष्टपणाची मजल कुठवर जाऊ शकते हेही लक्षात येते.

'मयादा'ची ही कहाणी सांगितली आहे ती जीन सॅसन या लेखिकेने. १९७८ ते १९९० अशी बारा वर्षे रियाधमध्ये रुग्णालयात काम करणाऱ्या जीन सॅसनने



**मयादाशी सॅसनची चांगली मैत्री होते. मयादा घटस्फोटित आहे; तिला पंधरा वर्षांची मुलगी (फे) आणि बारा वर्षांचा मुलगा (अली) अशी दोन मुले आहेत; मांजरे पाळण्याचा तिला शौक आहे; ती मूळची मेसापोटेमियाची- म्हणजे इराकची कन्या असून देशाबद्दल तिला अभिमान होता हे सॅसनला कळते.**

मध्यपूर्वेत भरपूर प्रवास केला. अनेक सौदी स्त्रियांशी जवळचे संबंध प्रस्थापित केले. पुरुषप्रधान समाजात एक स्त्री म्हणून जगण्यातील अर्थ तिने समजावून घेतला. क्रौर्य व हिंसा यापासून बचावण्यासाठी स्त्रियांना कोणकोणत्या अग्निदिव्याला सामोरे जावे लागते तेही तिने जवळून बघितले.

सॅसनने 'द रेप ऑफ कुवेत' या पुस्तकात सद्दाम हुसेनवर टीका करणारे लेखन केले.

१९९८ मध्ये सॅसनने इराकला पुन्हा भेट देण्याचे ठरवले. तेव्हा खुद्द सद्दामलाच पत्र लिहून आणि त्या पुस्तकाची प्रत पाठवून 'आपल्या कुवेतवरील आक्रमणाबद्दल मी नाराज असले तरी मला इराकमधील सर्वसामान्य नागरिकांचे जीवन कसे चालले आहे हे बघण्याची इच्छा आहे, त्यासाठी इराकभेटीची परवानगी द्यावी' अशी विनंती केली. आश्चर्य असे की न्यूयॉर्कच्या इराकी वकिलातीकडून तुमच्या व्हिसाची व्यवस्था केली जाईल असे पत्र तिला मिळाले. त्यावेळी इराकमध्ये कोणत्याही विमानाला जाण्याची मुभा नव्हती; तेव्हा जॉर्डनमार्गे ती इराकला पोहोचली. एकटीने इराकला भेट देण्याच्या तिच्या धाडसाचे अनेकांना कौतुक वाटले. अल रशीद या हॉटेलात तिचे वास्तव्य. सद्दामने माहिती मंत्रालयातील अधिकाऱ्यांना तिच्याकडे पाठवले; काही कुटुंबांशी भेटी घडवून आणल्या.

बगदादमध्ये दुभाष्या म्हणून मयादा सॅसनच्या संपर्कात आली. मयादा तिला सांगते, गेल्या कितीतरी वर्षांत मंत्रालयाने मला कसल्याही कामासाठी बोलावलेच नव्हते...

मयादाशी सॅसनची चांगली मैत्री होते. मयादा घटस्फोटित आहे; तिला पंधरा वर्षांची मुलगी (फे) आणि बारा वर्षांचा मुलगा (अली) अशी दोन मुले आहेत; मांजरे पाळण्याचा तिला शौक आहे; ती मूळची मेसापोटेमियाची– म्हणजे इराकची– कन्या असून देशाबद्दल तिला अभिमान होता हे सॅसनला कळते. प्रथमदर्शनीच त्या दोघींच्या एकमेकींबद्दल जवळीक जाणवते. मयादाची माहिती ती मिळवते.

मयादाचे वडील अल अस्करी घराण्यातील तर आई अल हुसरी घराण्यातील- ही दोन्ही घराणी इराकमधील तसेच अरब देशातील राजकीय घराणी. सुन्नी पंथीय मुस्लीम. बुद्धिवादी, सुधारक, श्रीमंत घराणी. त्यामुळे मयादाने मनासारखे शिक्षण

**इराक हा देश म्हणजे एक प्रचंड तुरुंग आहे; आणि सद्दामविरोधी कोणी ब्र उच्चारला तरी त्या व्यक्तीने खरा-खोटा कबुलीजबाब द्यावा म्हणून तिचा छळ केला जाई. तिची आई जॉर्डनमध्ये रहायला गेली; पण मयादा इराकमध्येच राहिली.**

घेऊन डॉक्टर होण्याची अपेक्षा असली तरी इराकमधील सत्तापालटाने आणि तिच्या वडिलांच्या कर्करोगाच्या व्याधीमुळे तिची कोंडी झाली.

१९६८ साली बाथ पक्ष सत्तेवर आला. बहुतेक बुद्धिवादी इराकमधून शेजारच्या देशात स्थलांतरित झाले; पण मयादाच्या आईवडिलांनी इराक सोडण्याचे टाळले. सद्दाम हुसेनच्या कारकीर्दीत जनतेवर अनन्वित जुलूम होत होते. मयादाने वृत्तपत्रात वार्ताहर म्हणून काम सुरू केले. तिचे लग्न झाले. दोन मुले झाली. सद्दाम तिच्या लेखनावर खूष होता. त्याची अधूनमधून भेट होई. तिने त्याच्या राजवटीबद्दल अनुकूल लिहावे अशी त्याची अपेक्षा असे. ...ती अपेक्षा पूर्ण करणे तिला पुढे पुढे अवघड जाऊ लागले म्हणून तिने वृत्तपत्रातील लेखन थांबवले. अवतीभवतीच्या भ्रष्टाचारामुळे सद्दामची कारकीर्द संपली तरच इराकची अधोगती थांबेल असे तिचे मत झाले. ...इराक हा देश म्हणजे एक प्रचंड तुरुंग आहे; आणि सद्दामविरोधी कोणी ब्र उच्चारला तरी त्या व्यक्तीला पकडून तुरुंगात टाकले जाई; त्या व्यक्तीने खरा-खोटा कबुलीजबाब द्यावा म्हणून तिचा छळ केला जाई. तिची आई जॉर्डनमध्ये रहायला गेली; पण मयादा इराकमध्येच राहिली...

...तिने एक छापखाना सुरू केला. त्यात सर्व प्रकारची छपाईची कामे ती करी. १९९९ मध्ये सद्दामविरोधी पत्रक छापल्याच्या आरोपावरून तिला पकडून तुरुंगात ५२ क्रमांकाच्या कोठडीत टाकले गेले आणि तिने ते पत्रक छापल्याची कबुली द्यावी म्हणून तिचा तेथील पद्धतीप्रमाणे छळ सुरू झाला. आठ दिवस ती त्या तुरुंगातील महिलांच्या क्र. ५२ च्या वॉर्डमध्ये राहिली. तिच्याबरोबर १८ महिला कैदी असतात. त्या महिलांच्या कहाण्या तिला ऐकायला मिळाल्या; तुरुंगातील एकूण व्यवस्था व छळयंत्रणा तिला पहायला मिळाली. तेथील खाण्यापिण्याचे हाल तिला सोसावे लागले... आठ दिवसांनी तिची तुरुंगातून सुटका झाली आणि जॉर्डनमध्ये पळून जाण्याची संधी तिने साधली. आपल्या अटकेबद्दल आणि तुरुंगातील वास्तव्याबद्दल अमेरिकेतील सॅसनला तिने कळवले; इ.स. २००० मध्ये तिची मुलगी फे इराक सोडून बाहेर पडली. इ.स. २००१ मध्ये ओसामा बिन लादेनच्या अतिरेक्यांकडून न्यूयॉर्कमधील ट्विन टॉवर्स उद्ध्वस्त



केले गेले. अमेरिकेने अफगाणिस्तानवर हल्ला केला. सद्दामही ओसामासारखाच आत्यंतिक भूमिका घेणारा आणि इराकला अण्वस्त्रसज्ज करण्याच्या प्रयत्नात आहे हे लक्षात आल्यावर अमेरिकेने इराकवर हल्ला केला. आणि इ.स. एप्रिल २००३ मध्ये इराक सद्दामच्या तावडीतून मुक्त झाले... पुढे दीड-दोन वर्षांनी सद्दामला पकडण्यात आले.

**सद्दामच्या राजवाड्यापासून ते थेट सद्दामच्या छळछावणीपर्यंत जे काही घडत होते, त्याचे वास्तव चित्र जगासमोर यावे अशा कल्पनेतून मयादाला मध्यवर्ती ठेवून पुस्तक लिहिण्याचा निर्णय सुसानने घेतला**

इराकमधील सद्दामच्या राजवटीतील जुलूम जबरदस्तीची कहाणी लोकांसमोर यावी या कल्पनेतून, सद्दामच्या राजवाड्यापासून ते थेट सद्दामच्या छळछावणीपर्यंत जे काही घडत होते, त्याचे वास्तव चित्र जगासमोर यावे अशा कल्पनेतून मयादाला मध्यवर्ती ठेवून पुस्तक लिहिण्याचा निर्णय सुसानने घेतला आणि त्यासाठी मयादा, तिचे घराणे, इराकचा इतिहास, सद्दामच्या कारकीर्दीतील भ्रष्टाचार– वगैरे माहिती मिळवली; आणि मयादाच्या माध्यमातून इराकच्या एकूणच सद्यःकालीन घटनाक्रमावर प्रकाश टाकण्याच्या दृष्टीने या पुस्तकाची आखणी केली आहे.


क्र. ५२ च्या कोठडीतील अठरा महिला– त्यांच्या वेगवेगळ्या वृत्ती-प्रवृत्ती आणि तुरुंगातील अनन्वित जुलूम सहन करूनही त्यांनी परस्परांना सांभाळण्यासाठी, मनोबल टिकवण्यासाठी दाखवलेली जिद्द– यातून इराकी स्त्रीच्या चिवटपणाचीही साक्ष पटते.

सद्दामच्या जवळ असणारी डॉ. फदल यांच्यासारखी माणसेही पुढे सद्दामच्या लहरीला आणि रोषाला बळी पडतात. सद्दाम हा दिवसेंदिवस अधिक क्रूर होत जातो; त्याचे अधिकारीही उद्दाम होत जातात...

...आणीबाणीच्या काळात भारतात जे घडले त्याबद्दल सर्वसामान्य भारतीयांच्या मनात राग आहे; पण ते सगळे यापुढे काहीच नव्हे असे इराकमधील सद्दामच्या राजवटीतील अत्याचार बघितल्यावर वाटते. आणीबाणी सत्तावीस महिनेच टिकली; सद्दामचा उद्दामपणा वीस वर्षे चालू राहिला. इस्लामी राजवटीतील लोकशाहीपरंपरेच्या अभावाचा हा प्रभाव म्हणावा लागेल.

**पृष्ठे : ३२० ● किंमत : २५०रु. ● सभासदांना : १८७ रु. ● पोस्टेज: २०रु.**

## विश्वसाहित्यातील बेस्ट




**डॉ. रॉबीन कूक, कोलंबिया युनिव्हर्सिटी मेडिकल स्कूलमधून पदवीधर, तसेच हॉवर्ड युनिव्हर्सिटीतून एम.डी. झालेला एक निष्णात डॉक्टर. लेखनाची विशेष आवड असल्यामुळे कादंबरी लेखनाकडे वळला. कोमा, क्रोमोझोम, टॉक्सिन, आऊटब्रेक या त्याच्या 'मेडिकल थ्रिलर' कादंबऱ्यांनी पाश्चात्त्य साहित्यात 'बेस्ट सेलर' म्हणून स्थान मिळवले. त्याच्या 'कोमा' या कादंबरीवर स्वतः 'मायकेल क्रायटन' या जगविख्यात कादंबरीकाराने भव्य चित्रपट बनवला. सध्या डॉ. कूक हे अमेरिकेतील फ्लोरिडा येथे वास्तव्यास असतात.**

**डॉ. रॉबीन कूक यांच्या काही 'बेस्ट सेलर' कादंबऱ्यांचे उत्कृष्ट मराठी अनुवाद आम्ही वाचकांपुढे सादर केले आहेत.**










| टॉक्सिन | कोमा | क्रोमोझोम-६ |
|---|---|---|
| - अनुवाद - | - अनुवाद - | - अनुवाद - |
| डॉ. प्रमोद जोगळेकर | डॉ. रवींद्र गुर्जर | वैशाली जोशी |
| किंमत २५०रु. | किंमत १००रु. | किंमत ३५०रु. |

प्रत्येकी पोस्टेज २०रु.

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**






# वसंतगंधा

**वसंतगंधा -कोरियन लोककथांतून साकारलेली हळुवार प्रेमकहाणी**

**अनु. माधवी कोल्हटकर**

थेट कोरियन भाषेतून एखाद्या कादंबरीचा मराठीत अनुवाद– असा योग लाभलेले पहिलेच पुस्तक म्हणून 'वसंतगंधा'चा निर्देश करावा लागेल.

चुन ह्यांग जन्- चुन ह्यांग नावाच्या मुलीची कहाणी ही एका लोककथेतून विकसित झालेली, अठराव्या शतकातली कलाकृती. हिच्या मूळ लेखकाचा ठावठिकाणा नाही. तिच्या तीस आवृत्त्या पोथ्यांच्या रूपात आहेत. सात आवृत्त्या वुडब्लॉकमध्ये आहेत आणि साठपेक्षाही जास्त छापील आवृत्त्या आहेत. या कथेवर आधारित नाटके व चित्रपट यांचीही संख्या बरीच आहे. इ.स. २००१ मध्ये कान्स चित्रपटमहोत्सवातही या कथेवरचा चित्रपट दाखविण्यात आला. अभिजात कोरियन वाङ्मयीन कलाकृतीचे प्रतिनिधित्व ही कथा करते असे म्हणायला हरकत नाही. बहुतांश अभिजात कोरियन साहित्य हे चरित्रात्मक आहे; ते आदर्शवादी, कल्पनारम्य आणि रोमँटिक आहे, वास्तववादापासून ते दूर असते असे म्हणतात.

'वसंतगंधा' ही एक प्रेमकहाणी आहे.

उच्चकुलीन कथानायक इदोऱ्यंग आणि एका गणिकेची मुलगी चुन ह्यांग यांच्या एकनिष्ठ प्रेमाची कहाणी आहे. हजार-पाचशे वर्षांपूर्वीची.

इदोऱ्यंग हा सोळा वर्षांचा पीळदार तरुण. देखणा. अभ्यासू. बुद्धिमान. भरदार बांधा. चंद्रप्रकाशात तो मासेमारी करायचा आणि कविताही लिहायचा. त्याचे चित्रलिपीतले लेखनही मोठे आकर्षक. वळणदार. त्याचे वडील एका प्रदेशाचे मुख्य अधिकारी म्हणजे सात्तो होते. उत्तम कारभार करून नागरिकांच्या आदराला ते पात्र ठरलेले होते. आपल्या हुशार मुलालाही आपल्याप्रमाणेच उच्च अधिकारी बनवण्याचे त्यांचे स्वप्न. त्या दृष्टीने त्यांनी त्याच्या शिक्षणाकडे आणि व्यक्तिमत्त्व विकासाकडे लक्ष दिलेले. निसर्गाचे प्रेम इदोऱ्यंगच्या काव्यलेखनातून

**इदोऱ्यंग जेव्हा हवामहालाजवळ पोहोचतो तेव्हा नेमकी तेथे वल्मे या गणिकेची सुंदर मुलगी चुन ह्यांग झोक्यावर बसून झोके घ्यायला येते. नुकत्याच फुललेल्या नाजूक विलो वृक्षासारखी कंबर, रेशमी लांब परकर, दोन वेण्या. त्यात सोन्याचे आकडे. पायात मोजे... शेलाटी अंगयष्टी.**

व्यक्त होई. निसर्गरम्य ठिकाणांना भेटी देण्याची त्याला हौस. त्याच्याबरोबर त्याचा सेवक आणि मित्र बांग जा हा नेहमी असे. आपल्या संस्कृत नाटकातल्या विदूषकासारखे हे पात्र. विनोदी आणि हजरजबाबी. व्यवहारचतुर आणि चाणाक्ष.

एकदा इदोऱ्यंग आपल्या वडिलांना सांगतो, ''जवळच्या किल्ल्याला भेट देऊन काहीतरी काव्य सुचलं तर बघतो.'' वडील आनंदाने परवानगी देतसात. गाढवावर खोगीर चढवून त्यावर इदोऱ्यंग स्वार होतो. केसांना गव्हाचे तेल, पायात तलम विजार आणि मोजे. गुडघ्यापर्यंत पोहोचणारा अंगरखा, नाजूक नक्षीदार बटने. कोणालाही भुरळ घालावा असा इदोऱ्यंगचा थाट होता.

पाच मे रोजी म्हणजे महिला दिन. आपल्याकडील वसंतपंचमीसारखा दिवस. इदोऱ्यंग क्वांग हाल लू या हवामहालाजवळ जाऊन पोहोचतो. जवळच प्रेमिकांचा पूल असतो. महिला दिनाचे वैशिष्ट्य म्हणजे या दिवशी हिवाळा संपतो. बराच काळ हिवाळ्याच्या थंडीमुळे घराबाहेर पडायचे टाळणाऱ्या महिला कोवळ्या उन्हात बाहेर पडतात. शिकेकाईसारखा पदार्थ केसांना लावून झऱ्याखाली मनसोक्त सामुदायिक स्नान करतात. झाडांना दोऱ्या बांधून झोके घेतात.

इदोऱ्यंग जेव्हा हवामहालाजवळ पोहोचतो तेव्हा नेमकी तेथे वल्मे या गणिकेची सुंदर मुलगी चुन ह्यांग झोक्यावर बसून झोके घ्यायला येते. नुकत्याच फुललेल्या नाजूक विलो वृक्षासारखी कंबर, रेशमी लांब परकर, दोन वेण्या. त्यात सोन्याचे आकडे. पायात मोजे... शेलाटी अंगयष्टी. अंगावरच्या काचोळीत रुप्याची सुरी. धारदार पात्याची. वेळ आलीच तर बेअब्रूपेक्षा आत्मार्पण करणे श्रेष्ठ या संस्काराचा त्यावेळच्या स्त्रियांवर प्रभाव. म्हणून प्रत्येक महिला आपल्या वस्त्रात अशी सुरी ठेवत असे... झोक्यावर बसून चुन ह्यांग उंच उंच झोके घेऊ लागते. ढगावर बसून आकाशातली परीच खाली उतरते आहे असे बघणाऱ्याला जाणवावे असे ते दृश्य... उंच झोक्यावरून खाली येताना मध्येच तिला चक्कर आल्यासारखे वाटते. ती ओरडते, ''दाना, माझा झोका जरा धर.'' तर तिचे केसातले पाचूचे आकडे खाली दगडावर आपटतात.

इदोऱ्यंग विद्युल्लतेप्रमाणे चमकणाऱ्या चुन ह्यांगला बघतो आणि देहभान हरपतो. ''कोण रे ही परी?'' तो आपल्या सेवकाला विचारतो.



''ही परी नाहीय. वल्मे गणिकेची मुलगी आहे चुन ह्यांग... आपल्या आईप्रमाणे आपण गणिका होणार नाही म्हणते. उत्कृष्ट सुलेखन करते. जाड पाकळ्यांच्या फुलांवर व पानांवर अक्षरं रेखाटते. ती खूप बुद्धिमान आहे.''

**''माझं स्वतःचं कुळ काही तुमच्यासारखं उच्च नाही. मंत्री वा अधिकारी यांच्याशी लग्न करायला माझी मुलगी लायक ठरणारही नाही... अशा परिस्थितीत तुम्ही तिचा हात मागताय यावर विश्वास कसा ठेवायचा? इतक्या सहजपणे वचन देऊन बसू नका... शांतपणे विचार करा... ''**

बांग जा तिच्याकडे जाऊन म्हणतो, ''चुन ह्यांग... हा इदोऱ्यंग– सात्तोचा मुलगा– तुला बघून पागल झालाय... त्याला जरा भेट ना!''

''तू त्याला माझ्याबद्दल काहीतरी भलतंसलतं सांगितलं असणार... मी काही येणार नाही.''

शेवटी बांग जा म्हणतो, ''इदोऱ्यंग कवी आहे. तुझ्या कविता त्याला बघायच्या आहेत.'' तेव्हा ती त्याला भेटायला राजी होते.

कमळासारखी झुलत झुलत संथ गतीने चुन ह्यांग येते तेव्हा इदोऱ्यंगला ती स्वर्गलोकातली अप्सराच वाटते... आणि त्याच्याकडे बघून तिला वाटते, ''खरा पुरुष वाटतो हा! मर्दानी. स्वर्गीय नायक... देशभक्त होऊन देशाची सेवा करणार हा!''

पण ती म्हणते, ''मोहात पडून उपयोग नाही. तुमचे उच्च कुळ. मी हीन कुळातली. तुम्ही जर माझा त्याग केलात तर काय होईल माझे? अंधाऱ्या खोलीत कोंडून घेऊन जन्मभर अश्रू गाळत बसावे लागेल मला... मला मोहात पाडू नका.''

इदोऱ्यंग म्हणतो, ''मी जन्मभर तुझ्याशी एकनिष्ठ राहीन... हे माझं वचन. काळ्या दगडावरची रेघ.''

त्या दिवशी इदोऱ्यंग तिच्या घरी जातो. तिच्या आईला भेटतो.

ती आपली सगळी कहाणी सांगून म्हणते, ''माझं स्वतःचं कुळ काही तुमच्यासारखं उच्च नाही. मंत्री वा अधिकारी यांच्याशी लग्न करायला माझी मुलगी लायक ठरणारही नाही... अशा परिस्थितीत तुम्ही तिचा हात मागताय यावर विश्वास कसा ठेवायचा? इतक्या सहजपणे वचन देऊन बसू नका... शांतपणे विचार करा... आता आलाच आहात तर घटकाभर बसा. चहापाणी घ्या. मग काय ते ठरवा.''

तरीही इदोऱ्यंग आपला निर्धार प्रकट करतो... ''मी शंभर वर्षे निष्ठेनं रहायचं वचन देतो... ती जन्मभर माझी पहिली प्रेयसी आणि पहिली पत्नी

**चाहजू म्हणजे प्लमच्या मूळापासून बनवलेले मद्य. सालिम छसा- पाईन वृक्षाच्या पानापासून बनवलेले मद्य. दवबिंदू मिसळून बनवलेले चाहाजू मद्य. औषधी वनस्पतींच्या मिश्रणाने बनवलेले बटाट्याचे मद्य.**

राहील. माझ्या आईवडिलांची तुम्ही अजिबात काळजी करू नका. मी कधीही तुमच्या मुलीला दुखावणार नाही.''

वल्मे त्याच्या आतिथ्यासाठी उंची मद्ये आणि अनेक पदार्थ पुढे करते. (उदा. वाफवलेला कारी मासा, वाफवलेले कबाब, वाफाळलेले ताजे ट्राउट मासे, पातळ सूप, उल्सानमधले शंख, तिरके काट केलेले मांसाचे तुकडे, गाईची तळून ठेवलेली आतडी, सात जक म्हणजे मांस, भाज्या, मश्रुम यांचे शीक कबाब, भाजलेला क्वंग पक्षी, थंड नूडल्स, भाजलेले चेस्टनट, अक्रोड, आंबट संत्री, वाळलेली बोरे...

चाहजू म्हणजे प्लमच्या मूळापासून बनवलेले मद्य.

सालिम छसा- पाईन वृक्षाच्या पानापासून बनवलेले मद्य.

दवबिंदू मिसळून बनवलेले चाहाजू मद्य.

औषधी वनस्पतींच्या मिश्रणाने बनवलेले बटाट्याचे मद्य.

छन् इल् जू म्हणजे हजार दिवस मुरवलेले मद्य.

कुमलोज म्हणजे बावनकशी सोन्याचे कण मिसळलेले मद्य.

ह्याजू म्हणजे अग्नीसारखे दाहक मद्य.

फाळ् फाळ् म्हणजे आगीसारखे जाळत जाणारे मद्य.

याक जू म्हणजे गुणकारी औषधी मद्य. कमळाच्या पानापासून बनवलेले मद्य.

जेवणाचा असा उत्तम थाट जुळून येतो.

रात्री इदोऱ्यंगचा मुक्काम वल्मेच्याच अतिथिगृहात होतो. आणि चुन ह्यांगही त्याला सोबत देते.

अशी रसाळ व चविष्ट झोप इदोऱ्यंगला प्रथमच अनुभवायला मिळते.

...अशा प्रणयधुंदीत काही दिवस जातात.

तेवढ्यात वडिलांचा निरोप येतो. वडिलांची बदली सहाय्यक कमिशनर म्हणून सकलच्या पूर्वभागात झालेली असते. तेव्हा इदोऱ्यंगने लगेच घरी यावे असे कळवले होते... चुन ह्यांगच्या सहवासाला आता पारखे व्हावे लागणार या विचाराने इदोऱ्यंगची घालमेल होते.

वल्मे त्याला म्हणते, ''चुन ह्यांगला बरोबर घेऊन जा.''

तो म्हणतो, ''मी तिला डोलीत बसवून सन्मानानं नेईन... पण नंतर. आज



तिला नेलं तर माझी नाचक्की होईल. लग्नाआधी बाई ठेवली म्हणून माझ्या बापाचं नाव बद्दू होईल. माझं आयुष्यही बरबाद होईल. हवी तशी अधिकाराची नोकरीही मग मिळणार नाही...''

ती खूप त्रागा करते... पण शेवटी इदोऱ्यंग एकटाच जातो.

दीड-दोन वर्षांनी त्या भागात नवीन सात्तोसाहेब येतात आणि आल्याबरोबर तेथील सर्व गणिकांना पाचारण करतात. सात्तोसाहेब म्हणजे त्या त्या जिल्ह्याचे अनभिषिक्त राजेच! त्यांच्या सेवेसाठी तर सर्वांचा जन्म. त्यांची मर्जी राखण्यासाठी साऱ्यांची धडपड.

**दुराग्रही, सनातनी सात्तो संतप्त असतो. ''नव्या सात्तोचं स्वागत करणं हे गणिकेचे कर्तव्यच! पूर्वापार चालत आलेली ही प्रथा आहे. तू ऐकत नाहीस. तर तुला राजद्रोहाबद्दल शिक्षा हवीच.''**

हे नवे सात्तोसाहेब चुन ह्यांग का आली नाही असे विचारतात.

''साहेब, ती गणिका नाही. तिची आई गणिका होती... चुन ह्यांग ही इदोऱ्यंगशी वचनबद्ध आहे... आपण अशा वाग्दत्त वधूला बोलावून घेणे सात्तोंना शोभणार नाही,'' असे त्याला सहाय्यक अधिकारी सांगतो.

पण हा सात्तो इरेलाच पेटलेला असतो. चुन ह्यांगला बोलावून तिला तो वश करू पाहतो. ती ऐकत नाही तेव्हा तिला फटके मारण्याची शिक्षा सुनावतो.

''खरी पतिव्रता दोन नवऱ्यांची बायको नाही होऊ शकत... मी हवे तर प्राण देईन... तुम्ही माझ्या मागे लागू नका.'' असे ती बजावू पाहते... पण दुराग्रही, सनातनी सात्तो संतप्त असतो. ''नव्या सात्तोचं स्वागत करणं हे गणिकेचे कर्तव्यच! पूर्वापार चालत आलेली ही प्रथा आहे. तू ऐकत नाहीस. तर तुला राजद्रोहाबद्दल शिक्षा हवीच.''

तिला काठीने मारण्याचा आदेश तो दंडाधिकाऱ्याला देतो. सगळा गाव गोळा होतो.

शिक्षेची अंमलबजावणी सुरू होते.

पहिलाच फटका इतक्या जोरात मारला जातो की काठीचे दोन तुकडे होतात. चुन ह्यांग हूं की चूं करीत नाही. एकाग्र मन– अभंग मन म्हणजेच पातिव्रत्य, असे म्हणत वेदना सोसते.

दुसरी काठी बसते. पण ती अढळच. काठ्या खात मी मेले तरी चालेल पण इदोऱ्यंगला विसरणार नाही.

तिसरी काठी... कितीही वेळा मारा... मी मरण पत्करीन.

चौथी काठी... सात्तोसाहेब... कितीही हालहाल करा तुम्ही माझे. मी मरणाला

**सहावी काठी... ''सहा हजार वेळा मी मेले तरी माझं प्रेम अभंगच राहील. गाठीगाठींनी बांधलेलं आणि सहा हजार गाठी असलेलं माझं प्रेम तिळभरसुद्धा कमी होणार नाही.''**

सामोरी जाईन–''

पाचवी काठी... ''नियतीनंच बांधलेल्या गाठी... स्वप्नातही विसर पडणार नाही.''

सहावी काठी... ''सहा हजार वेळा मी मेले तरी माझं प्रेम अभंगच राहील. गाठीगाठींनी बांधलेलं आणि सहा हजार गाठी असलेलं माझं प्रेम तिळभरसुद्धा कमी होणार नाही.''

सातवी काठी... ''मारून टाका मला. मागं काहीतरी पाप घडलेलं असणार... नाहीतर ही सातवी काठी बसलीच नसती... चांगली सात फुटी तलवार घेऊन सात तुकडे करून टाका माझे...''

आठवी काठी... बघा. माझे नशीब! हा सात्तो आला माझ्या वाट्याला! प्रजेच्या कल्याणाऐवजी अन्याय करणारा...

नववी काठी... ''माझ्या आतड्याची नऊ वेटोळी, त्यात नऊ दऱ्या आणि नऊ वळणं... नऊ वर्षं सतत वाहणाऱ्या माझ्या डोळ्यातलं पाणी त्यात मिसळून त्याचं खत बनेल आणि इदोऱ्यंगची भरभराट होईल.''

दहावी काठी... ''मला कितीही मारा. मी तुम्हाला वश होणार नाही. मेल्यावर भूत होईन... निरपराध चुन ह्यांगला मारता आहात तुम्ही–''

पंचविसावी काठी... ''हे फटके माझ्या मनाच्या सतारीवर आदळताहेत. त्यातून उमटत आहेत तीव्र सूर. ते ऐकून जवळ आलेल्या किरगी पक्ष्या. अरे, माझ्या प्रियकराला जाऊन सांग माझी काय अवस्था झालीय ते!''

सत्तोसाहेबांवर सर्व नागरिक खवळतात. हा अमानुष छळ बस करा म्हणतात.

''या चांडाळणीबरोबर काही बोलणंच शक्य नाही... तिला टाका तुरुंगात. कोलदांडा घाला तिच्या गळ्यात.'' असे म्हणून सात्तोसाहेब आपला आब राखतात.

...तुरुंगाबाहेरही प्रचंड गर्दी होते.

''माझ्या प्रियकराची परीक्षा होईल– मग तो सात्तोसारखा अधिकारी होईल... आणि मला सोडवील...'' चुन ह्यांगला अनेक पतिव्रता स्त्रियांचे स्मरण होते.

...पुढे अर्थातच इदोऱ्यंग तोकऱ्यंग तीम ही उच्च परीक्षा उत्तीर्ण होतो... देशातला सर्वात मोठा विद्वान म्हणून त्याची गुप्तहेर यंत्रणेच्या प्रमुखपदी राजाकडून नेमणूक होते. वेषांतर करून देशभर हिंडून विविध अधिकाऱ्यांची माहिती मिळवणे, भ्रष्टाचार शोधून काढणे हे काम त्याजकडे येते.



त्यानुसार वेषांतर करून तो सर्वत्र संचार करू लागतो...

...चुन ह्यांगच्या नामवात गावी आल्यावर त्या सात्तोने तिचा जो छळ केला त्याची माहिति मिळते. त्याचवेळी चुन ह्यांगने इदोऱ्यंगला एक पत्र लिहून ते त्याच्याकडे सकलला पोहोचवण्यासाठी एका मुलाकडे दिलेले असते. ते पत्र त्या मुलाकडून त्याला वाचायला मिळते; आणि तुरुंगात खितपत पडलेल्या आपल्या प्रेयसीच्या दारुण अवस्थेची त्याला कल्पना येते.

ते पत्र वाचून इदोऱ्यंगच्या डोळ्यात पाणी येते.

तेथील सात्तोचे पितळ तो उघडे करतो आणि सात्तोला पदच्युत करतो आणि तुरुंगातून चुन ह्यांग तसेच इतर निरपराध कैद्यांची सुटका करण्याचा आदेश देतो... तेथील भ्रष्टाचार निपटून काढतो.

तेथील राजा इदोऱ्यंगचा आपल्या मुख्य सोळा मंत्र्यांमध्ये समावेश करतो. चुन ह्यांग बरोबर त्याचे लग्नही लावून देतो. राज्यातला तिसऱ्या क्रमांकाचा नागरिक म्हणून त्याचा सन्मान केला जातो.

...अशी ही प्रेमकथा. कोरियातील लोककथांमधून अग्रस्थानी मिरवणारी. काव्यात्म. हळुवार आणि ध्येयप्रवण.

माधवी कोल्हटकर यांनी मूळ कोरियन उच्चार मराठीत आणण्याचा प्रयत्न केला आहे. बरेच कोरियन शब्द व म्हणी यांचाही वापर केला आहे. त्यामुळे पुस्तक वाचताना कधी कधी चुकचुकल्यासारखे होते हे खरे आहे, पण कोरियन भाषेची ही जी थोडी चुणूक दिसते ती सरावाने आपलीशी वाटत जाते. आणि नंतर त्यातली मजा अनुभवता येते. कोरियातील रीतिरिवाज, समाजजीवन, श्रद्धा व समज यावरील टीपा दिलेल्या आहेत. मजकुरातही कधीकधी स्पष्टीकरणे दिली आहेत. हा एक आंतर-सांस्कृतिक आकलन प्रकल्प आहे असे त्यामुळे जाणवते; आणि त्याचे मोल अधिक वाढते. अनुवाद करताना तो यथामूल व्हावा म्हणून घेतलेली दक्षता पानोपानी जाणवते. कोरियन समाजजीवनाची आणि मूल्यविवेकाचीही त्याद्वारे ओळख व्हावी अशी ओढ दिसून येते.

**कोरियातील रीतिरिवाज, समाजजीवन, श्रद्धा व समज यावरील टीपा दिलेल्या आहेत. मजकुरातही कधीकधी स्पष्टीकरणे दिली आहेत. हा एक आंतर-सांस्कृतिक आकलन प्रकल्प आहे**

**पृष्ठे : १२८● किंमत : १२०रु. ● सभासदांना : ९० रु. ● पोस्टेज:२०रु.**

## कुमार केतकरांच्या परखड शैलीतील लेख-अग्रलेखांचे साक्षेपी संकलन




**शिलंगणाचं सोनं**
किंमत २५०रु.




**मोनालिसाचे स्मित**
किंमत १२०रु.

प्रत्येकी पोस्टेज २०रु.




**ओसरलेले वादळ**
किंमत १८०रु.


### ● नवीन आवृत्त्या ●

| | | |
|---|---|---|
| ◆ कमोदिनी | रणजित देसाई | १००रु. |
| ◆ संकेत | रणजित देसाई | ८०रु. |
| ◆ मी माणूस शोधतोय | व. पु. काळे | १००रु. |
| ◆ वन फॉर द रोड | व. पु. काळे | १००रु. |
| ◆ तू भ्रमत आहासी वाया | व. पु. काळे | ७०रु. |
| ◆ रुचिरा- भाग १ | कमलाबाई ओगले | १२०रु. |
| ◆ जळालेला मोहोर | वि. स. खांडेकर | १२०रु. |
| ◆ या सुखांनो | सुरेश नाईक | १७०रु. |
| ◆ निर्मनुष्य | रत्नाकर मतकरी | १००रु. |
| ◆ वादळमाथा | राम प्रधान | २००रु. |

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**



# चला जाणून घेऊ या!
# हस्तसामुद्रिक




**आपला तळवा म्हणजे सर्व क्षमतांचा जिवंत नकाशाच याची जाणीव करून देणारे प्रभावी विश्लेषण**

**विजयकुमार  अनु. वृषाली पटवर्धन**

हस्तरेषांद्वारे भविष्यकथन आणि स्वभावदर्शन होऊ शकते; तेव्हा जाणकाराला हात दाखवून भविष्य जाणून घेण्याचे आकर्षण बहुतेक सर्वांनाच वाटते. आपल्या गुणसूत्राप्रमाणे आपली जडणघडण होते आणि त्या गुणसूत्रांप्रमाणेच हातावरच्या रेषाही आपल्या व्यक्तिमत्त्वाचे आणि आपल्या अस्तित्वाचे सगळे रहस्य सामावून घेऊन जाणकारापुढे सारे काही उघड करायला जणू तयार असतात. हस्तरेषाशास्त्र हे एकेकाळी अत्यंत विकसित असे शास्त्र असावे; त्यावरचे संस्कृत ग्रंथही काही कमी नाहीत. पुढे युरोपियन अभ्यासकांनी आपलेही ग्रंथ सिद्ध केले आणि सध्या आपण त्यावर जास्त भर देत असतो.

हस्तसामुद्रिक या छोट्या पुस्तिकेवरून आपण वेळोवेळी वाचलेल्या हस्तरेषांच्या अन्वयार्थाची उजळणी होऊन जाईल आणि नव्या आत्मविश्वासाने कोणाचाही हात बघून त्याच्या भविष्याचा व स्वभावाचा थोडाफार उलगडा करून घेता येईल. कोणावरही आपला प्रभाव पाडायचा असेल तर 'मला हस्तरेषाशास्त्रातले थोडेफार कळते' असा इशारा करा; आपल्यापुढे अनेकांचे हात आलेच असे समजा.

तळहाताकडे बघताना आधी त्याचे सर्वसाधारण स्वरूप न्याहाळून त्याचे वर्गीकरण करायचा सराव करा.

१. हाताचा प्रकार– चौकोनी, सपाट, निमुळता, लांबसडक पण निमुळता, लहान आणि सडपातळ हात, सर्वसामान्य हात असे मुख्य प्रकार पडतात.

हाताच्या आकारावरून काही स्वभावविशेष कळतात. **चौकोनी हात** असेल तर ती व्यक्ती वकील, डॉक्टर इ. व्यावसायिक, उच्चपदस्थ असते. दूरदर्शी, शिस्तप्रिय, परंपराप्रिय, विश्वासार्ह वास्तववादी असते. सपाट, मऊसर हात आणि मोठा अंगठा असेल तर ती व्यक्ती हस्तकौशल्याचे काम करणारी, संशोधक,

**बोटांच्या खालचा मांसल फुगीर भाग म्हणजे उंचवटा. उंचवट्यावरूनही अनेक अंदाज बांधले जातात. फुगीर उंचवटा बलस्थान दाखवतो. पण प्रमाणाबाहेर उंच असेल तर विरोधी गुण दाखवतो. उंचवट्यावर त्रिकोण, वर्तुळ व उभी रेष ही अनुकूल तर आडवी रेघ, जाळी ही उणीव व त्रुटी दाखवते.**

नाविक, वैमानिक असते; कल्पक, चंचल, उतावीळ, उत्साही, शूर, दीर्घोद्योगी असते. **लांबसडक पण निमुळता हात** असेल तर तो हात तत्त्वज्ञानी, कवी, लेखक, धर्मोपदेशक, संत-फकिराचा असल्याचे आढळते. परोपकारी, भूतदयावादी, दैवीशक्ती, चैतन्यशील, अस्वस्थ, बारीकसारीक तपशीलावर लक्ष, विश्लेषक, हिशेबी अशा गुणांचा निर्देश करतो. **गोपुच्छकार निमुळता हात** हा चित्रकार, शिल्पकार, संगीतकार, न्यायाधीश, जनसंपर्क अधिकारी अशा व्यक्तींचा असतो. ही व्यक्ती उत्साही पण शीघ्रकोपी, विषयासक्त, वलयांकित, संवादकुशल, सहज मित्र मिळवणारी, पैसा व प्रसिद्धी यांच्या मागे धावणारी पण कमी दूरदर्शी असते. **लहान व सडपातळ हात** हा गूढ ज्ञानी व्यक्तीचा दैवी हात मानला जातो. स्वप्रदर्शी स्वभाव, गूढ ज्ञानात रस, शिस्त, तर्कप्रवण, असुरक्षित अशा विशेषांकडे तो लक्ष वेधतो.

२. बोटांचेही आकार वेगवेगळे असतात. टोकदार, निमुळती, चौकोनी, सपाट, सरळ आणि गाठी असणारे– असे हे आकार वेगवेगळे वृत्तिविशेष घेऊन येतात. टोकदार बोटे असणाऱ्या व्यक्ती सावध, बुद्धिमान, परिवर्तनशील, सौंदर्यदृष्टी व कल्पनाशक्ती असणाऱ्या, उत्स्फूर्त कल्पना आणि वास्तव यांच्या द्वंद्वात व्यग्र असतात. निमुळती बोटे असणाऱ्या व्यक्ती सौंदर्याकडे ओढल्या जातात. उत्तम पोशाख करतात, स्वत:बद्दल दृढ विश्वास बाळगणाऱ्या पण भावनाप्रधान आणि भोळसट असतात. चौकोनी बोटे असणाऱ्या व्यक्ती शिस्तप्रिय, कर्तव्यदक्ष, आर्थिकदृष्ट्या मालदार, परंपराप्रिय, व्यवहारी, साहसी, व्यवसायनिपुण, बहुपेडी व्यक्तिमत्त्वाच्या असतात. सरळ बोटे ही सरळमार्गी, मेहनती, भावुक, शब्द व कृती यात मेळ राखणाऱ्या, उत्साही व्यक्तिमत्त्वाची निदर्शक असतात, तर गाठी असणारी बोटे त्या व्यक्तीच्या इच्छाशक्तीत आणि बुद्धीत विसंवाद असल्याचे सूचित करतात. अशा व्यक्तीमध्ये उत्स्फूर्तपणा नसतो. प्रत्येक कृती हिशेबी असते.

**लांबसडक बोटे–** भावनाप्रधान, आत्मकेंद्रित, खाण्यापिण्यात चोखंदळपणा याची निदर्शक असतात. **जाड बोटे–** ती व्यक्ती विश्वासार्ह आणि भौतिकवादी असल्याचे सूचित करतात. गुळगुळीत, मऊ बोटे असणारी व्यक्ती



भावनाप्रधान,उतावीळ, भावुक असते. **लवचिक बोटांची व्यक्ती** शंकाखोर, संभाषण-चतुर, आनंदी, सुखी, रहस्यवादी असते. **बारीक बोटे** असणाऱ्याचा स्वभाव डावपेचखोर, सावध, दयाळू, संशयग्रस्त असा असतो.

**भाग्यरेषा अस्पष्ट असेल तर ती व्यक्ती स्वकर्तृत्वावर पुढे येणारी, कष्टाळू असते. सुरुवातीला तिच्यावर फाटा असेल तर तिचे बालपण दु:खकारक असते. ही रेषा ठळक नसेल तर यश त्या व्यक्तीला हुलकावणी देते. नागमोडी भाग्यरेषा असेल तर ती व्यक्ती गलथान, मुळमुळीत असते.**

लांब, आखूड, रुंद, चौकोनी, अरुंद व गोलाकार असे नखांचे प्रकार आढळतात. त्यावरूनही त्या व्यक्तीबद्दल आडाखे बांधता येतात. आखूड, चौकोनी, निळसर नखे असणाऱ्याला हृदयाशी संबंधित तक्रारी भेडसावतात. आखूड त्रिकोणाकृती नखे अर्धांगवायूची प्रवृत्ती दाखवतात. अरुंद मऊ बोटे अशक्त पचनसंस्था दाखवतात. बारीक, लांब, अर्धगोलाकार व्यक्ती प्रक्षोभक, हिंसक, बुजरी, भेकड असल्याचे आढळते.

बोटांच्या खालचा मांसल फुगीर भाग म्हणजे उंचवटा. उंचवट्यावरूनही अनेक अंदाज बांधले जातात. फुगीर उंचवटा बलस्थान दाखवतो. पण प्रमाणाबाहेर उंच असेल तर विरोधी गुण दाखवतो. उंचवट्यावर त्रिकोण, वर्तुळ व उभी रेष ही अनुकूल तर आडवी रेघ, जाळी ही उणीव व त्रुटी दाखवते. गुरू, शनी, रवी, बुध, चंद्र, शुक्र, मंगळ यांचे उंचवटे हे वेगवेगळी फळे देतात.

प्रत्यक्ष तळहातावरच्या रेषांवरूनही आपल्या स्वभावावर, आरोग्यावर आणि आकांक्षांवर बराच प्रकाश पडतो असे सांगितले जाते. या रेषांना नावे देतानाही ती याकडे लक्ष केंद्रित करतात. **जीवनरेषा, हृदयरेषा, मस्तकरेषा, भाग्यरेषा,** भावजीवन, आपली बौद्धिक क्षमता आणि आपले भाग्य यांच्याशी या रेषा निगडित आहेत हे आवर्जून, नि:संदिग्धपणे आपल्याला सांगतात. याशिवाय **विवाहरेषा, प्रवासरेषा, अंत:प्रेरणा रेषा,** यांचेही मानवाला मोठे अप्रूप वाटते. मंगळ, चंद्र, रवी, बुध वगैरे रेषा त्या त्या ग्रहाच्या अनुषंगाने आपला प्रभाव दाखवतात.

जीवनरेषा अजिबात दिसत नसेल तर ती व्यक्ती ऐदी, आळशी, फसवी असते. जीवनरेषा पुसट असेल तर व्यक्ती नीरस, कंटाळवाणे, एकसुरी जीवन जगणारी असते. जीवनरेषेला सुरुवातीला फाटे फुटलेले असतील तर ती व्यक्ती प्रामाणिक, निष्ठावंत व विश्वासार्ह असते. शेवटी फाटे फुटलेले असतील तर अशा व्यक्तीची तब्येत नाजूक असते. ती निरुत्साही असते हे लक्षात येते. वरच्या बाजूला फाटे असतील तर ती व्यक्ती नशीबवान, श्रीमंत असते. ही रेषा

*** विवाहरेषेवर बेट असेल तर विवाह हा दु:खकारक ठरतो.**
*** हृदयरेषेवर बेट असेल तर वैवाहिक जीवन उद्ध्वस्त करणारे प्रेमप्रकरण.**
*** शुक्राच्या उंचवट्यावर बेट असेल तर व्यभिचारामुळे वैवाहिक जीवन उद्ध्वस्त.**

दुहेरी असेल तर लैंगिक भावनेचा अतिरेक आणि विरुद्ध लिंगी प्रभाव दाखवते. चंद्राच्या उंचवट्यावरून बाहेरून जाऊन वळणारी जीवनरेषा विषयोपभोगाचा आनंद लुटण्याची प्रवृत्ती दाखवते.

हृदयरेषा, पुसट असणारी व्यक्ती भावनाशून्य असते. तर्कशुद्ध वागणारी असते. आखूड रेषा आत्मकेंद्रित, आत्मप्रेमाची निदर्शक असते. सरळ व खोल हृदयरेषा गुन्हेगारी प्रवृत्ती दाखवते. नागमोडी हृदयरेषा दुष्टपणा, अविवेकीपणा, अस्थिरता दाखवते. **हृदयरेषा ही जर मस्तकरेषा आणि जीवनरेषा यांना स्पर्श करीत असेल तर प्रेमात विश्वासघात होणार हे लक्षात येते.**

भाग्यरेषा अस्पष्ट दिसत असेल तर ती व्यक्ती स्वकर्तृत्वावर पुढे येणारी, कष्टाळू असते. सुरुवातीला तिच्यावर फाटा असेल तर तिचे बालपण दु:खकारक असते. ही रेषा ठळक नसेल तर यश त्या व्यक्तीला हुलकावणी देते. नागमोडी भाग्यरेषा असेल तर ती व्यक्ती गलथान, गुळमुळीत असते. ही रेषा खूपच ठळक असेल तर पारंपरिक व्यवसाय आणि विनासायास यश याची निदर्शक ठरते. भाग्यरेषेला फांद्या वर फुटणाऱ्या असतील तर भरभराट, खाली झुकणाऱ्या नुकसान दाखवतात.

याशिवाय हातावर चांदणी, तीळ, फुली, त्रिकोण, चौकोन, वर्तुळ, बेट, त्रिशूळ, वगैरे अनेक चिन्हे असतात. त्यावरूनही अनेक आडाखे सांगता येतात.

उदाहरणार्थ,

* बुधाच्या उंचवट्यावर चांदणी असेल तर ती व्यक्ती अप्रामाणिक, बेइमानी असते.

* चंद्राच्या उंचवट्यावर चांदणी असेल तर ती व्यक्ती बुडून मरण्याचा धोका असतो.

* शुक्राच्या उंचवट्यावर चांदणी असेल तर प्रिय व्यक्तीचा मृत्यू संभवतो.

* मस्तकरेषेवर चांदणी असेल तर डोक्याला दुखापत होण्याची शक्यता.

* गुरूच्या उंचवट्यावर चांदणी असेल तर सामाजिक प्रतिष्ठा, मानसन्मान.

* गुरूच्या उंचवट्यावर फुलीसह चांदणी असेल तर बुद्धिमान जोडीदार मिळणार.



* शनीच्या उंचवट्यावर चांदणी असेल तर पक्षाघाताची शक्यता.

* भाग्यरेषेवर चांदणी असेल तर विमनस्कता.

* विवाहरेषेवर चांदणी असेल तर भ्रष्टाचार.

* मणिबंधावर चांदणी असेल तर अगणित संपत्तीचा लाभ.

* बुधरेषेच्या टोकाशी चांदणी असेल तर प्रतिष्ठेचा ऱ्हास आणि आजारपण.

**प्रत्येक चिन्हाचे विशिष्ट संदेश ते कोठल्या रेषेवर वा उंचवट्यावर आहे यावरून सूचित होत असतात. स्वभाव, आरोग्य, संकटे, सन्मानप्राप्ती अशा अनेक बाबतीत त्याद्वारे मार्गदर्शन मिळू शकते.**

याच प्रकारे प्रत्येक चिन्हाचे विशिष्ट संदेश ते कोठल्या रेषेवर वा उंचवट्यावर आहे यावरून सूचित होत असतात. स्वभाव, आरोग्य, संकटे, सन्मानप्राप्ती अशा अनेक बाबतीत त्याद्वारे मार्गदर्शन मिळू शकते.

* तुटलेल्या विवाहरेषेवर चौकोन असेल तर वैवाहिक जीवनास संरक्षण मिळते.

* विवाहरेषेवर बेट असेल तर विवाह हा दु:खकारक ठरतो.

* हृदयरेषेवर बेट असेल तर वैवाहिक जीवन उद्ध्वस्त करणारे प्रेमप्रकरण.

* शुक्राच्या उंचवट्यावर बेट असेल तर व्यभिचारामुळे वैवाहिक जीवन उद्ध्वस्त.

* हृदयरेषेवर परस्परांना छेदणाऱ्या रेषांत तुटकपणा असेल तर घटस्फोटानंतर पुनर्विवाहाचा योग.

* विवाहरेषेचा शेवट फाटा असलेल्या रेषेत होत असेल तर भावनाशून्य विवाह.

आपल्या हातावरच्या रेषा, चिन्हे, उंचवटे यांचे निरीक्षण करून स्वत:बद्दलही आपण बरेच काही निष्कर्ष काढू शकतो.

आकाराने छोट्या असलेल्या या पुस्तिकेत शेकडो बारीकसारीक पण महत्त्वाची निरीक्षणे सूत्ररूपात नोंदवलेली आहेत. हस्तसामुद्रिकशास्त्राचे प्राथमिक ज्ञान होण्यासाठी आणि असलेले ज्ञान अधिक काटेकोर करण्यासाठी या पुस्तिकेचा वापर करणे लाभदायक ठरेल.

**पृष्ठे : १०४ ● किंमत : ३०रु. ● सभासदांना : २२ रु. ● पोस्टेज:२०रु.**

# योगसाधनेतील यम-नियमांचे महत्त्व

**डॉ. सुभाष दांडेकर**

योगासने करून शरीर सुस्थितीत ठेवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढते आहे ही फार चांगली गोष्ट आहे. योगासनांमुळे रोग दूर राहतात आणि असलेले रोग बरे होतात हे लोकांना पटू लागले आहे याचे फार मोठे श्रेय श्री. रामदेव महाराजांकडे जाते. टी. व्ही. च्या आस्था वाहिनीवर त्यांचा कार्यक्रम पाहून त्याप्रमाणे अगर त्यांच्या सीडी पाहून आसने करणारे खूप आहेत. याचा योग्य लाभ आसने व प्राणायाम करणाऱ्यांच्या शरीराला नक्कीच मिळतो.

आसने व प्राणायाम करतांना आचार्य पतंजलींनी काही संकल्प सांगितलेले आहेत. श्री रामदेव महाराज त्यांच्या कार्यक्रमांत हे संकल्प सांगत असतात. परंतु योगा करणारे त्यातील शारीरिक कसरतींवरच भर देताना दिसतात. योगाचे क्लासेस घेणारे प्राणायाम व योगासने करताना त्यातील या मनाच्या सहभागावर लक्ष केंद्रित करताना दिसत नाहीत.

**योगसाधकाने पाळावयाचे यम-नियम -**

हा योगसाधनेतील अत्यंत महत्त्वाचा भाग 'योगा' करणारे (योगसाधना नव्हे बर का!) दुर्लक्षीत ठेवतात. मन आणि शरीर दोन्ही सुदृढ करणे आणि त्याद्वारे मोक्षाप्रत जाणे हे योगसाधनेचे उद्दिष्ट आहे. यम-नियम न पाळता योगासने करणे आणि एखाद्या हेल्थ क्लबमध्ये जाऊन व्यायाम करणे हे माझ्या मते सारखेच आहे. ज्यांना ध्यान-धारणा-समाधी या अध्यात्मिक प्रगतीमध्ये रस नाही त्यांनी किमान यम पाळावयाचा प्रयत्न केला तरी त्यांचे वैयक्तिक जीवन शांत, आनंदमय होईलच पण एक सुसंस्कृत, सुदृढ समाज निर्माण होण्यास निश्चित सुरुवात होईल.

योगासने करणाऱ्यांनी तर यम-नियम पाळावेतच पण वृद्धत्वामुळे किंवा अपंगत्वामुळे जे योगासने करू शकत नाहीत त्यांनी सुद्धा यम-नियम जरुर पाळावेत.

हे यम-नियम आहेत तरी काय?

यम ही व्यक्तिगत जीवनात पाळावयाची पथ्ये आहेत. ज्यांचा थेट परिणाम व्यक्ती व समाज या दोन्हींवर होतो.

**१. अहिंसा -**

हिंसा न करणे.

यामध्ये दुसऱ्यास दुखापत न करणे किंवा जीव न घेणे एवढेच अभिप्रेत नाही तर आपल्या कृतीने किंवा उक्तीने दुसऱ्याचे मन न दुखावणे असा व्यापक अर्थ आहे. गंमत म्हणून कुत्र्याला दगड मारणे किंवा वेड्या माणसाला वेडावून दाखवणे हे निंदनीय तर आहेच पण एखाद्याशी झालेला मतभेद अपशब्द वापरून, किंचाळून व्यक्त करणे, त्या व्यक्तीला त्रास होईल असे काही डावपेच लढवणे ही हिंसाच होय. महात्मा गांधीजींचे अनेकांशी मतभेद होते व ते मतभेद शांतपणे मांडले जात. महात्मा गांधीजींनी कधी आरडा-ओरडा, शिविगाळ केल्याचे किंवा ज्याच्याशी मतभेद आहेत त्याचे अन्य रित्या खच्चीकरण केल्याचे कधी आपण ऐकले आहे का?

**२. सत्य -**

कोणत्याही बाबतीत सत्य हे एकच असते. खोटे बोलू नये याला साधे कारण हे की असत्य झाकण्यासाठी आणखी दहा असत्ये सांगावी लागतातच पण आपण काय खोटे बोललो हे सतत लक्षात ठेवावे लागते. सत्य एकच असल्याने ते लक्षात ठेवावे लागत नाही. काही भ्रामक कल्पना मांडून आपण काही काळ आनंदात राहू शकतो

**३. अस्तेय -**

चोरी करू नये. चोरी ही फक्त चीजवस्तूंची असते असे नाही. विचारांची असू शकते. दुसऱ्याच्या मालकीचे त्याच्या परवानगीशिवाय, मूल्य चुकते केल्याशिवाय घेणे म्हणजे चोरी. निसर्गाने प्रत्येकाला निर्मितीक्षमता दिलेली आहे. वस्तू असो, विचार असो आपण स्वतः निर्माण करू शकतो. चौर्य हा या निर्मितीक्षमतेचा अपमान आहे.

**४. ब्रह्मचर्य -**

अन्न, पाणी, हवा याप्रमाणेच कामसुख ही शरीराची गरज आहे. पण त्याचा अतिरेक नको. ब्रह्मचर्य हे कामसुखापुरतेच अभिप्रेत नसून सर्वच वासनांवर नियंत्रण हवे.

**५. असंग्रह -**

आपल्याला आवडणाऱ्या गोष्टींचा संग्रह करत राहणे हा मनुष्यस्वभाव आहे पण त्याचा अतिरेक काहीजण करतात.

आजची गरज भागवून उद्या काही अडचण आली तर, तरतूद करणे ठीक आहे पण ज्यांच्या घरी करोडो रुपये सापडतात त्या पैशांचा त्यांना काय उपयोग असतो? पैशाने विकत घेता येण्यासारख्या सोयी-सुविधा मिळवल्यावर उरणारा पैसा तुम्हाला त्रासच देणार. हा जादा पैसा नेहमीच अवैध मार्गाने मिळवलेला असतो. त्यामुळे सतत पकडले जाण्याची धास्ती! मग मनःशांती कोठून मिळणार? जादा धान्य, पेट्रोल, सिमेंट साठवून आपण कृत्रिम टंचाईला हातभारच नाही का लावत? कमीतकमी गरजा आणि कमीतकमी संपत्ती असणाऱ्या व्यक्तीचा सदराच सुखी माणसाचा सदरा असू शकतो.

हे यम जर बहुसंख्यांनी पाळले तर कशाला होतील खून, दरोडे, दंगली, लैंगिक अत्याचार, भ्रष्टाचार?

योगासने करणाऱ्यांनी हे यम जरूर पाळावेत. प्राणायाम करताना, श्वास घेताना (पूरक) संकल्प करा. ''या विश्वातील दिव्य उर्जा, पावित्र्य, शांती, आनंद सर्व शुभ माझ्यात भरले जात आहे.'' श्वास सोडताना कल्पना करा की, ''माझ्यातील सर्व शारीरिक रोग, वासना, काम, क्रोध, ईर्षा, द्वेष आदि वाईट भावना मी माझ्यातून बाहेर फेकून देत आहे.''

असे एक महिनाभर करून पहा. तुम्हाला स्वतःला आणि तुमच्या आप्तेष्टांना तुमच्या व्यक्तिमत्वातील बदल निश्चित जाणवेल.


❒


## स्वामी रामदेव महाराज यांची खालील पुस्तके आमच्याकडे उपलब्ध





**औषध दर्शन**

किंमत ३०रु.
पोस्टेज २० रु.




**योगसाधना व योगचिकित्सा रहस्य**

किंमत १२५रु.
पोस्टेज २५रु.




**प्राणायाम रहस्य**

किंमत ५०रु.
पोस्टेज २० रु.

**दिव्य प्रकाशन**


**एकत्रित पोस्टेज ३० रु.**






**भारतीय संस्कृतीचा एक अभिमानास्पद घटक म्हणून योगशास्त्राला महत्त्व आहे. योगासने नियमित व शास्त्रशुद्ध रितीने केल्यास आपले आरोग्य नियमित राहते. शरीर कार्यक्षम राहते. आपला देह आणि आपले मन यामध्ये उत्तम संतुलन राहते.**


**योगसाधनेचे महत्त्व उलगडून सांगणारी ही छोटेखानी पुस्तके आपल्या संग्रही असलीच पाहिजेत.**




**वजन कमी करण्यासाठी योगसाधना**
**अनु. डॉ. सुभाष दांडेकर**
किंमत ५०रु.




**तणावमुक्तीसाठी योगसाधना**
**अनु. डॉ. सुभाष दांडेकर**
किंमत ५०रु.




**आरोग्यासाठी योग**
**अनु. मंगेश कश्यप**
किंमत ८०रु.




**कार्यमग्न, व्यस्त लोकांसाठी योगसाधना**
**अनु. अरुंधती महाम्बरे**
किंमत ५०रु.

## आम्ही वितरित करीत असलेली इतर पुस्तके

| | | |
|---|---|---|
| **माझं चीज कोणी हलवलं? :** | | |
| डॉ. स्पेंसर जॉनसन (मंजुल पब्लिशिंग हाऊस) | अनु. मोहन माडगुळकर | १२५ |
| **प्रश्न हीच उत्तरे आहेत :** | | |
| ॲलन पीझ (मंजुल पब्लिशिंग हाऊस) | अनु. वर्षा कुलकर्णी | ९५ |
| **विचार करा आणि श्रीमंत व्हा :** | | |
| नेपोलियन हिल (मंजुल पब्लिशिंग हाऊस) | अनु. बाळ उर्ध्वरेषे | आवृत्ती संपली |
| **नेटवर्क व्यवसायातून पैसा** (मंजुल पब्लिशिंग हाऊस) | | |
| **मिळवण्याच्या २०१ सोप्या कल्पना** | रिचर्ड टॅन व के.सी.सी. | १५० |
| **हॅरी पॉटर आणि परिस :** | | |
| जे. के. रोलिंग (मंजुल पब्लिशिंग हाऊस) | अनु. बाळ उर्ध्वरेषे | १६५ |
| **पिरॅमिड फेंगशुई आणि वास्तू** | डॉ. धारा भट्ट | २५५ |
| **देवा तूचि गणेशा** (पेंग्विन बुक्स) | रॉयिना ग्रेवाल | १२० |
| **बदलते रंग** (पेंग्विन बुक्स) | संपा. निशिकांत मिरजकर | २०० |
| **स्वर्ग आणि इतर कथा** (पेंग्विन बुक्स) | खुशवंत सिह | १५० |
| **शकुंतला स्मृतीचा खेळ** (पेंग्विन बुक्स) | नमिता गोखले | १७५ |
| **योगसाधना व** | | |
| **योगचिकित्सा रहस्य** (दिव्य प्रकाशन) | स्वामी रामदेव महाराज | १२५ |
| **औषध दर्शन** (दिव्य प्रकाशन) | स्वामी रामदेव महाराज | ३० |
| **प्राणायाम रहस्य** (दिव्य प्रकाशन) | स्वामी रामदेव महाराज | ५० |

## सभासदांना सूचना-

भारतीय टपाल खात्याच्या नवीन अधिनियमानुसार मासिकाचे वितरण करताना पीनकोड सहित संपूर्ण पत्ता टाकणे अनिवार्य झाले आहे. आपला अंक वितरित होण्यासाठी कृपया पीनकोडसह आपला संपूर्ण पत्ता लिहून पोस्टकार्डद्वारे मासिकाच्या पत्त्यावर पाठवावा. हि विनंती.



## साधंसुधं...

## खुणेच्या वस्तू

**प्रमोदिनी वडके-कवळे**

बावीस जानेवारी. दुपारी चारची वेळ. सातवा तास चालू होता. सहावी अ च्या वेळापत्रकात हा पी.टी.चा तास असल्यामुळे सव्वीस जानेवारीच्या संचलनाच्या तयारीसाठी संपूर्ण वर्ग मैदानावर गेलेला होता. पण मुलींच्या बाजूच्या तिसऱ्या बाकावर दोघी मुली एकमेकींना मिठी मारून रडत बसल्या होत्या. त्यातली एक होती वर्षा कुंटे आणि दुसरी मी. वर्षाच्या वडिलांची बदली झाल्यामुळे ती पेणला जाणार होती. आज आमच्या शाळेतला तिचा शेवटचा दिवस होता. म्हणून पोटदुखीचं निमित्त सांगून आम्ही पी.टी.चा तास चुकवून, एकमेकींच्या गळ्यात पडून, पुढच्या त्या विरहाच्या कल्पनेने मनसोक्त रडत होतो. जूनमध्ये वर्षा आमच्या वर्गात आली होती आणि जेमतेम सात महिन्यांत माझी जिवलग मैत्रीण बनून गेली होती. अल्पकाळातल्या या मैत्रीसाठी आम्ही हुंदके, आवंढे, मुसमुसणं रूदनाच्या सगळ्या प्रकारांनी अश्रू गाळत होतो. शेवटी तास संपून वर्गातली मुलं परत यायची वेळ झाली, तेव्हा आम्ही तो अश्रुपात आवरता घेतला. लाल नाकाडोळ्यांनकी एकमेकींना पत्र पाठवण्याची, सुटीत एकमेकींकडे जाण्याची वचनं दिली. मला त्यावेळी पक्ष्यांची रंगीत पिसं जमवण्याचा छंद होता. तो रंगीत खजिना मी माझी आठवण म्हणून वर्षाला दिला आणि तिने तिचे आवडते चापाचे डूल मला आमच्या मैत्रीच्या स्मृतीचिन्हादाखल दिले.

आयुष्याची पुरती ओळखही न झालेलं कोवळं वय, नात्यांमधले ताणबाणे आणि व्यावहारिक बंधनं असले शब्दसुद्धा अजून आमच्या कानावर पडलेले नव्हते. स्वप्न पुरं होण्याची जादू म्हणजेच जीवन असा कोमल हिशोब मनात होता. म्हणूनच त्या चिमुकल्या भेटीचं मोल कधी इतर कशाशी करावंसं वाटलं नाही.

भावनेच्या भरातली ती पत्रभेटीची वचनं थोडे दिवस पाळून गेली आणि नंसतरक साहजिकपणे पुसली गेली. चापाचे डूल घातले की माझ्या कानाची पाळी चिघळायची म्हणून ते डूल फारसे वापरले गेले नाहीत. पण आईच्या सोन्याच्या दागिन्यांच्या डबीत मी ते जपून ठेवले होते. काही दिवसांनी त्यातले एकदोन खडे निखळून पडले तरीही!

लग्नानंतर माहेरी आले की, कधीतरी आईच्या डब्यातून ते डूल काढून हाताळले जायचे. मुलांना आमच्या मैत्रीबद्दल सांगितलं जायचं. पण नंतर प्रापंचिक

गबाळ्यात ते डूल कुठेतरी हरवून गेले. पण मनावर त्या कोमल नात्याच्या नक्षीचा ठसा मात्र अजूनही तितकाच स्पष्ट आहे.

फेब्रुवारी उजाडला आणि गुलाबी थंडी संपून घामाच्या धारा सुरू झाल्या. कॉलेजमधली हवाही बदलली. संमेलनं, सहली, स्पर्धांचा जोश संपून अभ्यासाचा हंगामही सुरू झाला. हॉस्टेलच्या खोलीतल्या दिव्यांना बौद्धिक जागरणं घडायला लागली.

हा अभ्यासाचा किडा अपरिहार्यपणे आमच्याही खोलीत शिरला. कॉलेजची मेस दिवाळीच्या सुटीपासूनच बंद पडली होती. त्यामुळे खोलीखोलीत स्टोव्ह ठेवून चाललेले पाकशास्त्रातले प्रयोग आता थांबले. दूधभात, दहीभात, खिचडी असा सुटसुटीत स्वयंपाक करून उरलेला वेळ अभ्यासासाठी आणि दिवसाचं उरलेलं दूध चहासाठी सत्कारणी लागायचं. रात्रीच्या जागरणासाठी चहा आवश्यकच होता. दरदिवशी एकेकीने चहा करायचं ठरलं तरीही उठून आपापला कप धुवायचं काम उरकायचं. त्याचा मात्र मनापासून कंटाळा यायचा. उष्टे चिकट कप सकाळपर्यंत तसेच लोळायचे. सगळे 'सुस्नात' कप संपले की पाणी प्यायचे पेलेसुद्धा वापरले जायचे.

मध्यंतरी नाताळच्या सुटीत मुंबईला जाऊन आलेल्या नीलिमाने एक कॉफी मग आणला होता. नेहमीच्या कपापेक्षा थोडा मोठा उभट आकाराचा आणि बशीची गरज नसलेला तो मग बऱ्याचजणींनी आयुष्यात प्रथमच पाहिला होता. आणि त्याचं आम्हाला आकर्षणही वाटलं होतं. आता महाडमधल्या एका दुकानात तसे मग आल्याची बातमी कुणीतरी आणली आणि दोनचार दिवसांत हॉस्टेलवर त्या मग्जचा सुळसुळाट झाला.

आम्ही मग आणायला गेलो तेव्हा दुकानात बाहेरून काळपट हिरव्या रंगाचे, आतून मातकट पांढरे असे फक्त सहाच मग उरले होते. एक मग कमी पडला असता. कारण आमच्या खोलीत आम्ही सातजणी रहात होतो. सातजणीत सहा मग वापरायचे ठरवून ते सहा मग आम्ही घेऊन आलो.

काही खूण ठरवायची म्हटलं तर सगळे मग सारखेच! आणि खोलीतल्या सातजणींपैकी मी एकटी हिंदू. बाकीच्या सहाजणी मुस्लीम.

पण आमच्या नात्यात जातिधर्माच्या भिंती कधीच उभ्या राहिल्या नव्हत्या. त्यामुळे सातजणीत सहा मग्जचा निधर्मी वापर सुरू झाला. एकएक करत पुढच्या दोन महिन्यात पाच मग फुटले. उरलेला एक मात्र दीर्घायुषी ठरला.

परीक्षेनंतर होस्टेल सोडताना मी तो दीर्घायुषी मग माझ्याबरोबर घेऊन आले. पण घरी आल्यानंतर तो वापरावासा वाटेना. परीक्षा संपून निकाल लागेपर्यंतचे ते सुने रिकामे दिवस... गावातल्या मैत्रिणींशी पूर्वीसारखा जुळून न येणारा संवाद... घरात राहताना प्रकर्षाने जाणवणारं आणि आठवणारं होस्टेलवरचं मोकळं सहजीवन... अभ्यासाच्य वातावरणाने भारलेल्या आणि गप्पांबरोबर चढत जाणाऱ्या होस्टेलवरच्या रात्रींची सुखद आठवण... चहा करण्यावरून होणारी लुटूपुटीची भांडणं... तो मग बाहेर काढला की हे सगळं आठवून मन उदास व्हायचं.

माझ्या पार्टनर्स केवळ लग्न ठरेपर्यंत शिकायचं म्हणून शिकत होत्या. कदाचित पुढल्या वर्षी त्या हॉस्टेलला नसतीलही. हे जाणवून ती उदासीनता आणखी वाढायची.

शेवटी तो मग मी पुढच्या वर्षी नेण्याच्या पेटीत पुन्हा ठेवून दिला.

कारण पावसाळ्यात मोजला जाणारा आयुष्याचा अनुभव आता दहाबारा आकड्यांनी वाढला होता. मैत्रीवरचा विश्वास दृढ झाला असला तरी, पुढच्या वास्तव आयुष्याची अस्थिरता अंधुकशी जाणवायला लागली होती. आणि म्हणूनच मसन अशा प्रेमाच्या वस्तूंचा आधार पकडू ठेवू पहात होतं.

माझ्यावर मोठ्या बहिणीसारखं प्रेम करणाऱ्या त्या रूममेटस् मला नंतर भेटल्याच नाहीत. त्यांचं शिक्षण थांबलं असावं. कॉलेज बदलून मीही पुण्याला आले.

पुढे खूप वर्षांनी ती पेटी उघडल्यावर तो जुनाट मग माझ्याच हातून निसटून फुटला. पण मनातल्या आठवणी मात्र अजूनही तशाच एकसंध राहिल्या आहेत.

पहिला पगार! आयुष्यातली अत्यंत अपूर्वाईची रक्कम!! आत्मविश्वास देणारी. खांद्याला पंख फुटल्याचा भास निर्माण करणारी... जगण्याची ओढ जागवणारी.

माझ्या पहिल्या पगाराचं स्मृतिचिन्ह म्हणून मी एक सोन्याची अंगठी घेतली. एकशे सत्तावीस रुपयांची. ती घेताना तिच्या नाजूक नक्षीवरच मी जास्त भाळल्यामुळे, सोन्याच्या चोखपणाकडे फारसं लक्ष दिलं नाही. किंवा गुंतवणूक म्हणूनही तिचा विचार केला नाही. माझ्या लेखी ते केवळ माझ्या मिळवतेपणाचं प्रतिक होतं.

हॉस्टेलवर राहताना सोन्याची वस्तू कशाला? म्हणून ती घरीच ठेवली. कधीतरी सणासुदीला घरी गेले की, अभिमानाने मी ती घालून मिरवायची.

वर्षभरातच माझं लग्न ठरलं. चोख सोन्याची ठसठशीत अंगठी बोटात अडकवली गेली. अंगावर इतरही दागिन्यांची गर्दी झाली. आणि माझी ती स्वकष्टार्जित अंगठी आईच्या पेटीत तशीच पडून राहिली.

सत्तावीस वर्षांनंतर आईच्या शेवटच्या आजारपणात तिने ती अंगठी... "तू म्हणाली होतीस एखाद्या वेळी नवीन दागिना घेताना मोडून टाक म्हणून. पण माझ्याने नाही मोडवली. तुझ्या पहिल्या पगाराची अंगठी म्हणून इतके दिवस जपून ठेवली. आता माझ्या माघारी तुला तिचं काय करायचं ते कर..." असं म्हणत माझ्याकडे दिली.

आता मी ती माझ्या कुठच्याच बोटात शिरत नव्हती. इतक्या वर्षांत त्या

अंगठीचं चलनी मोल सोन्याच्या भावाच्या पटीत वाढलं होतं. पण त्यापेक्षाही आईच्या 'लेकीच्या पहिल्या कमाईची वस्तू' या कौतुकाची झळाळी त्याच्यावर जास्त दिसत होती.

आयुष्यातल्या तीन टप्प्यांवरच्या या तीन वस्तू. त्यांचं व्यावहारिक मूल्य वेगवेगळं असलं तरी, भावनिक मोल एकच होतं... स्मरणरंजनाच्या रस्त्यावर नेऊन सोडणाऱ्या गोड खुणा.

प्रत्येकाच्या आयुष्यात अशा खुणेच्या वस्तू असतात. कुठे फक्त वस्तूंची रेशीमघडी जपली जाते; पण आठवणींचा पदर विरतो. तर कुठे वस्तू फुटल्या मोडल्या तरी आठवणी अभंग राहतात.

काहीही असलं तरी, आयुष्याची श्रीमंती वाढवणाऱ्या अशा वस्तू प्रत्येकाच्या खजिन्यात असतातच असतात. अशा वस्तू म्हणजे भूतकाळाचे दरवाजे उघडण्याचा, तिथल्या रंगीबेरंगी मंद प्रकाशात आताचं भडक वास्तव विसरण्याचा मंत्रच असतो.

काळाच्या ओघात अशा वस्तूंशी जोडलेली माणसं संवादाच्या पल्याड निघून जातात. जगण्याच्या प्रवाहात नात्यांचे रंग बदलत जातात. पण अशा वस्तू आणि त्यांच्या दर्शनाने येणाऱ्या आठवणी यांची हळुवार गुंफण मात्र तशीच पोपटीकोवळी राहते. ती कधीच निबर होत नाही.

कारण उन्हापावसाबरोबर वाढणारं वय माणसांना असतं. ते काळालाही असतं.

पण आठवणींच्या रेशमी कशिद्याला मात्र कधीच वय नसतं. त्याची नक्षी सदैव तरुण असते.

— — — — — — — — — — — —


**प्रमोदिनी वडके-कवळे**

प्राजक्त, अपूर्वा हौ. सोसायटी, सर्व्हे नं. ६०,
सुखसागरनगर क्र. २, गल्ली क्र. १०,
कोंढवा बुद्रुक, पुणे ४११०४८



शतखंड भारताला एकसंघ करणाऱ्या एका युगनिर्मात्याची, चाणक्याची गाथा

**चाणक्य**

**भा. द. खेर**

किंमत २५०रु.
पोस्टेज २०रु.

**दिग्विजय**

(नेपोलियन बोनापार्ट)

**भा. द. खेर/ राजेंद्र खेर**

किंमत ४००रु.
पोस्टेज ३०रु.








**आपल्या प्रिय व्यक्तीने अत्यंत जिव्हाळ्याने मनापासून काही सांगावे आणि आपण त्यात रमून जावे असा अनुभव शांताबाईंचे ललितलेख वाचताना येतो.**

**शैशवावस्थेपासून प्रौढत्वापर्यंत वेगवेगळ्या जीवनप्रसंगात आलेल्या अनुभवांकडे अत्यंत तरल पातळीवरून शांताबाई पाहतात. त्या प्रत्येक अनुभवातलं चैतन्य, सौंदर्य, त्याच्या अनुभूतीतील सच्चेपणा आणि त्याच्या अनुषंगानं येणारं चिंतन याचा सुंदर मेळ या ललितलेखात आहे.**


**संस्मरणे**

**किंमत ८०रु.**





**सांगावेसे वाटले, म्हणून**

**किंमत १००रु.**





**रंगरेषा**

**किंमत ८०रु.**

प्रत्येकी पोस्टेज २०रु.

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

## २००५ साली प्रकाशित झालेल्या पुस्तकांची यादी

| **पुस्तकाचे नाव** | **लेखक** | **किंमत** |
|---|---|---|
| **कादंबरी** | | |
| **ययाति** | वि. स. खांडेकर | २००/- |
| **अमृतवेल** | वि. स. खांडेकर | १००/- |
| **संभाजी** | विश्वास पाटील | ४८०/- |
| **लोकसखा ज्ञानेश्वर** | आनंद यादव | ३५०/- |
| **आभाळझुंज** | अनंत भोयर | २००/- |
| **शिवा डान्सिंग** : भारती कर्चनर | अनु : मंजूषा गोसावी | २५०/- |
| **सिटी ऑफ बोन्स: मायकेल कॉनेली** | अनु : अजित ठाकूर | २४०/- |
| **चाइल्ड ऑफ द होलोकॉस्ट**: जॅक कुपर | अनु : सिंधू विजय जोशी | १३०/- |
| **ओमेर्ता : मारिओ पुझो** | अनु : अनिल काळे | २२०/- |
| **गॉन फॉर गुड :** हार्लन कोबेन | अनु : अजित ठाकूर | २५०/- |
| **द डार्क क्रुसेडर :** ॲलिस्टर मॅक्लीन | अनु : अशोक पाध्ये | २४०/- |
| **सन्स ऑफ फॉर्च्यून :** जेफ्री आर्चर | अनु : अजित ठाकूर | ३५०/- |
| **लेडीज कूपे :** अनिता नायर | अनु : अपर्णा वेलणकर | २५०/- |
| **टॉक्सिन** : डॉ. रॉबिन कुक | डॉ. प्रमोद जोगळेकर | २५०/- |
| **मूनरेकर** : इयान फ्लेमिंग | अनु. उदय नारकर | १५०/- |
| **कथासंग्रह** | | |
| **गोल गोल राणी** | स्वाती चांदोरकर | १००/- |
| **कवडसे** | योगिनी वेंगुर्लेकर | १२०/- |
| **पाऊलवाटेवरले गाव** | आशा बगे | ११०/- |
| **प्रतिद्वंद्वी** | आशा बगे | १२०/- |
| **समर्पिता** | शरद दळवी | २२०/- |
| **सिरसी** | सतीश सुरवसे | ७०/- |
| **शोधकथा** इन्स्पेक्टर व्ही.अनंतांच्या | प्रा.अनंत वासुदेव वाईकर | १६०/- |
| **दोस्त** | व. पु. काळे | १२०/- |
| **का रे भुललासी** | व. पु. काळे | १२०/- |
| **खेकडा** | रत्नाकर मतकरी | ८०- |



| | | |
|---|---|---|
| **कबंध** | रत्नाकर मतकरी | १००/- |
| **निर्मनुष्य** | रत्नाकर मतकरी | १००/- |
| **मध्यरात्रीचे पडघम** | रत्नाकर मतकरी | १००/- |
| **निरपराध बळी** | व. कृ. जोशी | १००/- |
| **काबुलीवाला आणि इतर कथा** | | |
| : रवीन्द्रनाथ टागोर | अनु : मृणालिनी गडकरी | १००/- |
| **ऑक्टोपसी :** इयान फ्लेमिंग | अनु. जयमती दळवी | ८०/- |
| **ललित** | | |
| **स्वप्नी जे देखिले** | संपा. अरुण शेवते | ९०/- |
| **चित्तचित्रे** | संपा. अरुण शेवते | ९०/- |
| **वैचारिक** | | |
| **मुग्ध कहाणी प्रेमाची** | अनु. मीना टाकळकर | १२०/- |
| **विज्ञानाचा समाजधारणेवरील** | | |
| **परिणाम : बर्ट्रांड रसेल** | कमलाकर दीक्षित | १००/- |
| **बंडखोर** | अनु. माधुरी काबरे | ९०/- |
| **चरित्रे** | | |
| **छत्रपती राजर्षी शाहू महाराज** | तु. बा. नाईक | १००/- |
| **माहिती** | | |
| **प्रवास - पर्यटनाचे नवे पैलू** | यशोधरा भोसले | १५०/- |
| **खगोलशास्त्र विषयक संदर्भ ग्रंथ** | | |
| **तारकांच्या विश्वात** | पराग महाजनी | ३५०/- |
| कथारूपी खगोलशास्त्र | लीना दामले | १००/- |
| **कलाविषयक** | | |
| **भारतीय शिल्प वैभव** | | |
| **- प्राचीन मध्ययुगीन** | डॉ. सु. र. देशपांडे | १५०/- |
| **प्रवासवर्णन** | | |
| **दक्षिणायन :** केप हॉर्न ते कॅरिबियन | डॉ. रणजित मिरजे | २५०/- |
| **विज्ञान विषयक** | | |
| **विज्ञान प्रपंच (लेख)** | डॉ. बाळ फोंडके | १५०/- |
| **ग्यानबाचं विज्ञान** | डॉ. बाळ फोंडके | १३०/- |
| **नवे शतक** | निरंजन घाटे | १५०/- |
| **खेळणीच खेळणी** | डी. एस्. इटोकर | ६०/- |

**व्यक्तिमत्त्व विकसन**

| | | |
|---|---|---|
| **चला उठा कामाला लागा!** | | |
| : स्वाती शैलेश लोढा | अनु: अंजनी नरवणे | १२०/- |
| **द मॅजिक ऑफ थिंकींग बिग :** | | |
| **डेव्हिड जोसेफ श्वार्झ** | अनु : प्रशांत तळणीकर | २००/- |

**आरोग्य**

| | | |
|---|---|---|
| **पाणी** : ए. आर. हरी | अनु: सुभाष जोशी | ७०/- |
| **आरोग्यासाठी योग** | अनु.मंगेश कश्यप | ८०/- |
| **कार्यमग्न,व्यस्त लोकांसाठी** | | |
| **योगसाधना** : बिजयालक्ष्मी होता | अरुंधती महाम्बरे | ५०/- |
| **तणावमुक्तीसाठी योगसाधना** : | | |
| भरत ठाकूर | अनु. डॉ. सुभाष दांडेकर | ५०/- |

**नाटक**

| | | |
|---|---|---|
| **तन-मन** | रत्नाकर मतकरी | ४०/- |

**मार्गदर्शनपर**

| | | |
|---|---|---|
| **चला जाणून घेऊ या!** | | |
| **चालणे** | मोतिया बसर्गेकर | ३०/- |
| **प्रथमोपचार** | मंगेश कश्यप | ३०/- |
| **वास्तुशास्त्र** | स्वाती शहा | ३०/- |
| **योगविद्या** | मंगेश कश्यप | २५/- |
| **अंकशास्त्र** | गंगाधर महाम्बरे | ३०/- |
| **यशाचं रहस्य** | सुभाष जोशी | ३०/- |
| **हस्तसामुद्रिक** | डॉ. वृषाली पटवर्धन | ३०/- |
| **गुडघेदुखी** | सुषमा शाळीग्राम | ३०/- |
| **रोग बरे करणारी** | | |
| **पाण्याची अद्‌भुत शक्ती** | अनु. वैशाली जोशी | ३०/- |
| **आध्यात्मिकता** | अनु. प्रशांत तळणीकर | **३०/-** |
| **मधुमेह** | अनु. प्रशांत तळणीकर | ५०/- |
| **२० मिनिटे तंदुरुस्तीसाठी** : शेली बात्रा | अनु: गंगाधर महाम्बरे | १३०/- |
| **मंत्र श्रीमंतीचा** | श्याम भुर्के | १३०/- |
| **क्रोशा विणकाम** | प्रभावती पुरम | २००/- |

**बाल वाङ्मय**



| | | |
|---|---|---|
| **हॅरी पॉटर आणि परीस :** | | |
| **जे. के. रोलिंग** | अनु: बाळ ऊर्ध्वरेषे | १६५/- |
| **टिंबक टू आणि इतर कथा** | मंजूषा आमडेकर | ३०/- |
| **मजेदार लोककथा** | मंजूषा आमडेकर | ३०/- |
| **आदर्श लोककथा** | मंजूषा आमडेकर | ३०/- |
| **धमाल गोष्टी** | मंजूषा आमडेकर | ३०/- |
| **गम्मत गोष्टी** | मंजूषा आमडेकर | ३०/- |
| **मन्नो** | मंजूषा आमडेकर | २५/- |
| **जादूचं खीरपात्र आणि इतर कथा** | अरुंधती पंडित | ३०/- |
| **निद्राराणी आणि इतर कथा** | विजया देशपांडे | ३०/- |
| **चतुर बोकोबा आणि इतर कथा** | वृषाली पटवर्धन | ३०/- |
| **नशिबवान शेखर आणि इतर कथा** | वृषाली पटवर्धन | ३०/- |
| **सुंठ-बिस्किटाचा माणूस आणि** | | |
| **इतर कथा** | चारुता पुराणिक | ३०/- |

## अनुवादित कथासंग्रह

| | | |
|---|---|---|
| **काबुलीवाला आणि इतर कथा :** | | |
| रवींद्रनाथ टागोर (बंगाली कथा) | अनु. मृणालिनी गडकरी | १०० |
| **गहाण पडलेली टेकडी :** | | |
| मारिया श्रेस (गुजराथी) | अनु. अंजनी नरवणे | १२० |
| **द्वंद्व** : विजयदान देथा (राजस्थानी कथा) | अनु. वनिता सावंत | १५० |
| **रावीपार** : गुलजार | अनु. पाडळकर/वेल्हाळ | १५० |
| **फुलांचे बोल** : | | |
| **आन्ना साक्से (रशियन कथा)** | **अनु. सुनीती देशपांडे** | **१००** |
| **अंतर-पर्व** (रशियन कथा) | अनु. सुनीती देशपांडे | १३० |
| **द स्ट्रीम विदिन** (बंगाली कथा) | अनु. मीना वैशंपायन | १३० |
| **इंटरप्रिटर ऑफ मॅलडीज्** | | |
| **: झुंपा लाहिरी** | **अनु. भारती पांडे** | **१७०** |

# २००६ साली प्रकाशित झालेल्या पुस्तकांची यादी

| पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|
| **कादंबरी** | | |
| **फॉर युअर आईज ओन्ली** : | | |
| इयान फ्लेमिंग | अनु. अनिल काळे | १२०/- |
| **साऊथ बाय जावा हेड :** | | |
| ॲलिस्टर मॅक्लीन | अनु. अशोक पाध्ये | २५०/- |
| **केतकरवहिनी** | उमा कुलकर्णी | १५०/- |
| **मोहिनी** | पारू मदन नाईक | १६०/- |
| **लिव्हिंग हिस्ट्री :** | | |
| हिलरी रॉडहॅम-क्लिन्टन | अनु. सुप्रिया वकील | ४००/- |
| **मयादा - इराकची कन्या :** | | |
| जीन सॅसन | अनु. भारती पांडे | २५०/- |
| **वसंतगंधा** | माधवी कोल्हटकर | १२०/- |
| **रिकामा देव्हारा** | वि. स. खांडेकर | १००/- |
| **दोन ध्रुव** | वि. स. खांडेकर | १८०/- |
| **क्रौंचवध** | वि. स. खांडेकर | १८०/- |
| **हिरवा चाफा** | वि. स. खांडेकर | १५०/- |
| **द दा विंची कोड** : डॅन ब्राऊन | अनु. अजित ठाकूर | ३२०/- |
| **कथासंग्रह** | | |
| **कुंकू पुसणारा हात** | व. कृ. जोशी | १४०/- |
| **चरित्रे** | | |
| **जे आर डी : एक चतुरस्र माणूस** | माधुरी शानभाग | १००/- |
| **खाली जमीन वर आकाश** | डॉ. सुनीलकुमार लवटे | १५०/- |
| **खगोलशास्त्र विषयक संदर्भ ग्रंथ** | | |
| **अंतरिक्षाचा वेध** | सुधा रिसबूड | १५०/- |
| **कलाविषयक** | | |
| **वेरूळ लेण्यातील शिल्पवैभव** | राधिका टिपरे | २००/- |
| **मेहेंदी** | | |
| **अमृताज् मेहेंदी डिझाईन्स** | अमृता खोड्ये | ५०/- |



| | | |
|---|---|---|
| **आरोग्य** | | |
| **वजन कमी करण्यासाठी** | | |
| **योगसाधना** | अनु. डॉ. सुभाष दांडेकर | ५०/- |
| **मार्गदर्शनपर** | | |
| **चला जाणून घेऊ या!** | | |
| **चक्रं आणि नाडी :** रवींद्र कुमार | अनु. सुभाष जोशी | ३०/- |
| **चला जाणून घेऊ या!** | | |
| **ज्योतिषविद्या :** विजय कुमार | अनु. शरद गोगटे | ३०/- |
| **चला जाणून घेऊ या!** | | |
| **क्रियायोग :** रवींद्र कुमार | अनु. सुभाष जोशी | ३०/- |
| **चला जाणून घेऊ या!** | | |
| **केसांची निगा :** मीनाक्षी सिन्हा, | | |
| रिना राजगोपाल,सुश्मिता बॅनर्जी | अनु. मीना टाकळकर | ३०/- |
| **चला जाणून घेऊ या!** | | |
| **ॲक्युप्रेशर :** डॉ.सावित्री रमय्या | अनु. सुभाष जोशी | ३०/- |
| **शांततेनं काम करा!** : पॉल विल्सन | अनु. सुनंदा अमरापूरकर | २४०/- |
| **बाल वाङ्मय** | | |
| **बुडबुड्यांचे विमान आणि इतर गोष्टी** | अर्चना ओक | ३०/- |
| **चालणारा हिमपुतळा आणि** | | |
| **इतर गोष्टी** | अर्चना ओक | ३०/- |
| **छोटुसा पांढरा ससुकला आणि** | | |
| **इतर गोष्टी** | अर्चना ओक | ३०/- |
| **छोटु किल्लीवाला उंदीर आणि** | | |
| **इतर गोष्टी** | अर्चना ओक | ३०/- |
| **लोखंड खाणारे उंदीर आणि** | | |
| **इतर कथा** | वृषाली पटवर्धन | ३०/- |
| **गंपू चिंपू आणि इतर कथा** | उमा खरे | ३०/- |
| **मैत्रीचे मोल आणि इतर कथा** | उमा खरे | ३०/- |
| **सिंड्रेला आणि इतर कथा** | उमा खरे | ३०/- |




## * वरुणराज भिडे स्मृती पुरस्कार

''बदलत्या समाजाचे प्रतिबिंब वृत्तपत्रांत उमटत असते. त्यामुळे समाजात आमूलाग्र बदल होत असेल, तर वृत्तपत्रांचे स्वरूपही बदलणारच! हे बदल स्वागतार्ह आहेत,'' असे प्रतिपादन 'महाराष्ट्र टाइम्स'चे संपादक भारतकुमार राऊत यांनी वरुणराज भिडे स्मृती पुरस्कार वितरण कार्यक्रमात केले. पत्रकारितेतील उल्लेखनीय कामगिरीबद्दल 'महाराष्ट्र टाइम्स'चे प्रकाश अकोलकर, पत्रकारितेतील आश्वासक कामगिरीबद्दल 'सकाळ'चे पराग करंदीकर आणि 'तरुण भारत'चे शैलेश पांडे यांना खासदार श्रीनिवास पाटील यांच्या हस्ते २९ एप्रिल रोजी पुरस्कार प्रदान करण्यात आले. वरुणराज भिडे मित्रमंडळाचे अध्यक्ष विलास जोशी, अंकुश काकडे, आमदार उल्हास पवार आदी या वेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

पुणे विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या पदविका अभ्यासक्रमात प्रथम आलेली प्रगती बाणखेले आणि 'चालू घडामोडी' या विषयात सर्वाधिक गुण मिळविलेले भूषण राक्षे आणि नितीन थोरात यांना यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानतर्फे या वेळी पारितोषिके देण्यात आली. वरुणराज भिडे यांचा मित्रपरिवार, विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि पत्रकार या कार्यक्रमास उपस्थित होते.

'मराठी वृत्तपत्रांचे बदलते स्वरूप' या विषयावर श्री. राऊत यांनी विचार व्यक्त केले. ते म्हणाले, ''केवळ वृत्तपत्रांच्या स्वरूपात बदल झालेला नाही. गेल्या दहा-बारा वर्षांत भोवतालचा समाजही मोठ्या प्रमाणावर बदलला आहे. वृत्तपत्रांची भूमिकाही बदलत आहे. एकेकाळी लोकशिक्षण हे वृत्तपत्रांचे मुख्य कार्य होते. आज लोकशिक्षणाची जागा 'माहिती आणि रंजन' यांनी घेतली आहे. एकेकाळी वृत्तपत्र जनमत घडवीत होते, आज वृत्तपत्रे लोकानुनय करताना दिसत आहेत. हा बदल काळानुरूप आहे.''

ते पुढे म्हणाले, ''नवीन जीवनशैली, चित्रपट आणि क्रीडा जगत, नवतंत्रज्ञान, आंतरराष्ट्रीय घडामोडी यांमध्ये वाचकांना रस आहे. त्यामुळे केवळ राजकारणाचा विषय त्यांच्या माथी मारून चालणार नाही. त्यांच्याच तोंडी असलेली आणि त्यांना सहज कळणारी भाषाच वृत्तपत्रांत असायला हवी.''



## * 'महाराष्ट्र भूषण' रतन टाटा

ख्यातनाम उद्योगपती व महाराष्ट्राच्या सामाजिक व शैक्षणिक जीवनात मोलाची भर घालणारे टाटा उद्योग समूहाचे अध्यक्ष रतन टाटा यांना राज्य सरकारने २००६ चा महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान केला.

टाटा उद्योग समूहाच्या विविध औद्योगिक उपक्रमांबरोबरच टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च, टाटा कॅन्सर रिसर्च, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, एनसीपीए यासारख्या विविध संस्थांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या सामाजिक-शैक्षणिक तसेच आरोग्यक्षेत्रात रतन टाटा यांनी मोलाचे काम केले आहे.

रतन टाटा यांना याआधी अनेक राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले असले, तरी त्यांच्या समूहाचे मुख्यालय मुंबईत आहे. त्यामुळे महाराष्ट्राने केलेल्या सन्मानाचे मोल मोठे आहे, असे सांगण्यात आले.

टाटा यांच्या रूपाने प्रथमच अमराठी व्यक्तीला हा पुरस्कार मिळाला आहे.

यापूर्वी पु. ल. देशपांडे, लता मंगेशकर, भीमसेन जोशी, बाबा आमटे, रघुनाथ माशेलकर इत्यादी नऊ मान्यवरांना हा पुरस्कार देण्यात आला आहे. पाच लाख रुपये रोख, मानपत्र आणि मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. टाटा यांना यापूर्वी भारत सरकारने पद्मभूषण हा पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे.

## * गणपत पाटील यांना 'चित्रभूषण'

मराठी चित्रपटांसाठी योगदान दिलेल्या व्यक्तींना दिल्या जाणाऱ्या 'चित्रभूषण' या जीवनगौरव पुरस्कारासाठी यंदा गणपत पाटील यांची निवड झाली आहे.

कै. बाबूराव पेंटर यांच्या जन्मदिनी, म्हणजेच तीन जून रोजी मुंबईतील रवींद्र नाट्य मंदिरात हा पुरस्कारक दिला जाईल, अशी माहिती महामंडळाचे अध्यक्ष अजय सरपोतदार यांनी दिली. रेशमी शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह आणि ३६ हजार रुपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या रकमेतील ११ हजार रु. अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ देते आणि २५ हजार रु. महाराष्ट्र सरकारतर्फे दिले जातात.

भालजी पेंढारकर उर्फ बाबा यांच्या नावाने दिला जाणारा पुरस्कार म्हणजे साक्षात परमेश्वराचा पुरस्कार आहे, असे गणपत पाटील म्हणाले. 'हा पुरस्कार सर्वात मोठा आहे. बाबांनी मला काठीने मारून अभिनय शिकवला आहे. त्यामुळेच मी घडलो,' अशा शब्दांत त्यांनी भालजींच्या आठवणींना उजाळा दिला.

गणपत पाटील यांनी १९३८ साली 'बालध्रुव' या चित्रपटातून कारकीर्दीला सुरुवात केली. तेव्हापासून नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'ना. मुख्यमंत्री गणप्या गावडे' या चित्रपटापर्यंत त्यांची कारकीर्द सुरू आहे.''

बलिदान, छत्रपती शिवाजी, पुढारी, सोंगाड्या, दोन बायका फजिती ऐका अशा साठहून अधिक चित्रपटांमध्ये त्यांनी भूमिका केल्या आहेत.

### * मसापची ग्रंथपारितोषिके जाहीर

महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे वार्षिक ग्रंथपारितोषिकांनी ११ लेखकांचा गौरव करण्यात आला. पारितोषिकविजेत्या पुस्तकांमध्ये 'बाकी शून्य' (कमलेश वालावलकर, राजहंस प्रकाशन), आणि 'गाठी गाठी जीव' (राजन खान, मॅजेस्टिक प्रकाशन) यांचा समावेश आहे.

'बाकी शून्य'ला कादंबरीचे ह. ना. आपटे पारितोषिक, तर 'गाठी गाठी जीव'ला कथासंग्रहाचे आनंदीबाई शिर्के पारितोषिक देण्यात आले. अन्य पारितोषिके अशी–

नी. स. गोखले उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पारितोषिक (प्रकाशकास)- इजिप्तायन (डॉ. मीना प्रभू, मौज प्रकाशन), रा. ना. नातू पारितोषिक- वंद्य वंदे मातरम् (सच्चिदानंद शेवडे, अभिजीत प्रकाशन), म. वि. गोखले पारितोषिक- फायनल ड्राफ्ट (गिरीश जोशी, मॅजेस्टिक प्रकाशन), सत्यशोधक केशवराव विचारे पारितोषिक- कडकडोनि वीज निमाली ठायीचे ठायी (डॉ. केतकी मोडक), ग. स. ठाकूरदेसाई पारितोषिक- खानदेशातील समाजप्रबोधनाची चळवळ (डॉ. भी. ना. पाटील), अभिजात पारितोषिक- संकल्पनांचे विश्व आणि सामाजिक वास्तव (डॉ. द. ना. धनागरे, प्रतिमा प्रकाशन), लक्ष्मीबाई टिळक पारितोषिक- वाट वळणावळणाची (लीला भागवत, अनुबंध प्रकाशन) आणि मृत्युंजय पारितोषिक- ज्येष्ठ (अनंत मनोहर, कॉंटिनेंटल प्रकाशन).

पं. रामाचार्य अवधानी पुरस्कार- पद्मा कुलकर्णी (सोलापूर), कविवर्य भा. रा. तांबे पुरस्कार- डॉ. सुहासिनी इर्लेकर (बीड), ना. घ. देशपांडे पुरस्कार- सुधीर मोघे (पुणे), डॉ. भालचंद्र फडके पुरस्कार- रामनाथ चव्हाण (पुणे), प्रा. गो. रा. परांजपे पुरस्कार- डॉ. अ. पां. देशपांडे (मुंबई), कै. कमलाकर सारंग पुरस्कार- अभिराम भडकमकर (पुणे) आणि कै. श्रीपाद जोशी पुरस्कार- अशोक जोशी (पुणे).

### * अंकुर वाङ्मय पुरस्कार

अंकुर साहित्य संघ अकोला यांच्यातर्फे दिल्या जाणाऱ्या पुरस्कारासाठी परभणी येथील रेणू पाचपोर यांच्या 'एक हिरवंगार वर्ष' या साहित्यकृतीची निवड झाली आहे.

पाचपोर यांच्या वरील पुस्तकाला स्व. रामचंद्र जोध स्मृती बालपुष्प पुरस्कार २३ एप्रिल रोजी नांदेड येथे राज्यस्तरीय ३६ व्या अंकुर मराठी साहित्य संमेलनात प्रदान केला गेला.



### * सुधा रिसबूड यांना स्वातंत्र्यवीर सावरकर पुरस्कार

पुणे मराठी ग्रंथालयातर्फे देण्यात येणाऱ्या स्वातंत्र्यवीर सावरकर पुरस्कारासाठी यावर्षी लेखिका सुधा रिसबूड यांची निवड झाली आहे. 'अंतरिक्षाचा वेध' या 'मेहता पब्लिशिंग हाऊस'तर्फे प्रकाशित झालेल्या पुस्तकाबद्दल त्यांना हा पुरस्कार मिळाला आहे. रु. ५०००/- रोख व सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

पुण्याच्या राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेतील ज्येष्ठ शास्त्रज्ञ अनंत सुर्वे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ विज्ञानविषयक विशेष प्रचार व प्रभावी मराठी ललितलेखन करणाऱ्या साहित्यिकास पुणे मराठी ग्रंथालयातर्फे पुरस्काराने गौरवण्यात येते. 'अंतरिक्षाचा वेध' हे पुस्तक विज्ञानविषयाला ललितरूप देणारे आहे म्हणून त्याला पुरस्काराने गौरवण्यात येत आहे, असे ग्रंथालयाचे कार्यवाह मुकुंद अनगळ यांनी कळवले.

-पुणे मराठी ग्रंथालयाचा स्वातंत्र्यवीर सावरकर पुरस्कार २००६-




पोस्टेज २०रु.

अंतरिक्षाचा
वेध

डॉ. कार्ल सॅगन
यांच्या अत्यंत
गाजलेल्या 'कॉसमॉस'
या विज्ञानावरील
सुरस पुस्तकाचा
परिचय घडवणारे
पुरस्कारप्राप्त पुस्तक.

**सुधा रिसबूड**

किंमत १५०रु.

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

**भारतातील नामवंत विधिज्ञ नानी पालखीवाला यांनी देशापुढील समस्यांचा, आव्हानांचा आणि त्यावरील उपायांचा घेतलेला मूलगामी परामर्ष**








**वुई द पीपल**
**अनु.- वि. स. वाळिंबे**
किंमत १५०रू.

**वुई द नेशन**
**अनु.- वि. स. वाळिंबे**
किंमत २००रू.

प्रत्येकी पोस्टेज २०रु.

**खगोलशास्त्रावरील पुस्तके**







**तारकांच्या विश्वात**
**पराग महाजनी**
किंमत ३५०रू.

**कथारूपी खगोलशास्त्र**
**लीना दामले**
किंमत १००रू.

प्रत्येकी पोस्टेज २०रु.



# वाचकांचा प्रतिसाद




**खाली जमीन वर आकाश**

**डॉ. सुनीलकुमार लवटे**

**किंमत : १५०रु.**

**वाचकांच्या पत्रातून**

'खाली जमीन वर आकाश' हे आपले आत्मकथन हृदयाला भिडले, मनाला भावले. 'नेम नॉट नोन'पासून 'वेल नोन'पर्यंतचा आपला प्रवास म्हणजे अंगारावरून केलेली वाटचाल आहे. ती सुखद कशी असेल? आपल्या या कथेत कारुण्य आहे पण केविलवाणा भाव नाही. सहानुभूती गोळा करण्याचा छुपा प्रयत्न नाही. आहे ती प्रखर वास्तवता आणि संघर्षाची कथा. या कथेत तुमच्या संघर्षमय जीवनाचे प्रतिबिंब तर दिसतेच; पण त्याचबरोबर प्रगल्भ विचारसरणीचाही प्रत्यय येतो.

ज्यांना काही नाही, त्यांना सर्व काही देण्यासाठी आपण आयुष्यभर उपसलेले कष्ट आणि दिलेले लढे निराशेच्या आहारी गेलेल्या नव्या पिढीला प्रेरणा देतील. मनाला भावलेले अजून एक वैशिष्ट्य म्हणजे आयुष्यभर उपेक्षा, हेटाळणी यांना सतत सामोरे जाऊनही तुमच्या कथनात कटुतेचा अभाव आहे आणि चिरंतन आशेचा प्रभाव आहे. आयुष्यभर संघर्ष करूनही मन प्रसन्न ठेवून भविष्याचा वेध घेता येतो हे आपण सप्रमाण सिद्ध केले आहे.

उद्देशविरोधी व्यक्तींशी न पटणे यात नवीन काही नाही. परंतु विरोधी मते असणाऱ्यांबद्दल मनात वा आचरणात व्यक्तिद्वेषाला थारा न देणे, हा स्वभावगुण मला विलोभनीय आणि अनुकरणीय वाटला.

आपल्या आत्मकथेचे परीक्षण करण्याचा हा माझा मानस नाही, मी साहित्यिक वा समीक्षक नसल्याने तो माझा अधिकारही नाही. एक वाचक आणि अनाथ-पुनर्वसन क्षेत्रातील कार्यकर्ता या नात्याने मनाला वाटले ते चार शब्द लिहिले.

**–डॉ. श्रीकांत पूर्णपात्रे, नाशिक.**

'खाली जमीन वर आकाश' नुकतंच वाचलं. अस्वस्थ होऊन अंतर्मुख झाले. काही वर्षांपूर्वी तुमची पुण्यात एका कार्यक्रमात मुलाखत ऐकली होती. नंतर काही लेखही वाचले होते. त्यामधून काही गोष्टी माहीत झाल्या होत्या. पण पुस्तकात सर्व जीवनपट सलग वाचताना वेगळा विकल करणारा अनुभव आला.

आश्रम, रिमांड होमचे वातावरण ऐकून, वाचून क्वचित पाहून माहीत असते. आपला जन्मापासूनचा या संदर्भातला प्रत्यक्ष अनुभव... तरी आपण तो एका हार्दिक अलिप्तपणे लिहिला आहे. तेथील अत्यल्प सुविधा, मनुष्यांना क्रमांकांचा दर्जा देऊन वागवणं, दिनचर्येतल्या सर्व गोष्टी ओळीनं करणं, हाताची घडी तोंडावर बोट ठेवून बसणं, या सर्व वर्णनाबरोबरच तिथल्याच माणसांकडून प्रेम मिळणं, हेही भरभरून लिहिलेलं आहे. एखादवेळी हालअपेष्टा, दु:खाचा तपशील संयमाने लिहिला गेला असेल; पण जागोजागी व्यक्त झालेला कृतज्ञतेचा भाव इतक्या भारावलेपणाने तुम्ही व्यक्त केला आहे की, असं वाटतं ऋण व्यक्त करण्याची एकही जागा तुम्ही रिक्त ठेवली नसेल!

इतकं दु:ख, इतकी वंचना, उपेक्षा अनुभवूनही आपल्या लेखनात जगण्याविषयी कुठं कटुता आली नाही. अनेकांच्या चुका, गैरव्यवहार, अन्याय्य गोष्टी यांचा स्पष्ट उच्चार जागोजागी असूनही जे चांगलं घडलं, घडतंय त्याचा उल्लेख त्यामुळे झाकोळून जात नाही. एकूण लेखनशैली आपल्या व्यक्तिमत्त्वाचंच दर्शन घडवणारी वाटली.

**–आसावरी काकडे, पुणे.**



# वाचकांचा प्रतिसाद

## तस्लिमा नासरीन ताकद आहे!

कोल्हापूरला अनिल मेहता यांनी तस्लिमा नासरीन यांना आपल्या व्यथा-वेदना कणखर व्यक्तिमत्त्व-जीवननिष्ठा न् उद्दिष्ट जणू उलगडून मांडण्यासाठी निमंत्रित केले आणि प्रगल्भ-प्रगत विचारांच्या, परिपक्व, प्रगमनशील आणि वादळी विचार समूर्त करणाऱ्या संवेदनशील स्त्रीची ओळख ९ मार्च २००६ रोजी कोल्हापूरकरांना करून दिली. आपण त्यांचे मनोगत एप्रिलच्या अंकात प्रसिद्ध करून नासरीन यांचे विचार खोल रुजविण्यास अवसर दिल्याबद्दल धन्यवाद.

बचत गटांच्या ६०-७० प्रमुख कार्यकर्त्यांच्या निवासी प्रशिक्षण कृतिसत्रामध्ये 'माणसा'चे चित्र रेखाटण्यास सांगितले. फक्त दोन-तीन युवतींनी स्त्री रेखाटली. बाकीच्यांनी पुरुषाचेच चित्र 'माणूस' म्हणून रेखाटले. त्यासंबंधी चर्चा करताना बहुतांशी शहर ग्रामवासी तरुणी खजिल झाल्या, ओशाळल्या. आजही बाई स्वत:ला 'माणूस' मानत नाही. व्यवस्था व पुरुषांनाच दोष न देता, कातडी बचाऊ, कचखाऊ मानसिकता बदलण्याची स्त्रियांनी शपथ तस्लिमा नासरीन यांना नेता मानून घेतली पाहिजे. इत्यादी विविध पर्याय हिरीरीने मांडणाऱ्या त्या तरुणींचा उत्स्फूर्तपणा उभारी देणारा होता.

स्वत:च स्वत:ला स्वत:मधून हद्दपार करणाऱ्या आमच्या स्त्रियांच्या पिढीला प्रेरणा देण्याची तस्लिमा नासरीनची ताकद हे निर्विवाद सत्य! ती संतुष्टता-यशस्विता- सारे जिंकल्याचा बुरखा नक्कीच टरकावून टाकते. नव्या पिढीतील स्त्रियांना आत्मसन्मान, आत्मविश्वास, आत्मभान, आत्मओळख कसल्याही तडजोडीशिवाय जपण्यास, संरक्षित-संक्रमित- संवर्धित करण्यास- लढा देण्यास सजग करते.

**–प्रा. अनुराधा गुरव, कोल्हापूर.**

मी गेली सहा वर्षे 'मेहता मराठी ग्रंथजगत'चा सभासद आहे. या अंकाचे संपादन, विशेषत: साहित्यिविषयक वार्तांचे संकलन आणि पुस्तक परीक्षण, ओळख ही वाचनीय असते. अत्युत्कृष्ट साहित्यकृतींचा अनुवाद प्रसिद्ध करण्यात तर आपला हातखंडा आहे.

'उत्कृष्ट तेच विकत घेऊन वाचा' हा तर आपला आग्रह. नुकताच पुस्तकखरेदी

घोटाळ्याबाबतचा ‘लोकसत्ता वृत्तांत’ आणि त्यानंतरची शासकीय (सारवासारव) की कारवाई आपल्या आग्रहाला पुष्टी देणारी आहे. यात खरेदीदाराबरोबरच फालतू पुस्तके गळ्यात मारणारा ‘मध्यस्थ विक्रेता’ आणि घेणारा तेवढेच जबाबदार आहेत. मराठी प्रकाशक संघटनेने (अर्थात ती अस्तित्वात असल्यास) त्याचा धिक्कार करावयास हवा, पण...!

आपण, ‘ललित’ मासिक, मराठी ग्रंथप्रसार व वाचनसंस्कृतीसाठी मोलाची कामगिरी करीत आहात त्याबद्दल धन्यवाद...!

**–अरविंद बोकील, सांगली.**

आपला मे २००६ चा अंक मिळाला. संपूर्ण वाचला. विशेषत: ‘वाचनवेडा राजाराम’ हा लेख आवडला आणि सामान्यांच्या असामान्यत्वाचा पैलू ध्यानी आला. असे कितीतरी राजाराम आपापल्या परीने या बदलत्या सांस्कृतिक जीवनात वाचन संस्कृती जोपासत असतील. त्यांना खरोखरच सलाम. ‘मेहता मराठी ग्रंथजगत’चे स्वरूप खूपच आवडले. आभार.

**–वि. रा. फडके, डोंबिवली.**





**किंमत २००रु.**
**पोस्टेज २०रु.**

## वज्रकमळ घननील

**धनंजय देशपांडे**


भगवान श्रीकृष्णाच्या सर्वात्म रूपाचं दर्शन घडवणारी आगळीवेगळी कादंबरी

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**






## मार्गदर्शनपर पुस्तके




स्वतःला टप्प्याटप्प्याने ओळखत, स्वतःतले दोष बाजूला सारत, गुणांना उजवळत, यश कसे मिळवायचे याचे प्रात्यक्षिकासह सहज सोपे मार्गदर्शन.

**चला! उठा! कामाला लागा!**

**स्वाती-शैलेश लोढा**
**अनु. अंजनी नरवणे** / किंमत १२०रू.




जगभरातल्या लक्षावधी लोकांच्या जीवनात आश्चर्यकारक सुधारणा घडवून आणणारे ‘बेस्टसेलर’ पुस्तक.

**द मॅजिक ऑफ थिंकींग बिग**

**डेव्हिड जोसेफ श्वार्त्झ**
**अनु. प्रशांत तळणीकर** / किंमत २००रू.




तणावरहित, सकारात्मक वातावरणात काम करा आणि शांत होण्याचा आनंद अनुभवा

**शांततेनं काम करा!**

**पॉल विल्सन**
**अनु. सुनंदा अमरापूरकर** / किंमत २४०रू.

प्रत्येकी पोस्टेज २०रु.

# श्रद्धांजली

### * जर्मन भाषेचे अभ्यासक प्रा. बी. बी. कुलकर्णी

जर्मन भाषेचे अभ्यासक प्रा. बाबुराव भीमराव उर्फ बी. बी. कुलकर्णी (वय ८३) यांचे नुकतेच निधन झाले. गेली काही वर्षे ते कर्करोगाने आजारी होते.

विदेशात जर्मन भाषेच्या उच्च शिक्षणासाठी केंद्र सरकारची शिष्यवृत्ती मिळालेले प्रा. कुलकर्णी हे पहिले विद्यार्थी होते. प्रारंभी सांगलीतील विलिंग्डन व कोल्हापूरच्या राजाराम महाविद्यालयात त्यांनी अध्यापन केले. पुणे विद्यापीठातील आधुनिक युरोपीय भाषा विभागाचे (नंतर परकीय भाषा विभाग) ते प्रमुख होते. मॅक्समुल्लर भवनचे ते सहसंस्थापक होते. मराठी विश्वकोशाच्या संपादनातही त्यांचा सहभाग होता.

### * डॉ. गोविंद गारे

ज्येष्ठ साहित्यिक आणि संशोधक डॉ. गोविंद गारे (वय ६८) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले.

डॉ. गारे यांनी आदिवासी समाजाच्या विकासासाठी अविरत प्रयत्न केले. ते मूळचे नवगिरीचे. ते 'आयएएस' परीक्षा उत्तीर्ण झाले होते. 'ट्रायबल्स इन इंडिया' या विषयावर त्यांनी डॉक्टरेट मिळविली. आदिवासी कल्याण आयुक्त म्हणून ते सेवानिवृत्त झाले.

आदिवासी आणि त्यांच्या जमाती हा त्यांचा चिंतनाचा विषय होता. आदिवासींच्या प्रश्नावर आणि जीवनावर विविध ४५ ग्रंथांचे लेखन त्यांनी केले. राज्य सरकारच्या पुण्यातील 'आदिवासी सांस्कृतिक ग्रंथालया'चे जनक म्हणून ते ओळखले जात. 'महाराष्ट्र आदिवासी दर्शन', 'महासंघ वार्ता', 'आदिवासी संशोधन पत्रिका' या नितकालिकांचे ते अनेक वर्षे संपादक होते. शासनाच्या विविध समित्यांवर काम करण्याप्रमाणेच नवी दिल्ली येथील अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद या संघटनेचे ते सक्रिय कार्यकर्ते होते.

### * मनोहर देवधर

व्यासंगी पत्रकार आणि मुंबई मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष मनोहर गणेश देवधर यांचे (वय ७८) दीर्घ आजाराने निधन झाले.

अभ्यासू पत्रकार म्हणून लौकिक असलेले देवधर यांनी प्रारंभीच्या काळात १९४७ मध्ये आचार्य अत्रे यांच्यासमवेत काम केले. त्यानंतर दैनिक 'नवा काळ'मध्ये काही महिने काम केले. त्यानंतर दैनिक 'लोकसत्ता', दैनिक 'महाराष्ट्र



टाइम्स'या वृत्तपत्रांमध्ये उपसंपादकपदावर काम केले. १९८८ मध्ये निवृत्त झाले. निवृत्तीनंतर त्यांनी अमेरिकेतील बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या 'बृहन्महाराष्ट्र वृत्त' या मासिकाचे भारतातील प्रतिनिधी म्हणून काम केले. 'लंडन टाइम्स'च्या प्रतिष्ठित थॉम्पसन फाउंडेशनच्या पत्रकारिता शिष्यवृत्तीसाठी त्यांची निवड झाली होती. देवधर यांचे 'कोंबडीची मुलाखत' आणि इतर विनोदी लेखांचे पुस्तक, सॉलिसिटर के. बी. जोशी यांचे चरित्र, जादूची मधमाशी, राक्षसाची गोष्ट हे बालसाहित्य प्रसिद्ध झाले आहे.

### * उदारमतवादी अर्थतज्ज्ञ जॉन केनेथ गालब्रेथ

जगप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ, सव्यसाची विचारवंत, व्यासंगी लेखक आणि अमेरिकेचे भारतातील माजी राजदूत जॉन केनेथ गालब्रेथ यांचे नुकतेच निधन झाले. ते ९७ वर्षांचे होते. पं. जवाहरलाल नेहरू तसेच इंदिरा गांधी यांच्याशी त्यांचे व्यक्तिगत पातळीवरही घनिष्ठ संबंध होते. अमेरिकेचे माजी अध्यक्ष जॉन केनेडी यांच्या कारकीर्दीत (१९६१-६३) ते भारतातील राजदूत होते. उदारमतवादी विचारवंत आणि अमेरिका-भारत मैत्रीचे खंदे पुरस्कर्ते म्हणून ते ओळखले जात. शीतयुद्धाच्या ऐन धामधुमीत शांततावादी विचार तसेच समाजवादी अर्थशास्त्र आणि भांडवली बाजारपेठीय अर्थव्यवस्था यांचा समन्वय करण्याचे गालब्रेथ यांनी जोमाने प्रयत्न केले होते. त्यांनी मुख्यत: आर्थिक विषयांवर एकूण ३० पुस्तके लिहिली होती. समाजशास्त्र व राजकारण या विषयांच्या आधारे त्यांनी केलेले जागतिक अर्थविश्लेषण अनेक देशांना आपले धोरण ठरवताना मार्गदर्शक ठरले होते. 'ॲन एज ऑफ अनसर्टन्टी', 'द ॲफ्ल्यूएंट सोसायटी', 'मनी', 'द कन्व्हेन्शनल विस्डम', 'द न्यू इंडस्ट्रीयल स्टेट' इ. त्यांची गाजलेली पुस्तके होत. गालब्रेथ यांच्या 'द ॲम्बॅसेडर्स जर्नल' या आत्मचरित्रात्मक ग्रंथात त्यांचे भारतातील कारकीर्दीचे अनुभव मनस्वीपणे व्यक्त झाले आहेत. भारतातील एकूण समाजव्यवस्थेचे त्यांनी 'द फंक्शनिंग अनार्की' असे समर्पक वर्णन केले होते. आज जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या आव्हानांचा अंदाज सुमारे तीस-पस्तीस वर्षांपूर्वीच त्यांनी घेतला होता. 'द एज ऑफ अनसर्टन्टी' या पुस्तकात त्याचा त्यांनी सविस्तरपणे ऊहापोह केला आहे.

### * बाळ जमेनीस

मराठी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ नाटककार, अभिनेते, भजनतपस्वी शरद ऊर्फ बाळ दामोदर जमेनीस (वय ७२) यांचे नुकतेच कोल्हापूर येथे निधन झाले.

भालजी पेंढारकर यांनी दिग्दर्शित केलेल्या 'संताजी धनाजी' या चित्रपटातील जमेनीस यांची शिवाजी महाराजांची भूमिका गाजली होती. फत्तेलाल बंधूंच्या 'साईबाबा' चित्रपटातील खलनायकाची भूमिकाही अविस्मरणीय होती.

❐

## अत्याचार व त्याचा तेजस्वी प्रतिकार मांडणाऱ्या सत्यकहाण्या...




**द ब्रेडविनर**

डेबोरा एलिस
अनु. अपर्णा वेलणकर
किंमत १००रु.




**नॉट विदाऊट माय डॉटर**

बेट्टी मेहमूदी
अनु. लीना सोहनी
किंमत २००रु.




**चाइल्ड ऑफ द होलोकॉस्ट**

जॅक कूपर
अनु. सिंधू जोशी
किंमत १३०रु.



**काबुलीवाल्याची बंगाली बायको**

सुस्मिता बॅनर्जी
अनु. मृणालिनी गडकरी
किंमत १००रु.




**ब्लास्फेमी**

तेहमिना दुर्रानी
अनु. भारती पांडे
किंमत १००रु.





**मयादा - इराकची कन्या**

जीन सॅसन
अनु. भारती पांडे
किंमत २५०रु.

**प्रत्येकी पोस्टेज २०रु.**






| | |
|---|---|
| मिकी माऊस | १०४ |
| हक्काचे घर | १०७ |
| संगत | १११ |



# मिकी माऊस

'मिकी माऊस' हा जगातील सर्व बाळगोपाळांचा सर्वाधिक आवडता दोस्त आहे. १९२८ साली न्यूयॉर्कच्या 'कोलोनी' थिएटरमध्ये त्याचा पहिला शो आयोजित करण्यात आला.

वॉल्ट डिस्ने' व 'ब्रूस विक' हे दोघे 'मिकी माऊस' या पात्राचे जनक मानले जातात. एकदा ऑफिसमध्ये दोघे बसले असताना त्यांच्या समोरून एक उंदीर टुणकन् उडी मारून पळत गेला. त्याला पाहताच 'वॉल्ट डिस्ने'ला एक कल्पना सुचली व त्याने 'ब्रूस विक'ला उंदराचे व्यंगचित्र काढण्यास सांगितले. ब्रूसने व्यंगचित्र काढताना नाकाचा शेंडा असलेला कान मोठे असणारा, दोन पायावर चालणारा, बघताक्षणी आवडणारा उंदीर काढला. सुरुवातीला या उंदराचे नाव



'मोलतिमा माऊस' असे ठेवण्यात आले. मात्र 'मोलतिमा' हे नाव खूप लांबलचक असल्याने 'मिकी' असे सुटसुटीत नामकरण करण्यात आले.

मिकी माऊसनंतर 'डिस्ने ग्रूप'ने अनेक कार्टून्सची निर्मिती केली. त्यात प्लूटो, गॉफी आणि 'डोनाल्ड डक' यांचा समावेश होता. यापैकी 'डोनाल्ड डक' हे पात्रसुद्धा लोकप्रिय झाले.

सन १९५५ मध्ये 'मिकी माऊस क्लब' हा कार्यक्रम अमेरिकन टीव्हीवर दाखवण्यात आला आणि तो प्रचंड लोकप्रिय झाला. या कार्यक्रमासाठी 'मिकी माऊस'चा पडद्यामागील आवाज 'जिम मॅकडोनाल्ड' यांनी दिला होता, तर सध्या 'वायने ऑलवाईन' हे मिकी माऊससाठी आवाज देतात.


'पुक' आणि 'मॅक्स' या दोन चुलत भावांसोबत मिकी माऊसने केलेल्या गमतीजमतींचा आनंद गेली कित्येक वर्षे बालमित्रांसह प्रौढ पालकही लुटत आहेत.

❐

**वि. स. खांडेकरांच्या कुमारांसाठीच्या संस्कारक्षम कथा**





**सूर्यास्त**
किंमत ३०रु.




**यज्ञकुंड**
किंमत ३०रु.




**मध्यरात्र**
किंमत ४०रु.




**अस्थी**
किंमत ३०रु.




**घरटे**
किंमत ३०रु.

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**




# हक्काचे घर

एका मेंढपाळाकडे शिकारी कुत्रा होता. तो म्हातारा झाल्यामुळे त्याला मेंढ्यांची राखण करणे जमेना. त्यामुळे मेंढपाळाने त्याला हाकलून दिले.

तो कुत्रा फिरत फिरत जंगलाच्या वेशीजवळ आला तेव्हा त्याला तेथे एक म्हातारे गाढव भेटले. त्या गाढवाकडून काम होत नसल्याने त्याच्या मालकाने त्यालाही हाकलून दिले होते.

त्या दोघांचीही अवस्था सारखीच असल्याने ते एकमेकांचे मित्र बनले. ते दोघे मिळून जंगलाकडे निघाले.

वाटेत एक मांजर भेटले. मांजर म्हणाले, ''मला म्हातारपणामुळे उंदीर पकडणे शक्य नसल्याने मला हाकलून दिले. '' थोडे पुढे गेल्यावर एक कोंबडा म्हणाला, ''आज मालकाकडे पाहुणे येणार असल्याने मला मारून

मेजवानी करण्याचा बेत होता, पण मला आधीच कळाल्याने मी पळून आलो.''

त्या चौघांचीही चांगली गट्टी जमली. ते रोज जंगलात भटकत असत.

एके दिवशी भटकत असताना त्यांना एक ओसाड घर दिसले. कुतुहलाने त्या चौघांनीही त्या घरात डोकावून पाहिले. काही दरोडेखोर त्या घरात दिसले. ते पक्वान्नावर ताव मारीत होते. ते खाद्यपदार्थ पाहून या चौघांच्याही तोंडाला पाणी सुटले. काहीही करून या दरोडेखोरांना हाकलायचे आणि खाद्यपदार्थ खायचे असे या चौघांनी ठरवले.

अचानक त्या चौघांनी जोरजोरात आवाज काढायला सुरुवात केली.

कुत्रा भुंकायला लागला, गाढव मोठमोठ्याने रेकायला लागले, कोंबडा आरवायला लागला आणि



मांजरही ओरडायला लागले.

अचानक असा भेसूर आवाज ऐकून त्या दरोडेखोरांची भीतीने गाळणच उडाली. ते इकडे तिकडे धावू लागले.

तेवढ्यात एक दरोडेखोर या चौघांच्याही तावडीत सापडला आणि त्या चारही प्राण्यांनी त्याच्यावर हल्ला केला. ते पाहून बाकीचे सर्वजण पळून गेले.

त्या चौघांचीही पावले खाद्यपदार्थाकडे वळली. त्या पदार्थांवर त्यांनी यथेच्छ ताव मारला.

दरोडेखोर पळून गेल्यामुळे ते ओसाड घर त्या प्राण्यांचे कायमचेच घर बनले.


❐


**अनंत पै यांच्या बालकुमारांसाठी खास अमर चित्रकथा**

| | | |
|---|---|---|
| **राजा हरिश्चंद्र** किंमत २०रु. | **अभिमन्यू** किंमत २०रु. | **विक्रमादित्य** किंमत २०रु. |
| **छत्रपती शिवाजी** किंमत २०रु. | **भीष्म** किंमत २०रु. | **पृथ्वीराज चौहान** किंमत २०रु. |
| **सम्राट अशोक** किंमत २०रु. | **राणा प्रताप** किंमत २०रु. | **प्रल्हाद** किंमत २५रु. |
| **श्रीरामाची कथा** किंमत २५रु. | **कर्ण** किंमत २५रु. | **चाणक्य** किंमत २५रु. |

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

## विज्ञानाच्या जगात




### चला, प्रयोग करू या!

विज्ञान म्हणजे मजाच मजा हे पटवून देणारा १२ पुस्तकांचा संच.

**मीना किणीकर**

किंमत प्रत्येकी २०रू.
संच-२४०रु.


### वैज्ञानिक खेळणी

मजेशीर वैज्ञानिक खेळणी कशी तयार करावी याचे मार्गदर्शन करणारे पुस्तक.

**डी. एस. इटोकर**

किंमत ५०रू.




### शास्त्र- गंमत जत्रेत चौकस चिंगी

सुटीच्या दिवसात चिंगी कोणकोणते प्रयोग करावयास शिकली हे या पुस्तकात वाचा.

**वि.गो. कुलकर्णी/र.म. भागवत/ व्यं.गो. गंभीर**

प्रत्येकी पोस्टेज २०रु. किंमत ७०रू.

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**




## संगत

एका झाडावर एक कोळी आपले जाळे पसरून बसला होता. त्या झाडाभोवती भिरभिरणाऱ्या मधमाशीला पाहून तो म्हणाला, ''ये इकडे, माझ्या जाळ्यात रहायला तुला काही त्रास होणार नाही!''

पण मधमाशीने नकार दिला, ती म्हणाली, ''नको रे बाबा. मला नको तुझे जाळे. मला एकटं कधीच राहू वाटत नाही. सदैव मित्रांच्या सोबतीत, मला कायम सुरक्षित वाटतं.''

असे म्हणून ती मधमाशी पुन्हा झाडापाशी भिरभिरू लागली. तेवढ्यात त्याच झाडापाशी एका कागदावर तिला अनेक मधमाशा दिसल्या. त्या कागदावर इकडून तिकडे रेंगाळत होत्या. ते पाहून ती मधमाशी त्या कागदाकडे जाणार तेवढ्यात तो कोळी ओरडला, ''ए तिकडे जाऊ नकोस, त्या कागदावर डिंक पसरून ठेवला आहे. त्यामुळे त्या मधमाशा चिकटल्या आहेत. तू सुद्धा चिकटशील.''

पण त्या मधमाशीने त्याच्या सूचनेकडे दुर्लक्ष केले. ती त्या कागदावर जाऊन बसली आणि इतर माशांप्रमाणे चिकटून बसली ती कायमचीच.

तात्पर्य : आपणच लोकांच्या गोड बोलण्याला फसता कामा नये.

**बालमित्रांनो,** जगातील सात आश्चर्य आणि ती ज्या शहरात आहेत ती सात शहरं खाली दिली आहेत. मात्र त्यात निश्चित क्रम नाही. हा योग्य क्रम ठरवा आणि अचूक उत्तरे आमच्या मासिकाच्या पत्त्यावर पाठवून द्या. अचूक उत्तरे पाठवणाऱ्यांची नावे मासिकातून जाहीर करण्यात येतील.

| शहर | आश्चर्य |
|---|---|
| पॅरिस (फ्रान्स) | ताजमहल |
| गिझा (इजिप्त) | आयफेल टॉवर |
| पिसा (इटली) | पिरॅमिड |
| आग्रा (भारत) | झुलता मनोरा |
| सॅनफ्रॅन सिस्को (अमेरिका) | मोठी भिंत |
| चीन | गोल्डन गेट |
| रोम (इटली) | कलोझियम स्टेडियम |

## चित्रमय रंगतदार कथा

| | | |
|---|---|---|
| **गम्मत गोष्टी** | मंजूषा आमडेकर | ३० |
| **धमाल गोष्टी** | मंजूषा आमडेकर | ३० |
| **मजेदार लोककथा** | मंजूषा आमडेकर | ३० |
| **आदर्श लोककथा** | मंजूषा आमडेकर | ३० |
| **बुडबुड्यांचे विमान आणि इतर गोष्टी** | अर्चना ओक | ३० |
| **चालणारा हिमपुतळा आणि इतर गोष्टा** | अर्चना ओक | ३० |
| **छोटुसा पांढरा ससुकला आणि इतर गोष्टी** | अर्चना ओक | ३० |
| **छोटू किल्लीवाला उंदीर आणि इतर गोष्टी** | अर्चना ओक | ३० |
| **लोखंड खाणारे उंदीर आणि इतर कथा** | वृषाली पटवर्धन | ३० |
| **गंपू चिंपू आणि इतर कथा** | उमा खरे | ३० |
| **मैत्रीचे मोल आणि इतर कथा** | उमा खरे | ३० |
| **सिंड्रेला आणि इतर कथा** | उमा खरे | ३० |

**प्रत्येकी पोस्टेज २०रु. एकत्रित पोस्टेज २५रु.**



# बाल/कुमारवाङ्मय

| | | |
|---|---|---|
| **पंचतंत्रातील मनोरंजक गोष्टी** | अनिल किणीकर | २५ |
| **पंचतंत्रातील रोचक गोष्टी** | अनिल किणीकर | २५ |
| **पंचतंत्रातील प्रेरक गोष्टी** | अनिल किणीकर | २५ |
| **पंचतंत्रातील बोधपर गोष्टी** | अनिल किणीकर | २५ |
| **हितोपदेश : बोधप्रद कथा** | मोहन वेल्हाळ | २० |
| **हितोपदेश : मनोरंजक कथा** | मोहन वेल्हाळ | २० |
| **हितोपदेश : प्रेरक कथा** | मोहन वेल्हाळ | २० |
| **हितोपदेश : रोचक कथा** | मोहन वेल्हाळ | २० |
| **जातक कथा : मनोरंजक** | निर्मला सारडा | २५ |
| **जातक कथा : प्रेरक** | निर्मला सारडा | २५ |
| **जातक कथा : रोचक** | निर्मला सारडा | २५ |
| **जातक कथा : शिक्षाप्रद** | निर्मला सारडा | २५ |
| **लाजवाब बिरबल** | निर्मला सारडा | २५ |
| **विनोदवीर बिरबल** | निर्मला सारडा | २५ |
| **बिरबलाचे चातुर्य** | निर्मला सारडा | २५ |
| **बिरबलाच्या रोचक गोष्टी** | निर्मला सारडा | २५ |
| **शेखचिल्लीचे किस्से** | निर्मला सारडा | २५ |
| **तेनालीरामचे चातुर्य** | मंजूषा आमडेकर | २५ |
| **तेनालीरामच्या रोचक गोष्टी** | मंजूषा आमडेकर | २५ |
| **तेनालीराम विनोदवीर** | मंजूषा आमडेकर | २५ |
| **तेनालीरामच्या मनोरंजक कथा** | मंजूषा आमडेकर | २५ |
| **मन्नो** | मंजूषा आमडेकर | २५ |
| मोठ्यांच्या छोट्या गोष्टी | माधव मोर्डेकर | ३० |





**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**